एका इंजिनियरच्या मनाची उड्डाणे

उड्डाणटप्पू

दुसरे उड्डाण

श्रीरंग कौलगी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

उड्डाणटप्पू

(एका इंजिनियरच्या मनाची उड्डाणे)

दुसरे उड्डाण

श्रीरंग कौलगी

उड्डाणटप्पू

(एका इंजिनियरच्या मनाची उड्डाणे)

दुसरे उड्डाण

लेखक : श्रीरंग कौलगी

सम्पर्क: व्हाट्सॅप क्र. +९१ ९९२०६ १२९९६
ई मेल shreerangkaulgi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

TThis declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके नियमित मिळवण्यासाठी या क्रमांकावर आपले नाव व गाव Whatsapp करा)

प्रकाशन : २१ जानेवारी २०२४

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय



माझे नाव श्रीरंग कौलगी, शिक्षणाने आणि पेशाने मेकॅनिकल इंजिनियर.

माझे कार्यक्षेत्र नवीन मशीन डिझाइन्स करणे, ती डिझाइन्स विकसित करणे, त्याचे पहिले उत्पादन, म्हणजे प्रोटोटाईप करतांना बाहेर येणाऱ्या अडचणी सोडविणे आणि मग ती मशीन वापरात आणायला मदत करणे असे होते.

नव्याने आणि मुळापासून विचार करायला लागणे ही आमच्यासाठी पहिली आणि मूलभूत गोष्ट होती.

त्या अनुषंगाने आजूबाजूला चौकस नजरेने पहाणे आणि मिळेल तिथून नव्या कल्पना प्रत्यक्षांत आणणे हे आमच्यासाठी आवश्यकच होते.

जगाकडे चौकस दृष्टीने बघतांना आणि दिसलेल्या गोष्टींची ऍनालिटिकल चिरफाड करताना काही गोष्टी नव्याने सुचल्या त्या इथे मांडल्या आहेत.

एका इंजिनियरच्या दृष्टीतून जग कसे दिसते याची झलक आहे ही.

इथे सगळ्या गोष्टी नव्या नाहीत पण वेगळ्या अंगाने दाखवायचा एक प्रयत्न केला आहे.

प्रयोग कसा झाला आहे ते वाचक ठरवतील.

श्रीरंग कौलगी.

यापूर्वी पहिले व तिसरे उड्डाण प्रकाशित झाले आहे. त्याचे कव्हर खाली आहे. त्यावर क्लिक केले की तेही उघडेल

अर्पण पत्रिका

काहीतरी लिहावे असे वाटायला लागले. पण आपले वाचणार कोण असेही वाटले. पण तसे झाले नाही. ज्यांच्याकडे हे साहित्य पाठवले त्यांनी ते नुसते वाचले नाही तर त्यावर साधक बाधक प्रतिक्रियाही दिल्या. चांगली टीकाही केली. काही प्रतिक्रिया आणि टीका नवे विषय देऊन गेल्या.

त्या सर्व वाचकांना, त्यांत वर्गमित्र आले, घरचे आले आणि खास जवळचे हक्काचे टीकाकार वाचक आले. त्या सर्वांना साष्टांग दंडवत घालून हे पहिले प्रकरण अर्पण करतो.

ई साहित्य ने हे विस्कळीत लेख एकत्र आणायला मदत केली आणि ते नीट जुळवायचे काम कसे उत्तम केले आहे ते बघाच. त्यांचे मी हार्दिक आभार मानतो.

"मॅन प्रोपोझेस अँड गॉड डिसपोझेस" या उक्ती प्रमाणे आपले प्रयत्न सफल व्हायला ती दैवी शक्ती जी दिसत सुद्धा नाही, तिच्या चरणी हे पुष्प अर्पण.

प्रस्तावना

या संग्रहात जे लेख प्रस्तुत केलेले आहेत ते एका इंजिनियरच्या मनात आलेले विचार आहेत. पण ते सगळ्यांनाच लागू होतात.

आपल्या मनांत अनेक विषय घोळत असतात, त्यांना तात्कालिक कारण असते किंवा पूर्वी काहीतरी पाहिलेले ऐकलेले असते त्याची पार्श्वभूमी असते.

रोज घडणाऱ्या घटना कधी नवीन पैलू घेऊन येतात. त्या दुसऱ्यांना सांगून पहाव्यात हा हेतू इथे आहे.

विषय वेगवेगळे आहेत आणि त्यांची एकमेकांशी रंगसंगती नाही, पण सगळे आपल्याला कधी न कधी स्पर्श करून गेलेले असेल.

हे ललित लेख किंवा मुक्त विचार प्रकटन म्हणूनच पाहावे, उगीच त्यातून खोल अर्थ काढू नये हा हेतू आहे.

बघा तुमचे विचार, अनुभव आमच्याशी जुळतात का.

हा पहिला संग्रह आहे. असे अजून संग्रह तुमच्यापुढे ठेवण्याचा मानस आहे.

"वर्क इन प्रोग्रेस" मानावे याला..

लेख-अनुक्रम

ग्रह तारे वगैरे

अंतिम सत्य

परकीय चलन बचत

स्वर्ग की नरक

तबला

मंजन एक्सप्रेस

नवी पिढी नवी दृष्टी

नवी पिढी नवी दृष्टी परिशिष्ट १

आता काय करावे?

बोक्याचे विश्व

नाट्यसंगीत

असिम्पटोमॅटिक

कथा रसग्रहण - मॉबी डिक

सुसंस्कृत

पुढे काय?

वादाचे महत्व

जाहिरातबाजी

रिझर्व्हेशन किंवा आरक्षण

आजोळ

मातृभाषेतून शिक्षण भाग १

मातृभाषेतून शिक्षण भाग २

अस्मिता आणि असूया

आमचाही भाषासंभार

विसरण्याचा स्विच

निसर्गाशी कुस्ती

सत्य आणि आभास

भाषा शिक्षण हवे का?

बरोबर कोण?

मुंबईचे पठाण

एक नूर आदमी

आदरातिथ्य

युद्धस्य कथा रम्याः

सीमोल्लंघन

ग्रह तारे वगैरे

आकाशांत ग्रह तारे तर नेहमीच असतात. पण आम्ही त्यांच्याकडे पहायला पाहिजे ना! आता आमचा जवळजवळ सगळं जन्म शहरांत घालवलेला. घराच्या गॅलरीतून काही स्क्वेअर मीटर आकाश दिसणार आम्हाला, त्यांत ग्रह तारे कसे शोधावेत आम्ही? तर जवळजवळ सोळा सतरा वर्षे काहीच लक्ष दिले नाही आम्ही.

शहराबाहेर राहायची पहिली संधी मिळाली वालचंद कॉलेजमध्ये ऍडमिशन मिळाल्यानंतर. मोकळे आकाश जसे दिसते याचे प्रथम दर्शन तिथून झाले, पण अजून गोडी लागायची होती. फर्स्ट यरला असतांना संध्याकाळी फिरायला जायची गोडी लागली. ते सुद्धा वस्तीपासून दूर, मोकळ्या रस्त्याने. पाच साडेपाचला निघून साडेसात आठला जेवण्याच्या वेळेपर्यंत परत येत असू. तेंव्हा परत येतांना आकाश थोडे काळे झालेले असायचे. तो काळ नवीन सॅटेलाईट सोडण्याचा होता. आपोआप नजर वर जायची आणि एखाद दोन सॅटेलाईट दिसायचे. पण यांत फारशी गोडी लागली नाही तेंव्हा.

नंतर १९७८-७९च्या सुमाराला कूपर च्या लायब्ररीतून रीडर्स डायजेस्ट चा एक मोठा व्हॉल्यूम वाचायला आणला. त्यांत पहिलाच सेक्शन अस्ट्रॉनॉमीचा होता. तो वाचता वाचता जाणवले की नेहमी दिसणाऱ्या ग्रह ताऱ्यांची माहिती

किती चित्तवेधक असते ते. मग आमच्या त्या गॅलरीतून आकाश पहायची आवड लागली. सुदैवाने पश्चिम आणि दक्षिण दिशा अगदी स्वच्छ दिसायच्या. हळूहळू तारे ओळखायची संवय झाली. त्या पुस्तकांत एक ताऱ्यांचा नकाशा होता त्याचा उपयोग कसा करायचा ते हळूहळू समजायला लागले.

आमच्या नातेवाईकांकडे एक बायनोक्युलर होता, तो आणून आकाश पाहायचा छंदच लागला. तेंव्हा पहिल्यांदाच मृग नक्षत्रातला तो तेजोमेघ पाहिला आणि मन निस्तब्ध झाले. मग जेवण झाले की तास दीड तास आकाशदर्शन करायचे दुर्बिणीतून आणि मग डोके दुखायला लागले की जाऊन झोपायचे. बायको थोडी वैतागायची पण तिथे थोडासा कानाडोळा करायचा.

ताऱ्यांचे प्रकार, त्यांची नावे त्यांच्या जागा अशी माहिती डोक्यांत शिरू लागली. एकदा कामानिमित्त औरंगाबादला जायची वेळ आली. तिथल्या हॉटेलच्या लॉबीत एक पुस्तकांचे छोटे दुकान होते तिघून इसाक ऍसिमोवची दोन पुस्तके घेतली चाळायला टाइम पास म्हणून. आणि जाळ्यांत अडकलेल्या माश्यासारखा त्यांत पूर्ण गुंतून गेलो.

गाईड टू फिजिकल सायन्सेस आणि युनिव्हर्स अशी ती पुस्तके. एकदा उघडल्यावर इतकी त्या विषयांची गोडी लागली की त्या पुस्तकांची ती पाने पिवळी पडेपर्यंत पारायणे तर झालीच पण अंतराळ विज्ञानात (कॉस्मोलोजी)

मध्ये खूपच रस निर्माण झाला आणि मिळतील तिथून त्यावरची पुस्तके आणि आकाश गाईड घेऊन ठेवण्याचा सपाटा लावला.

कूपर सोडून पुन्हा मुंबईला आल्यावर परत हे थांबले, कारण सकाळी सहा साडेसहाला कामावर जाऊन संध्याकाळी सहा साडेसहाला परत यायचे की मग बायको मुलाच्या ताब्यांत. आणि मुंबईतून कसले आकाशदर्शन करणार. पण दोन वर्षांनी टाटा कन्सलटिंग इंजिनियर्स मध्ये गेलो आणि तिथे आमच्यासारखेच उत्साही आकाशदर्शन वाले भिडू मिळाले. डोंबिवलीच्या स्विमिंग पूल च्या आवारांत एकदा एक पूर्ण रात्र काढली तारे नकाशे बघून शोधायचा आणि आकाशाचे फोटो काढायचा प्रयत्न केला.

एकदा बोरिवलीच्या नॅशनल पार्क मध्ये जानेवारीतला उल्कावर्षाव बघायला रात्रीची ट्रिप काढली. खरेच काही काही उल्कावर्षाव आश्चर्यकारक असतात. मोकळे आकाश पाहिजे आणि जमिनीवर निजून आकाश पहायचे. कुठून पुढची उल्का येणार आहे ते माहीत नसते, मग ही पहा, ती पहा करत वेळ छान जातो. नंतर एकदा माथेरानचा डोंगर चढून एका मोकळ्या माळावर रात्रभर मुक्काम केला. आकाश ताऱ्यांनी कसे भरलेले दिसते याचे मनोहारी दृश्य तिथे अनुभवायला मिळाले.

मुंबईत खगोल मंडळे आहेत, त्यांचे आम्ही सभासद झालो. त्यांची लेक्चर्स ऐकली आणि कर्जत जवळ वांगणीला त्यांच्या आकाश दर्शन कार्यक्रमांत भाग घेतला. चांगले ऑरगनाईझ केलेले असते ते. दुर्बिणीतून आणि नुसत्या डोळ्यांनी आकाशाची ओळख करवितात चांगली. छान माहिती मिळते तेंव्हा.

एकदा एक मोठा स्पष्ट धूमकेतू आकाशांत दिसत असतांना आमच्या पाच वर्षांच्या मुलाला घेऊन नेरळ जवळ शेलूला गेलो होतो. गाडीतून उतरून जवळच्या शेतांत जाऊन बघत असतांना तिथे एक पोलीस आला. तो स्टेशनवर ड्युटी ला होता आणि त्याने लहान मुलाला घेऊन मी शेतांत जात असलेला पाहिला. त्याला काय शंका आली कोण जाणे, आमच्या मागोमाग तो आला. मी आकाशाचे फोटो काढत होतो. जवळ येऊन मी काय करतो ते पाहिले त्याने. मग त्याची काळेबेरे नसल्याची खात्री झाल्यावर तो आम्हाला सामील झाला. त्यालाही त्यांत रस वाटला. त्यालाही तो धूमकेतू दाखवला. मग परतीची गाडी येण्याची वेळ झाल्यावर आमच्या मुलाशी गप्पा मारत तो परत स्टेशनवर आला.

वांगणीला अजून एक मित्राला घेऊन गेलो होतो आकाश पहायला. त्यावेळी दुर्बिणीतून जुळे तारे कसे दिसतात ते पाहिले होते आणि अँड्रॉमेडा आकाशगंगाही. काळेभोर आकाश असतांना काय सुरेख दिसते ती! शिवाय पहाट होत आली की कशी थंडी वाढते आणि दंवाने कच्चं ओले व्हायला वाटते ते एकदा पहावेच.

१९९५मध्ये खग्रास सूर्यग्रहण बघायला उत्तर प्रदेशांत काल्पी ला गेलो होतो. तिथल्या शाळेतले शिक्षक आम्हालाही आकाश दर्शन करवा म्हटल्यावर त्यांना घेऊन जवळच्या शेतात घेऊन गेलो आणि त्यांना थोडेफार आकाशदर्शन करवले. त्यावेळी मला थोडीशी धाकधूक वाटली होती. सगळे अनोळखी, त्यांत प्रदेश ही अनोळखी, पण ते शिक्षक, मुलेच होती ती, खूप इंटरेस्ट घेऊन पाहत होती. म्हणजे "आपणासारखे करिती तात्काळ" हे संत वचन आमच्या बाबतीत मात्र खरे निघाले.

कोणी म्हणतील, "त्यांत काय विशेष आहे, आम्ही नेहमीच बघतो असे आकाश". आम्ही म्हणतो, "ठीक आहे. आम्ही शहरी लोक, आम्हाला हे नवे आहे. तुम्ही रोज बघता जरा आमच्याबरोबर चला आणि आम्हाला तारे आणि तेजोमेघ आणि ग्रह शोधायला मदत करा". तर मग यांचा आवाज बंद! रोजचे आकाश निरसपणे पहाणे आणि काहीतरी हेतू मनांत धरून पाहणे हे वेगळे असते. आम्ही अशा लोकांना बरोबर घेऊन त्यांना आकाशदर्शन शिकवून आमच्या सारखे हौशी करायचा प्रयत्न केला आहे आणि तो बहुधा यशस्वी झाला आहे.

टाटा मध्ये नोकरी करतांना जायंट मिटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप च्या उभारणी मध्ये आणि नंतर त्याच्या मेंटेनन्सच्या सिस्टीम डिझाइन करता

a

नारायणगावच्या जवळ खोडद गावी साईटला जायचा प्रसंग बऱ्याचवेळा आला. हे म्हणजे वेगळेच आकाशदर्शन. रेडिओवेव्ह डोळ्याला दिसत नाहीत पण त्या काही विशेष माहिती गोळा करतात. त्या माहितीवरून इमेज करता येतात आणि त्याही तेवढ्याच मनोरंजक असतात.

जीएमआरटी च्या ३० डिशेस ५ ते १० किलोमीटर अंतरांत लावलेल्या आहेत. हा एक रेडिओ डोळाच आहे. रेडिओ अस्ट्रॉनॉमी हे शास्त्र आज अंतराळ संशोधनाचे मुख्य साधन आहे.

भारतांत मोठ्या दृश्य प्रकाश (व्हिजिबल लाईट) दुर्बिणी दोन तीन ठिकाणी आहेत. एक तामिळनाडूत कवलूरला आहे आणि दुसरी एक हॅनलेला लडाखमध्ये आहे आणि आणखी एक देवस्थलला उत्तराखंडमध्ये आहे. उदकमंडलची सुर्यदुर्बीण ही वेगळीच आणि तिथला रेडिओ टेलिस्कोप ही वेगळाच.

या उटीच्या टेलिस्कोप ला आमची "शैक्षणिक" सहल गेली होती, आठवते का?

a

अजून एकदा न्यूट्रिनो ऑब्झर्व्हेटरी चे काम करायची संधी आली पण अजून हे भारतांत फारच बाल्यावस्थेत आहे. फक्त थोडे इंजिनियरिंग डिझाइन करता आले टेंडर करण्यापुरते.

अश्या संधी मिळाल्यामुळे ग्रह तारे फक्त डोळ्यांनीच पहायचे असतात हा आमचा विचार पार बदलून गेला. अदृश्य लहरी वेगळीच आणि ज्यास्त माहिती देतात. अर्थात, हे आकाशदर्शन सर्वसामान्यांच्या आवाक्यातले नाही जे आम्ही जाणतो.

आज अंतराळ संशोधनांत जी प्रगती होते आहे ती केवळ अफाट आहे. दूरच्या ताऱ्यांचे ग्रह शोधणे, दूरच्या आकाशगंगाचा, ब्लॅक होल अर्थात कृष्णविवरे यांचा शोध आणि माग दृश्य प्रकाशापेक्षा अदृश्य प्रकाशातच घेतला जातो. हे एक अतिशय मोठे फील्ड झाले आहे आणि आपल्या नातवंडांना त्यांत खूप प्रगती करण्यासारखी आहे यांत शंका नाही.

मुळांत आकाशदर्शन आणि अंतराळविज्ञान यांत लोकांना गोडी वाटली पाहिजे. आज आपल्याकडे हौशी खगोलज्ञान फारसे रुळलेले दिसत नाही पण होऊ शकते. यांतही प्रगतीच्या आणि प्रसिद्ध होण्याच्या संधी खूप आहेत. भारतांत ही आयुका आणि टी आय एफ आर या क्षेत्रांतल्या मोठ्या संस्था आहेत.

ग्रहणे आली की लोकांचा उत्साह वाढतो पण तो तात्पुरताच. मुंबईत नेहरू सायन्स सेंटर आकाश दर्शनाचे कार्यक्रम नेहमी सादर करते, आणि तिथला तारांगणाचा कार्यक्रम चित्तवेधक असतो. मुंबईला भेट देणारे पाहुणे तिथे जातात पण मुंबईकर? तो नाही जात.

आकाशदर्शन ही अस्ट्रॉनॉमर होऊ शकण्याची पहिली पायरी आहे हे नक्कीच. तारांगणे आपल्याला तोंड ओळख चांगली करून देतात. त्यानंतर प्रत्यक्ष आकाशदर्शन करायला जावे. कुणी गाईड असला तर बेस्ट, पण नसला तरी फारसे अडत नाही. एखादा कार्यक्रम अगोदरच ठरवला मनांत तर ज्यास्त एन्जॉय करू शकतो.

आपल्या पुढच्या पिढ्यांना या क्षेत्रांत काम करायला आणि नाव कमवायला खूप मोठ्या संधी आहेत. आज एक्झोप्लॅनेट आणि त्यांचा अभ्यास हे एक चलनी नाणे झाले आहे.

आमचा सध्याचा उद्योग फक्त टीव्हीवर अंतराळ विज्ञानाचे कार्यक्रम पाहणे आणि विस्मयचकित होणे यापुरता सीमित झाला आहे. हे कार्यक्रम पाहूनसुद्धा आपण किती तुच्छ आहोत, निसर्गासमोर, याची जाणीव झाल्याविना राहत नाही. तसेच गेल्या पंधरा वीस वर्षांत झालेली प्रगती अक्षरशः अफाट आहे.

a
कदाचित आपल्या आयुष्यांत मनुष्य चंद्रावर बेस उभारू शकेल असेही वाटू लागले आहे.

मी तर आमच्या मुलांना आत्ताच सांगतो आहे की आमच्या नातवांच्या आयुष्यांत त्यांना सूर्यमालेत आणि सूर्यमालेबाहेर जीवसृष्टी सापडल्याची माहिती मिळेलच.

पुढचा जन्म आपल्याला अंतराळ संशोधकाचा मिळावा असे बुकिंग मी आज करू इच्छितो. देव ऐकेल तर. नाहीतर पुन्हा इंजिनियरच बनवायचा. बाकी त्याची इच्छा.

अंतिम सत्य

असे कां होते, तसे कां होते, दिसते तसेच असते का नाही हे प्रश्न माणसाला अनंत काळापासून पडत आलेले आहेत. सूर्य आकाशांत वर का येतो आणि खाली का जातो, ते ढग पाणी कसे पाडतात, झाडांना फुले पाने का येतात, काही प्राणी उपद्रवी का आणि काही इतके गरीब स्वभावाचे कसे, अश्या प्रश्नांची उत्तरे शोधतांना यांचा आपल्याला काय उपयोग याचा ही विचार माणूस करू लागला. इतर प्राणी आपल्या पर्यावरणाशी जुळवून घेत असतांना माणूस सुरक्षित पर्यावरणा पासून दूर जाऊन दुसऱ्या जागेंतही स्वतःला सामावून घेऊ लागला.

आपल्या शारीरिक गरजा भागल्यावर शांत बसून राहण्यापेक्षा तो इकडे काय तिकडे काय याची उत्सुकता त्याला लागून रहायची. जे दिसते तेच खरे असेच मानायचा तो काळ होता. पण बराच काळ निरीक्षण केल्यावर जसे वाटते तसे नसावे असे त्याला वाटू लागले. झाडे पानाफुलांनी गच्च भरलेली कायम असत नाहीत आणि ते आकाशांतले ढग नेहमीच पाणी पाडत नाहीत हेही त्याने पाहिले. मग असे का आणि कधी होते याचा शोध सुरू झाला.

माणूस तो पर्यंत शिकारी आणि निसर्गातल्या वस्तू गोळा करणारा होता. अरण्यांत प्राण्यांचा शोध घेत असता झोपलेले प्राणी शोधून त्यांना मारणे किंवा काबीज करणे हे त्याचे एक कामच होते. कधी कधी त्याने पाहिले की काही

झोपलेले प्राणी कितीही टोचले, ढोपसले तरी उठत नाहीत. काही वेळा अश्या प्राण्यांच्या अंगावर किडेमुंग्या वावरतांना दिसल्या, कधी एक उग्र वास त्यांच्या भोवती साठून राहिलेला दिसला. असे प्राणी दिसले की माणूस तेथून दूर दूर निघून जाई.

माणसाने पाहिले की दमली की इतर माणसे आडवी होतात आणि त्यांची हालचाल फक्त श्वासापुरती होते. झोप लागते त्यांना. पण त्याची त्याला कधी भीती वाटली नाही. थोड्या वेळाने ती माणसे पुन्हा हालचाल करत आणि नेहमीसारखी होत.

पण माणसाने असेही पाहिले कधीतरी की काही व्यक्ती अगदी दमल्यासारख्या होतात, त्यांचे अंग गरम होते आणि त्या झोपतात आणि कधीतरी खूप वेळ उठतच नाहीत. कितीही हाका मारल्या हलवले तरी काहीच प्रतिसाद देत नाहीत. मग काय करावे ते त्या माणसांना सुचत नाही. सोडून जाता येत नाही आणि जवळही रहाता येत नाही. पण नंतर आयुष्य जगण्यासाठी दूर जावेच लागते. त्या व्यक्ती चिरनिद्रेत गेलेल्या असतात.

मृत्यू. एक अंतिम सत्य. अटळ.

निद्रा, दिर्घनिद्रा आणि चिरनिद्रा यातला फरक माणूस अजूनही शोधतो आहे. यातील भयपूर्ण उत्सुकता अजून संपली नाही. जेवढे ज्ञान मिळवावे तेवढे

पुढचे प्रश्न सोडवावे लागतात. नवीन ज्ञान मिळत जाते. प्राण्यांना झोप लागते ती का याचे उत्तर अजून आपण शोधतो आहोत. काही प्राणी खूप वेळ जागे राहू शकतात आणि काही सारख्या डुलक्या घेत असतात.असे का? काही प्राणी निसर्गाच्या कोपापासून सुटका करून घेण्यासाठी झोपेचा आधार घेतात. बाहेरचे वातावरण अयोग्य झाले की झोपेचा आधार घेऊन वेळ मारून न्यायची. जमले तर प्रजोत्पादनाच्या क्रिया याच झोपेत उरकून घ्यायच्या असा काही प्राण्यांनी उपयोग करून घेतला. दिर्घनिद्रेचा हा एक चांगला उपयोग.

दिर्घनिद्रेचा दुसरा एक प्रकार म्हणजे कोमा. इतर प्राणी कोमात जाणून बुजून जातात की नाही हा वेगळा प्रश्न आहे पण छोटी दिर्घनिद्रा (!!) म्हणजे हायबरनेशन मात्र बरेच प्राणी आणि पक्षीही करतात. कोमा किंवा हायबरनेशन मध्ये शरीराच्या सगळ्या क्रिया संथ होतात आणि तो प्राणी दिवस दिवस, अगदी काही महिनेही अगदी पडून रहातो. एखादी सुरक्षित जागा शोधून हे हायबरनेशन चालते.

मुळांत झोपलेला प्राणी जागाच का होतो हे न सुटलेले कोडे आहे. सुरक्षित जागा, निर्धोक वेळ, शरीराच्या गरजा भागलेल्या आणि शांत आरामाचे वातावरण असेल तरी जाग का येते हे अगम्य आहे अजून. त्यांतही हायबरनेशन मध्ये गेलेला प्राणी, ज्याच्या सगळ्या शारीरिक क्रिया अगदी मंद झालेल्या आहेत तो जागाच का होतो हेही ना सुटलेले कोडे आहे.

चिरनिद्रा याहून काय वेगळी असावी? निद्रेमध्ये आणि दिर्घनिद्रेत बाहेरून दिसणाऱ्या शरीरक्रिया तरी जाणवतात. चिरनिद्रेत त्या बाहेरून जाणवत नाहीत. कोमा मध्ये गेलेल्या व्यक्तींचा अभ्यास करून त्यांचे अनुभव कसे होते ते शोधण्याचा आटोकाट प्रयत्न होतो आहे. पण कोमामध्ये जाऊन पुन्हा जाग्या झालेल्या व्यक्तींचा अभ्यास ज्यास्त कटाक्षाने होत असता असे दिसून आले आहे की त्यांचे विचार आणि त्यांना जाणवलेल्या गोष्टी ते विसरून गेलेले असतात.

असेलच, आपण आपल्याला पडणारी स्वप्ने जागे झाक्यावर तात्काळ विसरून जातो. एखादेच अगदी विशिष्ट स्वप्न लक्षांत रहाते. निद्रा आणि दिर्घनिद्रा यांच्या शोध घेण्याच्या पद्धती जवळ जवळ सारख्याच आहेत. मेंदूतील विजेच्या लाटांचा अभ्यास करून यावरचे संशोधन चालले आहे. हेही शोधले आहे की स्वप्ने पडतात, अगदी दिर्घनिद्रेतही. मेंदूतल्या या हालचाली मेंदूबाहेरूनच शोधण्याच्या प्रयत्नांत काही गोष्टी अगम्य होत असतीलच.

मग चिरनिद्रा याहून वेगळी असेल का, की तो निद्रा आणि दिर्घनिद्रेचाच एक प्रकार आहे? प्राणी दिर्घनिद्रेत गेला की शारीरिक क्रिया मंद होतात हे दिसलेच आहे. बर्फाळ प्रदेशांत सापडणारे बेडूक इतके मंद झालेले असतात तो जसे काही दगडच. पण हवेंत जराशी ऊब आली की पुन्हा त्यांच्या शारीरिक क्रिया पुन्हा नॉर्मल होतात आणि जसे काही झालेच नाही असे ते वावरतात.

अगदी नवी पिढीही जन्माला घालतात. बेडूकच नाही तर दुसरे अनेक प्राणी असे आहेत.

सागरातले प्राणी असे वागतात की नाही याचा शोध घेतल्याचा अजून नीट ठावठिकाणा मिळालेला नाही. पण डॉल्फिन अर्ध्या मेंदूने झोपतात हे सिद्ध झालेले आहे. म्हणजे ते कायम जागेच असतात. तसेच व्हेल सुद्धा.

मुळांत शरीरक्रिया म्हणजे काय? ज्या जीवांना अश्या शरीरक्रियांचीच गरज नाही त्यांचे काय? त्यांना निद्रा, दिर्घनिद्रा आणि चिरनिद्राचं नाही की काय? व्हायरस आणि काही एकपेशी जीव जे सजीव आणि निर्जीव यांच्या मध्ये रहातात त्यांचे काय? उकळत्या पाण्यांत, बर्फाच्या खाली, अंतराळांत असलेल्या या जीवांना अमरत्व दिले आहे काय देवाने?

हे जीव वर्षानुवर्षे सुप्तावस्थेत असतात आणि वातावरण अनुकूल झाले की पुन्हा सक्रिय होतात. अगदी अंतराळातही असेच राहतात. पॅनस्परमिया प्रक्रियेद्वारे एक ग्रहावरून दुसऱ्यावर प्रवास करतात. ते अमरच असतात जसे.

बहुतांश प्राण्यांना नाही दिले अमरत्व देवाने. ते जन्मतात, जगतात आणि मरतात. त्यांचे शरीर निसर्गांत दुसऱ्याच्या दृष्टीने अन्न होते किंवा ते निसर्गांत मिसळून जातात. त्यांच्या दृष्टीने जो जागा झाला नाही तो संपला त्याचा त्याग करायचा हीच सोपी प्रवृत्ती असते. ते गेल्याचे दुःख करत असलेले दिसत नाहीत.

अगदी हत्तीसारखे वरकरणी विचार करणारे प्राणीही आपल्या जातभाईची हाडे सापडली तर जरा वेळ स्तब्ध राहून निघून जातात.

मानवजात तशी नाही. ती विचार करते. जे दिसत नाही त्यापलीकडे जायचा प्रयत्न करते. आदी काळापासून चिरनिद्रेला एक मोठे महत्व दिलेले आहे मानवाने. चिरनिद्रा किंवा मरण हे गूढ असल्याने त्यांच्याबद्दलची उत्सुकता तेवढीच गहन. झोपलेला किंवा दिर्घनिद्रेतला माणूस जागा होऊ शकतो तर चिरनिद्रेतला का नाही जागा होणार असा विचार मानवाने केला. पण त्याचे शरीर पुन्हा कसे जागे होईल याची काही कल्पना नसल्याने तो माणूस पुन्हा जागा झाल्यावर त्याला लागणाऱ्या गोष्टी त्याचाचपाशी ठेवाव्यात हे मात्र त्याला पटले. त्याचे ते शरीर त्याला परत वापरता यावे म्हणून ते राखून ठेवण्याची कला आत्मसात केली. अर्थात त्याचे अवयव कसे टिकतील याची काळजी घेतांना त्यांत काही प्रिझरव्हेटिव्ह भरून ठेवावीत हे मात्र त्याला सुचले.

पण असे मृत शरीर राखून ठेवणे खर्चिक असल्याने फक्त राजेरजवाडेच याचा उपयोग करायचे. गरीब निर्धन लोकांना मात्र गत व्यक्तीला विसरून जावेच लागायचे. त्यांच्या मरणानंतर जमिनीत पुरून टाकण्याची किंवा जाळून टाकण्याची पद्धत रूढ झाली.

मृत्यूचे गूढ, त्याचे अचानक पणे येणे आणि त्यापासून न मिळणारी सुटका याचा विचार करून देव, कर्म याचा विचार करायला माणसाने सुरुवात केली.

यमराज, त्याचे यमदूत, स्वर्ग, नरक, त्यातली सुखदुःखे याचा विचार करून इथे जे आवडते तेच तिथेही अखंड मिळो ही इच्छा मनांत धरून काय केले असता हे मिळेल आणि काय केले असता हे मिळणार नाही याचे त्याने ठोकताळे ठरविले. धर्म, अधर्म, पाप, पुण्याचाही विचार सुरू झाला.

मरण तर येणारच, मग ते कसे असावे याचा मानवाने विचार केला. मरण तर सगळ्यांनाच दुःखद, तर ते त्यांतल्या त्यांत कसे कमी दुःखदायक होईल याचा त्याने शोध घेतला. मरण तर अटळच, तर मग ते साधुसारखे असावे निदान, अगदीच जनावरा सारखे असू नये याकरता काय करावे? आफ्रिकेतल्या काही जमातीत माणूस आसन्नमरण झाला की त्याला गावाबाहेर एक मोठ्या वृक्षा खाली ठेवून येतात. जगला तर आनंद साजरा करतात, नाहीसा झाला तर मुक्ती साजरी करतात.

अगदी आजच्या अतिप्रगत समाजातही जर विचारले की कसे मरण यावे तर उत्तर बहुधा अचानक आणि वेदनाविरहीत असेच उत्तर मिळेल. लळत लोंबत रखडत येणारे मरण कुणाला आवडेल? पण आपल्या हातात आहे का ते? आत्महत्येचे विचारही चुकीचे आहेत. फटकन प्राण जाईल याची कोणी खात्री देऊ शकेल का? जसा दुसऱ्याचा जीव घेणे पाप मानले जाते तसे आपला जीव घेणेही पापच मानले आहे.

a

मरण अंतिम सत्य असले तरी त्याला लांबविण्याचा प्रयत्न मात्र सगळेच करतात. औषधांचा शोध ही त्याचीच निशाणी आहे. दुर्दम्य व्याधी आणि विकारांवर आज औषध नाही तरी भविष्यात नक्कीच मिळेल या आशेने कृत्रिम हायबरनेशन करून घेणारे लोक या जगांत आहेत.

माणसांच्या कल्पना अफाट असतात कधीकधी. हॉलिवूड यांत माहीर आहे. ऍक्सिडेंटमध्ये मेलेल्या माणसाच्या मेंदूतून विचार बाहेर काढून ते दुसऱ्याच्या मेंदूत पाठवून गुन्हा शोधायचा प्रयत्न केल्याचा एक चित्रपट पाहिला आहे. म्हणजे इथे मेंदू मेलेला नाही शरीर गेले तरी.

अंतराळप्रवासाला मनुष्याचा हा ऐंशी नव्वद वर्षांचा जन्म अगदीच तुटपुंजा आहे. पण अंतराळ प्रवासाची आशा आणि जिद्द तर आहे तर मग पृथ्वीवरच्या प्राण्यांसारखे हायबरनेशन करता येईल का किंवा इथेच हायबरनेशन करून दुसऱ्या काळांत जागे होऊन काळा वर मात करायची का अशी मात्र स्वप्ने माणूस पाहतो.

मृत्यू लांबविण्याचा प्रयत्न करण्यासाठी मृत्यू म्हणजे काय ते तरी समजले पाहिजे. लौकिक अर्थाने मृत्यू म्हणजे या जगातील असण्याचा अंत. पण शास्त्रज्ञ इतकेच मानत नाहीत. मृत्यूच्या व्याख्येइतके क्लिष्ट दुसरे काही नसेल. क्लिनिकल डेथ, ब्रेन डेथ आणि आणखी लीगल डेथ सारख्या व्याख्या काय

दर्शवितात? आपल्या विकिपीडिया युनिव्हर्सिटी मध्ये एक लांबलचक लेख आहे यावर. महाक्लिष्ट या लेखात इतके गहन विवरण दिले आहे की वाचणारा ज्यास्त गोंधळून जातो.

ब्रेन डेड माणूस जगाला संपलेला जरी वाटत असेल तरी त्याचे कित्येक अवयव जिवंतच असतात. त्यांचा उपयोग करून दुसऱ्यांना जीवनदान करता येते हे प्रकट झाले आहे. सगळ्याच्या सगळ्या अवयवांचे जर दुसऱ्या शरीरांत प्रत्यारोपण करता येईल तर ते मरण नसेलच. कधीतरी सगळे अवयव पुन्हा वापरताजोगे होतील तर मृत्यूची व्यख्याच बदलून जाईल.

साधूचे शरीर लौकिक मृत्यू नंतर तसेच ठेवून कधीतरी ते पुन्हा जिवंत होऊन पुन्हा कार्य करतील अशी आशा लोकांना असते असे दिसले आहे. पण ते साधू चिरतरुण कसे होणार ते कोणी सांगत नाहीत.

कदाचित पुढे असे शोध लागतील की त्यामुळे मानव अमर होईल. त्याला शरीरक्रियांच्या करता आजच्यासारखे रहावे लागणारच नाही. अंतराळ प्रवासांत त्याचे आयुष्य अखंड होईल. काळाचे बंधन राहणारच नाही. हे शोध लागतील तेंव्हा लागतील.

तो पर्यंत मात्र चिरनिद्रा हेच अंतिम सत्य असेल.

परकीय चलन बचत

परकीय चलन वाचविणे हा एक चांगला विचार आहे.

तेला खेरीज आपल्याला सध्यातरी काहीच पर्याय नाही. पण हे कायमचे राहू शकणार नाही.

सोलर, पवन, हायड्रो आणि इतर ऊर्जा जरी चांगल्या असल्या तरी बेस लोड म्हणजे कायमचे लोड आज कोळसा आणि तेलावरच चालते.

या इतर ऊर्जा आजतरी खर्चिक आणि बेभरवशाच्या आहेत कारण त्यांना लागणारी साधने आज पूर्णतः भारतात होत नाहीत. पण हळू हळू होतील.

अणुऊर्जा हा एक उत्तम उपाय आहे कारण त्यांत तेलाचा वाटा फक्त इमर्जन्सी करता आहे. पण अणुऊर्जा केंद्रे बांधायला खर्चिक आणि वेळखाऊ असतात. त्यांच्यावर सुरक्षितता आणि आंतरराष्ट्रीय देखरेख यांची जबाबदारी असते. इतर त्याच्या रेडिएशन, स्पेन्ट फ्युएल अशा कटकटी वेगळ्याच असतात, पण ऊर्जानिर्मिती स्वच्छ असते.

a

थर्मल पॉवर स्टेशनही थोडक्यांत बांधता येत नाहीत आणि त्यांना कोळसा किंवा तेल लागतेच. आणि ती बरीच घाण असतात चालायला.

त्यामुळे आजतरी आपल्याला परकीय चलन तेलावर खर्च करावेच लागते आहे.

ऊर्जेचा वापर वाहतुकीकरता होणे हे अटळ आहे. पण खाजगी वाहतूक जर तेलाविना झाली तर नक्कीच फायदा होईल.

इलेक्ट्रिक गाड्या हा खूपच खर्चिक तोडगा आहे, कारण त्यांना लागणाऱ्या बॅटरी आज मोठ्या प्रमाणात बनविण्यासाठी लागणारे सामान आजतरी आयात करावे लागते, म्हणजेच त्यालाही आज खूप डॉलर खर्च होतात.

आणि त्या गाड्या आपल्या आवाक्यात यायला अजून वेळ लागेल. नुसते रिचार्ज कुठे करायचे हा प्रश्न अजून नाही सुटलेला. आणि त्या गाड्यांच्या खोडी आणि संवयी अजून माहीत नाहीत आपल्याला. नाहीतर "आममें कमाया और नारियलमें गंवाया" अशी वेळ येईल.

a

आज आपण इलेक्ट्रिक गाडी फक्त शहरांत वापरू शकू. फक्त महाग गाडी आणि त्याहून महाग चार्जिंग सिस्टीम लावायला लागेल. त्याचा मेंटेनन्स वेगळा. इलेक्ट्रिक गाड्यांना आज 30 किलोवॅट तास एवढी बॅटरी लावलेली असते.

आपण इंजिनीयर आहोत. जरा विचार करून पहायला हरकत नसावी. गाडीचे वजन 1000 किलो, चार माणसांचे 250 किलो. सामान धरून समजा 1400 किलो. लेव्हल रस्त्यावर टायर मध्ये नीट हवा किंवा नायट्रोजन असतांना गाडी ढकलायला 20 ते 30 किलो जोर लावायला लागतो. ज्यांची कधी गाडी रस्त्याच्या मध्ये बंद पडली असेल त्यांना माहीतच असेल हे. तर समजा अगदी वाईट म्हणजे 30 किलो धरले तर 300 न्यूटन होतील.

गाडीचा वेग समजा 10 मीटर दर सेकंदाला, म्हणजे 36 किमी तासाला असेल. पण कोण एवढा स्लो चालवील? तर वेग समजा 15 मीटर सेकंदाला म्हणजे 54 किमी दर तासाला असेल.

तर गाडीला ऊर्जा लागेल, 300×15=4500 वॅट. वेग पकडायला जी ऊर्जा लागेल ती वेगळी. समजा 6000 वॅट, म्हणजे 6 किलोवॅट. 30 किलो वॅट तासाची बॅटरी 5 तास पुरेल. पण आपण त्यांत एफिशियनसी 70 टक्के धरली तर 3 ते साडेतीन तास चालेल. त्यांत आपण 54×3.5=189 किलोमीटर अंतर जाऊ शकू, जास्तीतजास्त.

यांत चूकभूल देणे घेणे. गणित चुकल्यास सावरून घेणे. गणितात अडचण आहे हे पूर्वीच सांगितले आहे.

जरा विचार करा 185 किलोमीटर प्रवास करून गाडी घरी आली की ती घरच्या सिस्टिम वर 5 ते 6 तास चार्ज होत राहील, बाहेर एखादेवेळी लौकर चार्ज होईल.

विजेचा खर्च? मायबाप महामंडळ आजच 7 ते 8 रुपये चार्ज लावते आहे. आमच्या घरच्या स्पेशल सिस्टीमला किती लावेल काय माहिती, पण समजा 10 रुपये लावला प्रत्येक युनिटला तर 30×10=300 रुपये तर लागतीलच. ते ठीक आहे. पेट्रोल पेक्षा खूपच स्वस्त आहे.

मायबाप सरकार गाडी चालविण्याकरता मदत करील असे अजिबात वाटत नाही. म्हणजे चार्जिंग स्टेशन च्या मर्जीवर सगळे अवलंबून. कोंबडी आत घेऊन फाटक लावून घेतले म्हणजे काय करायचे ते ज्याचे त्याने ठरवावे.

तर इलेक्ट्रिक गाडी चालेल पण तिच्याशी बरेच म्हणजे अगदी खूपच प्रेमाने वागावे लागेल. आत्ताच्या आपल्या पेट्रोल गाडी सारखे दामटता येणार नाही

तिला. रुसून रस्त्यांत बंद पडली तर वांधा! लाडक्या लेकी सारखे वागवायला लागेल.

तिच्या मेंटेनन्स चा काय सीन आहे ते पहायला लागेल. एकच एक कंपनी बनवीत असेल तर मग बघा बुवा. पार्ट नाही मिळाला तर गाडी घरी. पुन्हा आपले पेट्रोलच्या गाडीने फिरणार आम्ही. पांढरा हत्ती असतो की नाही ते कळेल लौकरच.

पण एवढे निराशावादी आपण नाही. होईल काहीतरी. टेक ऑफ घ्यायच्या अगोदर एकदा तरी इलेक्ट्रिक गाडीने गावाला जायची महत्वाकांक्षा आहे आमची.

पण तो पर्यंत 100 रुपये लिटर पेट्रोल घालून गाडी किती दिवस चालवायची याचा विचार केलाच पाहिजे. अगदी देवाकडेही एवढे रिसोर्सेस नसतील. मग आमच्या सारख्या प्रायव्हेट माणसाकडे कुठून येणार. आपण काही सरकारी गाडीने फिरणारे आमदार खासदार किंवा सरकारी अधिकारी नाही आहोत आज तरी.

रेल्वे वापरा म्हणे. रेल्वेला तेल कमी लागते म्हणे, कसे ते त्यांनाच माहीत. इलेक्ट्रिक इंजिने काय वीज वापरत नाहीत काय? मग ती वीज कुठून येते? आणि

ती वीजनिर्मिती केंद्रे किती एफिशियनसीने चालतात हे जगजाहीर आहे. त्यांचे पोल्युशन वेगळेच.

एक मात्र शक्य आहे. भारतांत गॅस आणि तेलाचे नवे साठे सापडले तर. गॅस वर चालणारी गाडी जरा मऊ हाताने चालवली तर बऱ्यापैकी चालते. खर्च आज थोडा कमी येतो. बाकी मेंटेनन्स जमला आहे. पुन्हा गाडी डीझेल पेक्षा स्वच्छ असते. थोडीफार संवयीची झाली आहे.

तेलापासून निर्माण होणाऱ्या सगळ्या गोष्टी नजरेखालून घाला. प्लास्टिक, रंग, डांबर, आणि काय काय. त्यांचाही उपयोग कमी केला पाहिजे. सरकार फक्त पेट्रोल डीझेल च्या किमती वाढविते. तेलजन्य इतर वस्तूंच्या का नाही वाढवत? मग त्यांचा उपयोगही हळू हळू कमी होईल.

छोट्या गावात टांगे, धमण्या का नाही सुरू करू पुन्हा एकदा? एवढे लौकर लौकर जाऊन करायचे आहे काय? घोडे, बैल रिनयूएबल ऊर्जा वापरतात. शिवाय खतपाणी ही देतात. गावात कशाला पाहिजेत रिक्षा आणि टॅक्सी? आरामाचे जीवन जगायची संवयच राहिली नाही आपल्याला.

a

अगदी सिरियसली सांगतो आहे मी. इंजिनाची वाहने फक्त लांबच्या प्रवासाला वापरावीत. 10 -15 किलोमीटर अंतरा करता पशु वाहनेच वापरावीत. नक्कीच 10 ते 15 परसेन्ट तेल वाचेल आपले.

ट्रॅक्टर वगैरे ठीक आहेत. पण त्यांचा विनाकारणाचा उपयोग थांबविला पाहिजे. यावर कोण लक्ष देणार?

तर मग तेल आणि कोळसा वाचवायचा प्रयत्न करूया. मग आपोआप तो चलनाचा प्रॉब्लेम संपेल. मग कुणीतरी म्हटल्या प्रमाणे एक डॉलर एका रुपयाला मिळेल.

दिवास्वप्ने काय फक्त कवींनीच पहावीत काय, आम्ही इंजिनीयर काही कमी आहोत काय?

स्वर्ग की नरक

आम्ही असे ऐकले आहे की सात स्वर्ग असतात आणि सात पाताळ म्हणजेच नरक असतात. आता इथे पृथ्वीवर राहून तिथे काय असते ते कसे कळणार, म्हणून आम्ही फक्त कल्पनाशक्ती लढवून काय असेल त्याचा अंदाज घेतो. आम्ही असेही ऐकले आहे की माणसें इकडे पृथ्वीवर त्यांचे आयुष्य संपविल्यावर त्यांना घ्यायला तो देव यमराज त्याचे दूत पाठवितो. त्यांना फक्त इतकेच सांगितलेले असते की त्या अमुक तमुक माणसाचे आयुष्य संपले आहे, आता जाऊन त्याचा फक्त आत्मा काढून घेऊन या, त्याच्या बॉडीला हात लावू नका.

मग म्हणे ते दूत इकडे येतात, त्याचा पत्ता शोधतात आणि त्याचा आत्माच फक्त काढून घेऊन त्याचे शरीर इकडेच टाकून तो काढलेला आत्मा घेऊन जातात आणि यमराजाला तो आत्मा सबमिट करतात. मग यमराज त्या आत्म्याला चित्रगुप्त म्हणून एक जज्ज आहे, त्याच्या कोर्टात पाठवतो. असे म्हणे की या जज्जाकडे आपली सगळी फाईल अगोदरच पोचलेली असते. म्हणजे यमराजाचे नेटवर्क कधी फेल होत नाही. त्या नेटवर्कचा स्पीड नेहमी ज्यास्त आणि कॉन्स्टंट असतो, त्याला पॉवर प्रॉब्लेम येत नाही की फाईल करप्ट होत नाही. खरा डेटा असतो त्या फाईलमध्ये.

a

मग चित्रगुप्त ती फाईल वाचून ठरवितो की या आत्म्याला कुठे पाठवायचे ते. त्याच्याकडे बरेच चॉईस असतात असे ऐकले आहे. सात स्वर्ग आणि सात नरक, शिवाय बॅक टू पृथ्वी, किंवा दुसऱ्या ग्रहावर, अजून शिवाय म्हणजे कोट्यवधी जीव असतात. एवढे चॉईस असून तो गोंधळात कसा पडत नाही ते पहायला पाहिजे. त्याला कन्सल्टंट कोण असतात आणि त्यांची फी कोण आणि कशी देतो तेही पाहिले पाहिजे. ते कन्सल्टंट जुने आत्मेच असतात की आणि कोण तेही पाहावे लागेल. कदाचित हा नवीन आलेला आत्मा जॉब स्पेसिफिकेशन जुळले तर सामील करून घेत असतील तर अजून एक चॉईस झाला.

आता ही जी काही केस उभी रहाते त्यांत त्या नव्या आत्म्याला काय काय अधिकार असतात की तो समरी ट्रायल सारखा येईल त्याला तोंड देणारा असतो की काय हेही विचारांत घ्यायला पाहिजे. जर तो आत्मा कायद्याच्या बाबतीत अगदीच गांवढळ असेल तर त्याला मदत करायला कोण वकील असतो की स्वतःच त्याने डिफेन्स करायचा असतो ते समजून घ्यायला पाहिजे. तिथेही कोर्ट प्रोसिजर असेलच की, मग त्या कोर्ट प्रोसिजरचा उपयोग करून तारीख मागून घेता येते का नाही याचा अभ्यास करायला पाहिजे. मग तारखेवर तारीख करत केस वाट्टेल तेवढी लांबवायची एक संधी आहेच. हे छान जमेल आम्हाला.

a

समजा सगळी प्रोसिजर नीट होऊन एकदा कज्जाचा निकाल लागला तर तो आपल्यासारखा होतो की त्यांच्या सारखा तेही पाहावे लागेल. मग निकाल पटला नाही तर अपील कुठे करायचे ते शोधावे लागेल. अपिलेट कोर्टाचा जज्ज यमराज असेल तर प्रश्नच मिटला. त्याचे म्हणणे फायनल, आपल्या इकडच्या व्हाट्सअप्प ग्रुपच्या ऍडमिनसारखे. तो म्हणेल तो कायदा.

एवढ्या केसेस चालवून चित्रगुप्तही कायदेपंडित झालेला असेल. प्रत्येक वेगळ्या केसमध्ये बाहेर आलेले मुद्दे कायद्यांत समाविष्ट करून त्यांचाही कायदा असाच क्लिष्ट आणि पळवाटांनी समृद्ध झालेला असेल तर आपल्या केसचा निकाल कधी लागेल ते कसे सांगणार? आणि आपल्या त्या डिफेन्स वकिलांना फी काय आणि कशी देणार हे पहावे लागेल. ती फी कुठल्या चलनात द्यायची तेही बघावे लागेल.

जर इकडे पृथ्वीवर कुणीतरी सुचविल्या प्रमाणे इकडची दौलत कन्व्हर्ट करून तिथे पुण्याच्या (म्हणजे पुणे शहराच्या नव्हे, ज्याने कुणी या शहराचे नांव पुणे ठेवले आहे त्याला मानला, तो स्वर्गातच असेल बहुतेक), पुण्ण्याच्या, (इथे त्या चित्रगुप्ताने अनुवादात गल्लत न करावी अशी आशा आहे), स्वरूपांत पाठविली असेल तर ती आपल्याच अकाउंटला गेली कशावरून? म्हणजे काहीतरी प्रूफ पाहिजे आपल्यापाशी नाहीतर सगळेच मुसळ केरात. आम्ही इकडे सत्कर्म करायचे आणि दुसराच कोणीतरी त्याचे क्रेडिट घेऊन जायचा.

त्यांत पुन्हा कोणीतरी इन्फ्लुअन्स वापरून आपली दौलत कमी रेटने ज्यास्त पुण्ण्यात कन्व्हर्ट केलेली असली तर काय घ्या? लोकांचे काही सांगता येत नाही. करताही येत असेल असे. पण अकाउंट नंबर आणि नेटवर्क पक्के पाहिजे.

मग सगळे पॉवरफुल लोक स्वर्गातच सापडतील.

चला, धरून चालू की केसचा निकाल लागला आहे आणि आम्हाला कुठेतरी पाठवायची डिसीजन झालेली आहे. मग ते आम्हाला कुठे पाठवितात ते सांगणार की सरळ कोर्टांतच दुसरे यमदूत किंवा नरकाचे किंवा स्वर्गाचे जे कोणी पोलीस असतील ते आरोपीच्या पिंजऱ्यातच आम्हाला अटक करून जिथे न्यायचे तिथे नेतात हे स्पष्ट झाले पाहिजे. मानवी अधिकाराचे उल्लंघन झालेले आम्ही कधीच सहन करणार नाही. पृथ्वीवरची गोष्ट वेगळी होती, तिथे कुणी आम्हाला विचारत नव्हते पण चित्रगुप्ताचे कोर्ट तरी या बाबतीत ज्यास्त सेन्सिबल आणि सेन्सिटिव्ह असेल अशी आशा करूया.

तर आता प्रश्न उद्धवला कुठे पाठवायचे ते.

a

सात स्वर्ग आणि सात पाताळ यात नक्कीच वेगवेगळ्या कम्फर्ट लेव्हल आणि डिस्ट्रेस लेव्हल असतील. पहिली लेव्हल पृथ्वी सारखीच असावी अशी अपेक्षा आहे. सातवी एकदम एक्सट्रीम असेल अशीही अपेक्षा आहे. आता या एक्सट्रीम लेव्हलला काय काय असाव्यात याची चर्चा करू.

माझ्यामते या स्वर्गाच्या फायनल लेव्हलला आपल्याला काही काम करण्याची गरज नसावी. वेळच्या वेळी खाणे आणि पिणे, पगार वेळच्या वेळेला आणि फुल, काही कटिंग न होता, मनोरंजनाचे कार्यक्रम वगैरे, बोअर झालो तर खाली पृथ्वीवर काय चालले आहे त्याचे चॅनेल, अधूनमधून आपल्या अगोदर इथे आलेल्या आत्म्यांशी गप्पा गोष्टी त्यांचे इंटरव्ह्यू वगैरे असावेत. आम्ही इकडे पृथ्वीवर एकपत्नीव्रत स्वीकारले होते ते अजूनही अबाधित असेल. आणि आम्ही जर स्त्री असलो तरी एकपतीव्रत स्वीकारले होते तेही अबाधित असेल. मग त्या अप्सरा आणि ते यक्ष किन्नर वगैरे आमच्या काय कामाचे? उगाच हॉटेलच्या जाहिरातीत असतात तसे नको ते पर्क्स असतील ते.

त्याखालच्या लेव्हलमध्ये कम्फर्ट कमी आणि प्रॅक्टिकल ज्यास्त असतील म्हणजे पृथ्वीच्या पर्यावरणाच्या जवळपास. नरकाचे तसेच पण उलट्या क्रमाने. तिथे ते त्रास देणारे राक्षस सगळ्यात क्रूर सातव्या लेव्हलला आणि उतरत्या क्रमाने दुष्ट वरच्या वरच्या लेव्हलला. म्हणजे नरकाची किंवा स्वर्गाची पहिली लेव्हल पृथ्वीसारखीच असेल.

माहीत नाही, तिकडे काय कायदे चालतात ते. आपण खरेच स्वतंत्र असतो का ते विचारले पाहिजे. मुळांत आत्मा हा स्त्री किंवा पुरुष असतो का तो नपुंसकलिंगी होतो ते एक तो देवच जाणे. आम्ही पृथ्वीवर असे वाचले आहे की आपल्या पुण्याचा, पुणे शहराचा नव्हे, पुण्ण्याचा, किंवा पापाच साठा संपला की परत पाठवून देतात म्हणे.

पण आता मला सांगा कोणताही रिसोर्स, अगदी पापपुण्ण्याचाही अखंड आणि इंफायनाईट कसा काय असू शकतो? आणि तो साठा वापरला कसा जाणार? कोण ठरवणार की कोणत्या ऍक्शनला किती पुण्ण्य किंवा पाप वापरले ते? आणि आम्हाला त्याचा बॅलन्स किती राहिला ते कसे कळणार? नाही तर एका छान सकाळी डच्चू मिळायचा आम्हाला, मग भिकाऱ्यासारखे स्वर्ग आणि नरकाच्या रस्त्यावर पुण्ण्याची किंवा पापाची भीक मागत फिरावे लागेल किंवा तिथून डिपोर्ट होऊन परत आपल्या पृथ्वीवर माहितीच्या जागी यावे लागेल. फिर क्या डरना? कुठेही पाठविले तरी नो प्रॉब्लेम.

पुन्हा या स्वर्गाच्या निरनिराळ्या लेव्हलचे रेट ही ठरलेले असतीलच की. मग समजा तिसऱ्या किंवा चौथ्या स्वर्गात ऍडमिशन मिळालेली असेल तर तेवढ्याच पुण्ण्यात किंवा पापात ज्यास्त दिवस किंवा वर्षे रहाता येईल.

अरे हो, स्वर्गात किंवा नरकात दिवस महिने वर्ष असतात की नाही ते कुठे माहिती आहे आम्हाला? का एकदा मिळाला तो मिळाला असे असेल का? मग तिकडे पॉपुलेशन कंट्रोलचे काय? स्वर्गात किंवा नरकात अनलिमिटेड जागा असतात काय? मग इकडे पृथ्वीवर नवे जीव कसे आणि कुठून येतात? स्वर्गात आणि नरकात सर्क्युलेशन असणारच. मग ठीक आहे. थोडा काळ राहू मग परत जाऊ पृथ्वीवर. तोपर्यंत इकडची परिस्थितीही बदललेली असेल की.

जे स्वर्गात तेच नरकातही असेल अशी आशा करूया. तिथेही हिशेब ठिशेब असेच असतील अशी अपेक्षा आहे. तिकडे चलन म्हणजे पाप आणि अकाउंटिंग तसेच. म्हणजेच वरच्या लेव्हलच्या नरकात मुक्काम पापाच्या रेट प्रमाणे. मग जेवढे पाप ज्यास्त तेवढा काळ ज्यास्त कारण रेट कमी असणार. पण पुढच्या लेव्हलना वेळ कमी पण अनुभव ज्यास्त इंटेन्स, कारण पाप कमीज्यास्त वापरले जाणारे लेव्हल प्रमाणे. म्हणजे आपल्याकडल्या किलो वॅट अवर्स प्रमाणे.

म्हणजे पुण्य किंवा पाप चार्जे केलेल्या बॅटरी सारखे किलो वॅट अवर्स मध्ये असेल. वापर कमी तर वेळ ज्यास्त.

जर असे आहे तर मग ठीक आहे. म्हणजेच की पुण्य असो की पाप तेही फायनाईटच असेल. कायमचे तिथेच रहावे लागणार नाही तिथे.

आम्ही पृथ्वीवर टूर किंवा हॉलिडे करायला जात होतो तेंव्हाही असाच हिशेब आणि प्लॅनिंग करत होतो. माहितीचा आहे हा मुद्दा.

म्हणजे पर्मनंट कुठेच नाही. सगळेच मुसाफिर. आज आले आणि उद्या गेले. लेव्हल प्रमाणे जेवढे दिवस, किंवा वर्षे रहाणार तेवढेच. बोगदा अगदीच अंधारा नाही हा. बोगद्याच्या पलीकडे उजेड दिसतो आहे.

अगदी हॉटेलमध्ये सुद्धा आपला साठा बघूनच आम्ही लेव्हल कुठली घ्यायची ते ठरवतो आपण. फक्त इथे ठरवणारा चित्रगुप्त आहे किंवा अगदीच अपील केले तर यमराज.

आता हे स्वर्ग आणि नरक कुठे आहेत त्याचा विचार करून ठेवला पाहिजे. पृथ्वीवरचा स्वर्ग म्हणजे काश्मीर. पण तिथे एकाच वेळी स्वर्ग आणि नरक आहे म्हणे. त्यामुळे कल्पना करता येणे जरा अवघड आहे.

महाभारताचे पुस्तक वाचतांना समजले आहे की स्वर्गात कधीच पाऊस पडत नाही, अंधार होत नाही आणि मधुर सुगंधी वारे वाहत असतात आणि नरकात सगळीकडे तेलाच्या आगी असतात असे. म्हणे की स्वर्गात उकडत

नाही आणि नरकात आपल्याला तेलात तळतात म्हणून आणि भारीच उकाडा असतो तिथे.

पण मुंबईतही उकाडा असतोच आणि मोटारींचे तेलकट गरम वारे असतात अगदी कधीही. उकाड्याला कोण भितो इथे, त्यातही दादरच्या फूल मार्केटच्या ब्रिज खाली ऑगस्ट महिन्यात पाऊस पडत असताना, गटारे वहात असताना, संध्याकाळी लोकल मधून प्रवास करून आल्यावर जी परिस्थिती असते त्यापेक्षा तो सातवा नरक ही बरा असेल. जर त्याला तोंड दिले आहे तर मग कशालाही तोंड देता येते आम्हाला.

राहता राहिला सातव्या स्वर्गाचा अनुभव. पण या वर सांगितलेल्या जागेपेक्षा दुसरी कुठलीही जागा एसी सारखी असेलच. मग भ्यायचे कशाला. आम्ही अगदी व्यवस्थित राहिलो आहोत अश्या जगांत.

तर आम्हाला स्वर्गाचे आकर्षण आणि नरकाची भीती मुळीच वाटता कामाची नाही.

आणि एक विसरून चालणार नाही. आक्खा जन्म घालवला आहे इंजिनियरिंग करून लोकांचे आयुष्य सुलभ आणि सोपे करायचा. मग पाप किती मिळविले आणि पुण्य किती ते ठरवायला त्या चित्रगुप्तालाही भारी पडेल.

आम्ही काही लोकांचे गळे कापले नाहीत की त्यांच्या खिशांत हात घातले नाहीत. आम्ही कधी राजकारण केले नाही आणि लोकांचे तळतळाट घेतले नाहीत. आणि यमराज किंवा चित्रगुप्त हे काही इंजिनीयर नव्हते आणि नाहीत. मग ते आमच्या कारकीर्दीचे परीक्षण कसे करणार? उलटे आम्हीच त्यांचे अमिकस क्युरी होऊन त्यांना मदत करू.

जेंव्हा कधीतरी मुंबईहून पुण्याला (म्हणजे शहर पुणे) येऊन राहिलो आहोत तेंव्हा स्वर्गाचा थोडातरी अनुभव घेतलाच आहे. तसेच मुंबई मध्ये नरकाचाही. आम्हीच त्या नरकात स्वर्ग उभारू. तिथे व्हेंटिलेशन, एसी लावून त्या दोघांना खूष करू. मग ते आम्हाला सोडणारच नाहीत पुन्हा पृथ्वीवर. तिघेच महाल किंवा बंगला वगैरे बांधून पर्मनंट रेसिडेन्सी परमिट देतील.

तर भाऊ किंवा ताई, ज्यास्त काही विचार करू नका. दौलत कन्व्हर्ट वगैरे करू नका, ती इथेच एन्जॉय करा. जो इधर कमाया वोह इधरही रक्खो.

नाही तो इंप्रॅक्टिकल विचार करू नये हेच चांगले. कसले कन्व्हरशन आणि कसला रेट ऑफ कन्व्हरशन. सोडा ते. मजेत रहा. पुढचे पुढे पहाता येईल.

तबला

माणसाला विविधता पाहिजे. त्याच त्या गोष्टींचा लगेच कंटाळा येतो. मग आम्हीही वेगळे कसे असणार. गप्पा मारणे हा एक विविधता मिळवायचा एक बेस्ट उपाय. गप्पा मारायला कुणाला आवडत नाही? त्यातही मित्रमंडळ असावे, जागा मस्त असावी, कुठलेही टेन्शन नसावे आणि पाच सहा टाळकी असावीत की गप्पांचा अड्डा बसलाच समजा.

हॉस्टेलची खोली असावी, कुणाचीही, जेवण खाण झालेले असावे, पाच सहा टाळकी एकत्र असावी की झाल्या सुरू गप्पा. सुरुवात एक विषयावर होऊन हळूहळू दुसऱ्या विषयांत कसे ट्रान्झिशन होते ते अजब असते. सुरुवात कुठूनही होते. आणि भाग घेणारे कमी जास्त होतात.

साडेसात ते आठ

आज ड्रॉईंगच्या क्लासमध्ये सरांनी कोल्हापूरच्या पाटलाचे कसे वर्णन केले इथे झाली सुरुवात. आज सरांनी कोल्हापूर पाटील म्हणजे एक एकर ऊस आणि बुलेट मोटरसायकल, असे वर्णन केले होते. कोल्हापूरच्या लोकांना बुलेट का एवढ्या आवडतात? तिथे किती बुलेट विकल्या जातात. तो पाटील बुलेट कशी चालवत जातो, तिचा आवाज कसा पुरुषी असतो, बाकीच्या मोटरसायकल

कश्या बायकी वाटतात. मोटर सायकल पुढे स्कूटर कशी अगदीच बावळट वाटते.

आठ ते साडेआठ

आजकाल मुलगे मोटर सायकल कशी तडफेने चालवतात. बायकांना स्कूटरच चांगली. रोमन हॉलिडे मध्ये ग्रेगरी पेक त्या ऑड्री हेपबर्नला रोम मध्ये स्कूटर वर फिरवून आणतो. ब्लॅक अँड व्हाइट पिक्चर असून किती छान आहे तो. आपल्याकडे असे पिक्चर का बनवत नाहीत. आम्हाला ब्लॅक अँड व्हाइट पिक्चरच आवडतात. ब्लॅक आणि व्हाइट पिक्चर मध्ये गाणी किती छान असतात. एस डी बर्मन सारखा संगीतकार कधी पाहिला नाही. काय मस्त म्युझिक दिले आहे त्याने तेरे घर के सामने ला. देव आनंद आणि नूतनची जोडी किती हिट पिक्चर देते.

साडेआठ ते नऊ

माझा आवडीचा नट मात्र धर्मेंद्र आहे. कसली बॉडी आहे त्याची नाहीतर राजेश खन्ना! धर्मेंद्र आणि मीना कुमारीचा फूल और पत्थर पाहिला का? धर्मेंद्र आणि मीना कुमारीचे लफडे आहे, त्यांना खूप लोकांनी जुहू बीच वर रात्री फिरतांना पाहिले आहे. शर्मिला टागोरने फेरारी गाडी घेतली आहे. भगवान दादाकडे तेवीस गाड्या होत्या. या लोकांकडे एवढे पैसे कुठून येतात? एक पिक्चरला किती घेत असतील?

नऊ ते साडेनऊ

मी इंजिनीयर झाल्यावर पहिल्यांदा बाबांना सांगणार की मला मोटर सायकल पाहिजे, स्कूटर नको. मोटर सायकल पेक्षा गाडीच चांगली. आज फियाट, स्टॅंडर्ड आणि अंबॅसेडर सोडून दुसऱ्या गाड्या का नाही बनत. आपले गवर्नमेन्ट एकदम फालतू आहे, त्यांना काही पॉलिसीच नाही. गव्हर्नमेंट आपल्यासारख्या इंजिनीयरना डायरेक्ट चीफ इंजिनियरची नोकरी देणार आहे.

साडेनऊ ते दहा

काँग्रेस एकदम बेस्ट पार्टी आहे. जनसंघवाले असे का वागतात. सगळ्यांनी संघाची वाट लावली आहे. काँग्रेसने एवढे कारखाने सरकारात काढले म्हणून आपला देश पुढे येतो आहे. तुम्हाला आतली लफडी माहीत नाहीत! सगळेच पैसे खातात. एक किलो साखर मिळायला किती वांधे येतात आणि हा म्हणतो की दुसरे सरकार आले की तांदूळ फ्री होणार म्हणून. मिळेल तेंव्हा मिळेल. आणि चहात काय तांदूळ घालणार काय?

सव्वादहा

चला सबमिशन करायचे आहे. चहा पिऊन येऊ आणि जीटी मारू रात्रभर.

पहा विषय कुठून सुरू झाला आणि कुठे कुठे फिरून आला. आणि शेवटी सबमिशनवर येऊन थांबला.

तीन सव्वातीन तास चाललेल्या या "चर्चेला" म्हणतात तबला! हे फक्त तबल्याचे हायलाईट्स सांगितले आहेत. प्रत्यक्ष चर्चा बरीच डिटेल मध्ये असायची. त्या चर्चेची भाषा गावरान ते ग्राम्य ते ग्रामीण ते सभ्य ते अतिसभ्य ते आदरपूर्ण इतकी रेंज असलेली असायची.

तबला करायला काही विशेष काळ वेळ लागायची नाही. कुठलीही खोली चालायची हॉस्टेल मधली. संध्याकाळी सात वाजता बाहेर पाऊस आहे म्हणून सुरू झालेला तबला रात्री अकरा वाजेपर्यंत चालायचा, अगदी आरामात. त्यात रविवार असला आणि सकाळी फीस्ट झालेली असली की मग व्यत्यय आणायला संध्याकाळच्या जेवणाची वेळ नसायची.

तबल्याला विषयांचे बिलकुल बंधन नसते. अगदी कडक इंजिनियरिंगच्या विषयांपासून ते नट नट्या चालतात. त्यांतही तबलावाले ग्रुप म्हणजे अवलिया मिक्स्चर असत. त्यांत स्कॉलर, घासू, काठावरचे पास, गायक, वादक, सिनेमा एक्सपर्ट, राजकारणात "मुरलेले", लीडर, कार्यकर्ते, गणिती आणि शात्रज्ञ असायचे.

a

त्यातल्या त्यात राजकारणावरच्या गप्पा सुरू झाल्या तर सरळ सरळ तट पडायचे आणि प्रसंगी हमरीतुमरीवर प्रकरण येऊ घालायचे. तासंतास चर्चासत्र चालायचे.

मी SE ला असतांना एकदा D2 हॉस्टेल मध्ये तबला सुरू झाला आणि तो सरळ भेंड्या खेळण्यावर आला. दोन ग्रुप झाले आणि जी काही मैफल रंगली त्यांत सगळ्या प्रकारची गाणी गाऊन झाली. शिवाय आवडलेली गाणी लिहून काढायचे वायदे झाले आणि चार पाच शंभर पानी वह्या भरून गाणी जमली. पुढच्या दोन तीन गॅदरिंग मध्ये गाणी म्हणायची सोय झाली.

तबल्याला त्यातल्या त्यात धोक्याचा विषय म्हणजे आमच्या प्रोफेसरांच्या आठवणी. प्रोफेसरांच्या फार जवळच्या लोकांनी खालील परिच्छेद जपून वाचावा. थोडा नाजूक मामला आहे तो.

प्रोफेसरांना टोपण नावे ठेवणार नाही तो विद्यार्थी कसला. विषय सुरू होऊन नेहमी सारखा सरांच्या टोपणनांवांच्या इतिहासात शिरायचा. टोपण नावे नुसतीच कोणी घेतात का? सरांच्या शिकविण्याच्या आणि इतर लकबींची कॉपी करणे आलेच. मग काही भक्तांना रागही यायचा. मग जाऊ रे, गम्मत करतो आहे थोडी म्हणून विषय थांबायचा.

a

काही काही बिनधास्त लोक असतातच, त्यांनी कॉलेज मधल्या सगळ्या टोपण नावांची उजळणी केली. म्हणजे त्यात आमचीही आरती झालीच. आमचे ते "चार्ली" नाव कुणी, कसे, का ठेवले, त्याच्या नंतरच्या गोड मित्रांनी केलेला "चार्ल्या" असा बदल कसा झाला त्याचे गुणगान गाऊन झाले. मी ख्रिश्चन नसून एक हिंदू देशस्थ ब्राम्हण मुलगा आहे यावर आश्चर्य व्यक्त करून झाले. मग शोधून शोधून सगळ्या टोपणनावधारी लोकांचे पुन्हा एकदा नामकरण झाले.

परीक्षेच्या काळांत तबल्याला अघोषित बंदी असायची. वेळ कुठला असायचा कुणाला. तबल्याचा सीझन म्हणजे जुलै ऑगस्ट किंवा डिसेंम्बर जानेवारी, कारण तेंव्हाच सेफ वातावरण असायचे. फार लौकर मुले एकमेकांना जवळून ओळखत नसायची आणि फार नंतर परीक्षा आणि सबमिशन वगैरेचे सीझन असायचे.

कॉलेज संपले आणि तो तबला संपला. करियर चा तबला सुरू झाला तो चांगला पंचेचाळीस पन्नास वर्षे वाजला.

आता या वालचंद १९७१ ग्रुपवर पुन्हा तेच लोक एकत्र आले. भले पन्नास वर्षांचा "अनुभव" गाठीला आहे त्यांच्या. पण बेसिक वृत्ती तीच. कोणताही विषय असो, डिबेट करायला सदा तयार. तसेच गटतट, तसेच विचार, तीच सांगायची स्टाईल. काय बदल झाला पन्नास वर्षांत? जवळ जवळ काहीच

नाही. फक्त सगळे डुड्ढाचार्य झालेत वयोमानाप्रमाणे. त्यामुळे ऐकवितात ज्यास्त आणि ऐकतात कमी.

पण बघा, त्या कला, ते विषय, त्या गोष्टी, ती गाणी, ते ऍक्टिंग, ती चित्रे, ती कुठे बदलली आहेत. तोच नजारा आहे आणि तोच उत्साह. तसेच गंभीर लोक आणि मजामारु लोकही आहेत. चावटपणा आणि सिरीयस पणा तसाच आहे.

पूर्वी फिजिकल तबला होता आता इलेक्ट्रॉनिक तबला आहे. पृथ्वी पन्नास वर्षे फिरलीच नाही असेच वाटते आहे. फक्त त्यावेळी तबला होस्टेलवर चालायचा किंवा मधुबन मध्ये किंवा अश्याच कुठल्यातरी अड्ड्यावर. आता तो चालतो आहे घरबसल्या. मग काय, घ्या भाग.

एकूण, तबला काही आपल्याला सोडत नाही.

मंजन एक्सप्रेस

आम्हाला रेल्वे आणि विमानांचे भलतेच वेड आहे. अगदी लहानपणापासून आगगाड्या बघत बसायची संवय आहे. मुंबई मध्ये १९५५ मध्ये स्थायिक झाल्यावर मुंबईची ट्रॅम आमच्या आकर्षणाचे केंद्र झाले. ट्रॅम ही एक रेल्वेच आहे.

रस्त्याच्या आत घातलेले तिचे रूळ रस्त्या सरपट असतात. ट्रॅमच्या चाकांना मोठ्या रेल्वे सारख्याच कडा, म्हणजे फ्लँजेस असतात. त्यांच्यासाठी रुळालाच एक विशिष्ट गटर केलेले असते, त्या रुळाला ट्रॅमरेल म्हणतात. मुंबईची ट्रॅम आम्ही पाहत असल्यापासून विजेवर चालणारी होती. तिला वीज पोचविण्यासाठी वर एक तार टांगलेली होती. ट्रॅमच्या छपरावर एक तांब्याचा दांडा आणि त्या दांड्याला एक तांब्याचे पुली सारखे दिसणारे एक चाक असायचे. तो दांडा त्या चाकाला वरच्या तारेत अडकवून ठेवायचा. ७५० डीसी सप्लाय वर ती ट्रॅम चालायची. परत फिरलेला करंट रुळांत जायचा.

पण ट्रॅम ही छोटी रेल्वे. तिच्यांत तो मोठ्या रेल्वेचा रुबाब नाही. खरी रेल्वे ती खऱ्या रुळावरून जाणारी, इंजिनाने ओढलेली. मुंबईच्या लोकल मोठ्याश्या ट्रॅम सारख्याच. इंजिनाच्या गाड्या त्याच खऱ्या.

a

तबला शिकायला जातांना, खरे म्हणजे क्लास मधून परत येतांना, सँडहर्स्टरोड ब्रिजच्या कोपऱ्यावर उभा राहून येणाऱ्या जाणाऱ्या रेल्वेगाड्या पहाण्यांत आम्ही अर्धा पाऊण तास घालवीत असू. त्यांतही इंजिनवाली गाडी दिसली की ज्यास्त मन लावून पहायचे.

कधीतरी मुंबईहून पुण्याला जातांना रेल्वेत खिडकीची जागा तरी मिळवायची किंवा कमीत कमी खिडकीत उभे तरी रहायचे. रेल्वेगाड्यांशी आपले नाते थोडे दुरावले सायन्स कॉलेज मध्ये असतांना. पण वालचंद कॉलेजला ऍडमिशन मिळाली आणि ते पुन्हा जुन्या मित्रा सारखे उसळून आले.

पुण्याहून मिरजेला यायला मीटर गेज च्या गाडीत बसल्या बसल्या त्या डोलत जाणाऱ्या गाडीची मजा वाटली. आतापर्यंतच्या सगळ्या गाड्या ब्रॉडगेजच्या, त्यांना डोलणे येत नाही. आणि आता पर्यंत कोल्हापूर पर्यंतचा सगळा प्रवास रात्री केलेला. त्यामुळे मजा काही लुटता आली नव्हती. आता मात्र दिवसा, आणि एकटा, मिरजेला जातांना डोलणाऱ्या गाडीची लज्जत लुटत प्रवास केला. एकदम मनात भरली ही गाडी.

मिरजेला पोचल्यावर दुसऱ्या दिवशी ऍडमिशनचे पैसे भरायला मिरज सांगली रेल्वेने प्रवास केला, तरुण झाल्यावर पहिल्यांदाच. मेनलाईन पेक्षा छोटे इंग्लिश मेकचे इंजिन सहा डब्याच्या गाडीला कसेतरी ओढत सांगलीला नेऊन

आणायचे. एकदा ऍडमिशन घेतल्यावर आणि रेल्वे जवळच्या D2 ब्लॉक मध्ये खोली मिळाल्यावर दररोज गाड्यांचा "अभ्यास" सुरू झाला. दर तासाला एक गाडी अप किंवा डाऊन जायची. सकाळी पाच ते साडेदहा पावणे अकराला सकाळची शिफ्ट आणि दुपारी एक ते रात्री दहा वाजे पर्यंत दुपारची शिफ्ट होती त्या गाड्यांची. अकरा ते एक एखादी मालगाडी यायची मिरजेहून सांगलीला आणि रात्री बाराला एखादी.

हळू हळू जशी वर्गमित्रांची आणि हॉस्टेलमित्रांची ओळख होत गेली तसतशी या गाड्यांचीही. संध्याकाळच्या पाचच्या गाडीला "मंजन एक्सप्रेस" असे नांव ठेवल्याचे कळले. रात्री आठची ती "मंजन मेल". हॉस्टेलवाल्यांना सांगलीला ये जा करायला या गाड्या बेस्ट. पण "मंजन" म्हणजे काय? नंतर जाणकारांनी सांगितले की मंजन म्हणजे "फ्री राईड". आम्हाला पूर्वीचे महान सिनियर खूप होते, त्यांचे न मानणे आम्हाला परवडण्यासारखे नव्हते. उगाच आपली रात्री बेरात्री धिंड निघायची हॉस्टेल मध्ये. त्यापेक्षा मग त्यांची आज्ञा प्रमाण म्हणून आम्हीही ते नांव स्वीकारले. या गाड्यांनी प्रवास करणारे जे कोण असतील त्यांनी तिकीट काढले असेल तर त्यांना भ्याड समजावे अशी अनऑफीशियल दवंडी पिटलेली होती म्हणे.

a

चला, नाव तर कळले. पण एक्सप्रेस का? कारण ती गाडी वानलेसवाडी आणि विश्रामबाग आणि सांगली च्या मधल्या राधास्वामी (पाटीवरचे नांव "राधासोआमी") सत्संग बियासच्या प्लॅटफॉर्म वर थांबत नसे.

वानलेसवाडी एकेकाळी स्टॉप होता नंतर तो काढून टाकला. तिथे एक हॉस्पिटल होते आणि तिथे कुष्ठरोग्यांची ट्रीटमेंट चालायची. या गाड्यांचा मिरजकडल्या पहिल्या डब्यांतला पहिला कंपार्टमेंट हा अघोषित रिझर्व्ह होता ते फार उशिरा समजले. त्या कंपार्टमेंट मध्ये कुणी बसायचे नाही असा दंडक होता म्हणे. पण आम्हाला त्याची विशेष भीती कधीच वाटली नाही.

आमचा खोलीबंधू आमच्या सारखाच रेल्वेगाड्यांचा हौशी, चिकित्सक आणि चौकस होता. तो सोलापूरचा, त्यामुळे त्याच्या प्रवासात त्याला भारतातल्या चार पैकी तीन गेजच्या गाड्या एन्जॉय करता यायच्या. सोलापूर ते कुर्डुवाडी ब्रॉड गेज, कुर्डुवाडी ते मिरज आपली देवाची गाडी नॅरोगेज "डकाव डकाव" बार्शी लाईट आणि शेवटी आमची मंजन एक्सप्रेस. मग काय, आम्ही मंजन एक्सप्रेसचा रिसर्चच सुरू केला.

आम्हाला लाईन वगैरे मारायला जायची आवड नव्हती. नंतर जन्मभर हे करायचेच आहे असा मॅच्युअर विचार होता. त्यामुळे आम्ही फिरायला मिरजेच्या बाजूला जायचे आणि ते सुद्धा रेल्वेच्या काठाकाठाने. एकदा थोडे

a
डायव्हर्शन करून कृपामयीच्या फाटकाला पोचलो. तिकडे बघितले तर काय, परफेक्ट लाईन, दणदणीत साठ पौंडी रूळ, स्लीपर वगैरे व्यवस्थित, ट्रॅक कसा दणकट. या विरुद्ध आमच्या मंजन एक्सप्रेसची लाईन कशीतरीच. हडकुळे ३५ पौंडी रूळ, स्लीपर सगळे वाकडे तिकडे, लांब लांब बसवलेले. बघून अति दुःख झाले आम्हाला. आम्ही म्हणजे मी, आमचा रूम पार्टनर आणि अजून दोन तीन वॉकिंग पार्टनर.

आमच्या लाईनला असा दुजाभाव कां? आम्ही काय तिकिटाचे पैसे देत नाही का? का राजाची लाईन म्हणून सापत्न भाव? पण आता ती राजाची लाईन कुठे राहिली होती? सदर्न रेल्वे झाली होती ना? तरी असे कां?

रेल्वेचे सिग्नल फक्त सांगली आणि मिरजेला होते. मध्ये एकही सिग्नल नव्हता.

मिरज सांगली ही एक दुर्लक्षित रेल्वे होती. पण दररोज सांगलीला ये जा करणाऱ्या आणि वालचंद कॉलेज, विलिंग्डन कॉलेज आणि चिंतामणराव कॉमर्स कॉलेजला असलेल्या विद्यार्थीगणांना तिचा हमखास आधार होता. रेल्वेचे तिकीट १० पैसे आणि तीन महिन्यांचा पास सहा रुपये असल्याने ती खूपच सोयीची आणि स्वस्त होती. अर्थातच त्यावेळच्या आमच्या "उत्पन्नाच्या" मानाने. पण तिचे डबे म्हणजे मेन लाईन वरून रिटायर केलेले.

इंजिने छोटी, अशक्त. कृपामयीचा स्लोप चढतांना त्या इंजिनांच्या नाकी नऊ यायचे. मिरजेच्या पुढे कोल्हापूरच्या लाईनवर मात्र मेन लाईनची इंजिने जायची. पण कोल्हापूरला इंजिन फिरवायचा गोल छोट्या इंजिनांचाच होता. मग ही मेन लाईन इंजिने सरळ तोंड करून कोल्हापूरला जायची आणि उलटी, रिव्हर्स मध्ये परत यायची. ज्यास्त करून मालगाड्या न्यायला ती वापरली जात.

सांगलीला मात्र इंजिने फिरवायचा गोल होता आणि कधी कधी आम्हीही इंजिन कसे फिरवितात ते पाहून मग आपले जे काही "काम" असेल ते करायला जायचे. गाडी सांगलीला पोचल्यावर इंजिन सोडवून, फिरवून परत दुसऱ्या बाजूला जोडेपर्यंत गाडीची वेळ झालेली असायची.

अगदी खरे खरे सांगा, ईश्वरसाक्ष, की कोण असा प्राणी आहे की जो गाडीचे इंजिन काढतांना आणि जोडताना बघत उभा राहत नाही? अजूनही असे प्राणी दिसतात! आम्ही आहोत बुवा असे.

तशी सांगली मिरज मध्ये माल वाहतूक दररोज असायची. बिचारी ती इंजिने आणि त्यांचे ते हतबल ड्रायवर! दररोज रात्रीची दहाची गाडी गेली की रात्री मालगाडी यायची बाराच्या सुमाराला. एकेकदा आमच्या हॉस्टेल जवळचा सोपा स्लोप चढतांना त्या इंजिनाची दमछाक व्हायची आणि ते धापा टाकत उभे राहायचे, स्टीम प्रेशर पुन्हा चढे पर्यंत. मुले होस्टेलच्या गॅलरीतून त्या इंजिनाची

हुर्यो उडवायची. कधीकधी सात आठ डब्यांच्या मालगाडीला दोन दोन इंजिने लावायला लागायची. मेन लाईन ची इंजिने इथे येत नसत कारण रूळ लहान ३५ पौंडी होते आणि लाईन बी क्लास होती.

पण आमच्या विश्रामबाग स्टेशनला मालगाडीचे सायडिंग होते!

१९६७-६८ मध्ये काही दिवस या आमच्या मंजन एक्सप्रेसच्या लाईनला थोडे बरे दिवस येता येता जस्ट हुकले. वसंतदादांच्या सांगलीत विश्रामबागला काँग्रेसचे अधिवेशन घ्यायचे ठरले. एका आठवड्यांत लाईनला नवचैतन्य आले, मिरजेहून सामानाचे ढीगच्या ढीग येऊन पडले. विश्रामबागला नवी झळाळी येऊ पाहिली. नवा प्लॅटफॉर्म होणार की काय असे वाटू लागले. एकदम दिवस रात्र गडबड सुरू झाली. पण हाय रे दैवा, तो १९६७ चा कोयनेचा भूकंप झाला आणि सगळे बिनसले. अधिवेशन रद्द झाले आणि आमच्या लाईनला येऊ पाहणारी समृद्धी निघून गेली. पुन्हा सगळे भकास आणि वैराण झाले.

मग त्यानंतर पुणे मिरज ब्रॉडगेजचे काम सुरू झाले. सांगली आणि विश्रामबाग स्टेशने कुठेतरी दूर निघून गेली आणि आमच्या मंजन एक्सप्रेसची लाईनची मृत्यूघंटा वाजू लागली. १९७१ मध्ये मार्चच्या शेवटी शेवटी ब्रॉडगेज गाडी मिरज आणि पुण्या दरम्यान सुरू झाली. आम्ही त्या पहिल्या ब्रॉडगेजच्या गाडीने मिरज विश्रामबाग (नवे) प्रवास केला. कोल्हापूर मात्र मोठे केंद्र

a
असल्याने त्या मिरज कोल्हापूर लाईनची भरभराट झाली. तिथे ब्रॉडगेज गाडी लौकरच पोचली.

१९७१ च्या फेब्रुवारी मार्च महिन्यांत आमच्या मंजन एक्सप्रेसची शेवटची गाडी, रात्री दहाची, धावली. आम्ही तिला दुःखाने निरोप दिला, इंजिनापुढे कोकाकोलाच्या बाटल्या रित्या केल्या, ड्रायव्हरचा थोडासा सत्कार केला, वालचंद कॉलेजच्या गेट जवळ. दहा पंधरा मिनिटे ती गाडी आपली ती गोडशी शिट्टी वाजवत उभी राहिली गेट समोर. मग हळू पावलांनी निघून गेली मिरजेला आणि आमची लाडकी मंजन एक्सप्रेस लाईन इतिहास जमा झाली. विश्रामबाग आमचे लाडके स्टेशन एक साईड स्टेशन म्हणून दूर कुठेतरी नांदू लागले.

आमची मंजन एक्सप्रेस एक ऐतिहासिक आठवण राहिली.

नवी पिढी नवी दृष्टी

या दुष्ट करोनाने आम्हाला घरी बसवून जो काही छळ करायचा प्रयत्न केला आहे त्यांत तो यशस्वी होण्यापेक्षा अयशस्वीच ज्यास्त झालेला दिसतोय. कारण त्याने आम्हाला घरबंदी केल्यामुळे आम्हाला फॅमिलीकडे बघायची एक नवी दृष्टी त्याने दिली आहे. घरांत बंद केल्यामुळे एकतर आम्हाला घरच्या ऍक्टिव्हिटी मध्ये सक्रिय भाग घेण्याची संधी मिळाली ती गेल्या पन्नास वर्षात एवढी ज्यास्त मिळाली नाही किंवा आम्ही ती घेतली नाही.

आपल्याला जमेल ते काम मागून घ्यावे आणि ते करतांना नवा आनंद घ्यावा हे आम्हाला सुचले हे काय कमी आहे? आता स्वयंपाक करणे जरी जमू शकले असते तरी आपला पिंड नव्हे तो. "जेणू काम तेणू थाय, बीजा करे तो गोता खाय" या संतवचना प्रमाणे सगळ्या फॅमिलीचे आरोग्य पणाला लावून स्वयंपाक करणे कधीच आवडले नसते आम्हाला. म्हणून आम्ही फक्त भांडी घासण्याचे काम आपल्या डोक्यावर घेतले ते पूर्वीच स्पष्ट केले आहे.

त्या नंतरचे भांडी घासताना आम्ही केलेले चिंतन आपण मागेच वाचले आणि समजावून घेतलेच असेल.

a

भांडी घासताना, ते अगदी आनंदाने, भांड्यांचे निरीक्षण करण्याची संधी मिळाली. आता आम्ही भांड्यांच्या तीन पिढ्यांचे निरीक्षण केले आहे. पहिले म्हणजे आमच्या आईच्या काळातली, नंतर आमच्या स्वतःच्या काळातली आणि आता आमच्या मुलांच्या काळातली भांडी कसकशी रुपडे पालटत गेली आहेत ते नवलपूर्ण आणि डोळे उघडणारे आहे.

आमच्या आईच्या काळात स्टेनलेस स्टीलची भांडी आत्ता कुठे येऊ लागली होती. पराती, ताटे, घागरी, डबे, पिंप, बंब, पळ्या, पाणी पिण्याची भांडी आणि ग्लास, वाट्या वगैरे पितळेची किंवा तांब्याची होती. स्टेनलेसची भांडी सणासुदीला बाहेर पडायची. घरांत बंब आणि तो सुद्धा कोळसा किंवा लाकडाच्या ढलप्या वर चालणारा असल्याने राखेची अजिबात टंचाई नव्हती. नारळ तर काय जिकडे तिकडे. ते सुद्धा चांगले केसाळ. त्यामुळे त्याच्या शेंड्या आयत्याच घरांत होत्या. त्यामुळे भांडी घासायला हे मटेरियल अगदी भरपूर होते. हां, ते स्वयंपाकघरची मोरी राखेने भरून टाकायचे आणि न्हाणी चोक व्हायचा प्रॉब्लेम दररोजचा होता.

आणि पितळेची भांडी घासली तर सोन्यासारखी चकचकीत नाहीतर काळीकुट्ट व्हायची, त्यामुळे दररोजची भांडी तर घासायचीच शिवाय अधून मधून डबे, पिंपे, बंब असे महिन्याला अंघोळी करणारे मेंबर घासायला यायचे दोन तीन आठवड्याने आळीपाळीने.

जिकडे एकमजली बंगलेवजा किंवा छपराची घरे होती तिथे भांडी घासायला बाहेर नळावर नेता येत होती आणि हा चोकिंग चा प्रॉब्लेम तसा लाईट होता. पण शहर गावात, त्यातही मुंबई सारख्या मल्टिस्टोरी बिल्डिंग मध्ये ही अडचण जर ज्यास्तच होती. भांडी घासायला गडी ठेवायची पद्धत रूढ होती, कारण गडी नसला तर "एक गडी ही परवडत नाही की काय?" असे टोमणे ऐकण्याची पाळी यायची. गडी काय, भांडी घासल्यावर उरले सुरले न्हाणीत लोटून द्यायचा. नळाला पाणी बेताचे मग ते तसेच साठून न्हाणी चोक व्हायची. मग कधीतरी झाडूवालीला बोलवून ते सगळे मोकळे करून घ्यायचे. अडचणीचे होते सगळे तेंव्हा.

पण आईच्या राज्यांतच हळू हळू स्टेनलेस ची भांडी येऊ लागली. ती घेतानाच ही साबणाने धुवायची, घासायची नाहीत पूर्वी सारखी, नाहीतर त्यांची चमक जाईल हे दुकानदारच ठासून सांगू लागले. त्यामुळे राख आणि नारळाच्या शेंड्याच्या जागी सनलाईट साबण आणि नव्या जातीच्या घासण्या आल्या. राख आणि नारळाच्या शेंड्या रिटायर झाल्या. हळूहळू देशाची प्रगती होत गेल्यामुळे नळालाही कधी कधी पाणी येऊ लागले. पण नळाचे पाणी हे वाळवंटातल्या नदी प्रमाणे दुर्लभ असल्यामुळें नळाला पाणी असतांनाच भांडी धुवून, घासून नव्हे हो, घेण्याची सिस्टीम लागू झाली. अर्थात आम्ही आता टीन एजर झाल्यामुळे आपली ताट वाटी हाताबरोबर धुवून टाकायची आम्हाला संवयच

लागली. आणि याचे आईने कौतुक केले. सनलाईट साबणामुळे भांडी आणि मोरीही स्वच्छ राहू लागली.

मग आमच्या पिढीच्या राज्यांचा उदय झाला. आईचे राज्य थोडे रिटायरमेंटला गेले. "नये उम्र की नयी पहल" या न्यायाप्रमाणे घरातली, म्हणजे स्वयंपाकघरातली भांडी सगळी कात टाकून पांढरी शुभ्र झाली. आईच्या काळांत आलमीनची भांडी फक्त भिकारी वापरायचे. पण आमच्या राज्यांत देशाच्या नव्या प्रगती मुळे हिंदालीयम सारख्या कंपन्यांचा उदय झाला आणि त्यांची झळाळणारी अल्युमिनियमची भांडी, डबे, कुकर, मोठी पातेली वगैरे घराघरांत शिरू लागली. जे म्हणाल ते आलमीनचे मिळू लागले. शिवाय त्यांत स्वयंपाक करतांना इंधन कमी कसे लागते वगैरे सरकारी प्रचार होताच. आम्ही अत्यंत देशप्रेमी असल्यामुळे आणि त्यांतही इंजिनीयर असल्यामुळे आणि तेल वाचवणे कसे देशाला आवश्यक आहे ते अगदी पटल्यामुळे आणि त्यांतही ती आलमीन ची भांडी बरीच स्वस्त असल्यामुळे आम्ही त्यांचीच कास धरली.

त्यांत पुन्हा रिन साबणाचा प्रचार झाला आणि त्याच्याबरोबर ती नायलॉनची घासणी फुकट मिळू लागली आणि आमच्या भांडी घासण्याचे रुपडेच पालटले. पुन्हा एकदा भांडी धुवून नाही, घासून निघू लागली पण प्रेमाने. ज्यास्त घासली तर त्याच्या अल्युमिनियमचा साका घासणीबरोबर बाहेर पडू लागला आणि आम्हाला "एवढी ज्यास्त जोराने घासू नका, त्याची झीज ज्यास्त

होते" असे ऐकू येऊ लागले. मग अगदी नाजूक हाताने घासण्याची संवय लावून घ्यायला लागली. देशाची प्रगती होतच होती, त्यामुळे पुन्हा एकदा स्टेनलेसची भांडी नवीन स्वरूपात बाजारात येऊ लागली. शिवाय नळांना पाणी बरेच रेग्युलर येऊ लागले.

पहिल्या पिढीची स्टेनलेस ची भांडी पातळ स्टीलची, कडांना क्रॅक पडणारी, वळयावळया असलेली असायची. ती प्रेस मध्ये बनवलेली असल्यामुळे त्यांना कोपऱ्यात वळया, कडांवर क्रॅक, शेगडीवर ठेवल्यावर तापून काळे होणे असले आजार होते. अरे हो, चुली, स्टोव्ह आणि इलेक्ट्रिक शेगड्या जाऊन गॅस घरांत आल्याचे सांगायचे राहूनच गेले! त्यामुळे भांडी काळी होण्याचे प्रमाण कमी होऊन फक्त सिरीयल बघण्याच्या नादात पाणी ठेवण्याचे विसरून गेल्यामुळे तापून भांडी काळी पडण्यापुरतेच आता स्वयंपाकघरातले अपघात लिमिटेड झाले.

ही नवी स्टेनलेसची भांडी चांगली जाड शीट मधून, ते सुद्धा स्पिनिंगने बनवलेली असल्यामुळे चांगली दणकट आणि घासायला जड होती. आता तो रिन चा हिरवा साबण भांडीवालीला द्यायला रिझर्व्ह केलेला होता आणि आम्ही तो नवा लिक्विड सोप डिमांड करू शकत होतो. आता तुम्ही विचाराल की आम्ही भांडी का घासत होतो. भांडीवाली बाई ठेवण्याची आमची ऐपत नव्हती की काय? मंडळी, असे नाही. आम्ही आपल्या किचन क्वीन ला नेहमीच मदत

करीत असू. त्यामुळे आणि भांडीवाल्या बाईने फ्रेंच लीव्ह घेतली तर भांडी कोण घासणार किंवा धुणार होते? अगोदरच कामाच्या रास्त वाटणी प्रमाणे स्वयंपाक करायची जबाबदारी राणीसाहेबांनी घेतलीच होती मग भांडी घासण्याचे काम राजेसाहेब कसे करणार नाहीत?

मध्ये एकदा तो क्रोकरी वापरायचा प्रयोग करून झालाच होता. पण त्याबद्दल फारसे न बोलणेच ठीक राहील. पुन्हा पुन्हा नवा क्रोकरी सेट आणणे कसे असते ते तुम्हाला माहीत असेलच.

काळाचा गाडा चालत राहिला आणि आमचा ऍक्टिव्ह काळ मागे टाकण्याची वेळ झाली. आता त्या तिसऱ्या पिढीने सूत्रे हातात घेतली, त्यापूर्वी स्वतंत्र राहून हाउस मॅनेजमेंटची प्रॅक्टिस करून घेतली. लग्नाच्या भेटवस्तूंमध्ये आमूलाग्र फरक झाला होता. आमच्या आईबाबांना पितळेची आणि तांब्याची साधने लग्नांत आली होती, आम्हाला स्टेनलेसची, आता आमच्या पुढच्या पिढीला आलेल्या वस्तूंचे नुसते निरीक्षण जरी केले तरी त्यांतली व्हरायटी चकित करणारी होती.

आमच्या आईचे शॉपिंग स्वस्त आणि टिकाऊ दृष्टीचे होते आणि आमचे टिकाऊ आणि सुबक असे होते. तर नव्या पिढीचे सुंदर आणि मॉडर्न असे झाले होते. बाजारांत आता वस्तू खूपच व्हरायटी असलेल्या आणि सुबक होत्या.

टिकाऊ पणाला आता फारसा वाव राहिला नव्हता कारण वस्तू दोन तीन वर्षात कालबाह्य होते असे दिसत होते. आमच्या मुलांनी, म्हणजे मुलग्यांनी आणि त्यांच्या पत्नींनी किंवा मुलींनी आणि त्यांच्या नवऱ्यांनी, निवडलेल्या वस्तू चांगल्याच आकर्षक आणि बहुपयोगी होत्या म्हणजे आहेत. फक्त स्वयंपाकघरातल्या वस्तूच पाहिल्या तरी त्याची खात्री पटते.

नुसत्या नळाच्या पाण्याखाली धरल्या तरी स्वच्छ होणारी पातेली, भांडी, तवे आणि स्पॅटूले बघितले तरी छान वाटते. मग जरा विचार करा, ही भांडी धुवायला, आता घासायला लागत नाहीत, किती मजा येते ते. चांगल्या जाड आणि पॉलिश केलेल्या स्टेनलेस आणि अल्युमिनियमची पातेली वगैरे हाताळायला आणि घासायला एकदम सोपी आणि टिकाऊ दिसतात. टिकाऊपणाचे जरा विसरू, कारण ही भांडी कालबाह्य लौकर होणार आहेत अगदी नव्या सारखी दिसली तरी.

आता मागे वळून बघितले तर काय लक्षांत येते ते म्हणजे, दृष्टी वेगळी होती या तीन पिढ्यांची. पैसे तसेच होते दुकानदारही तसेच होते. घेणाऱ्यांची दृष्टी वेगळी होती. पूर्वीचे आईच्या जमान्यांतले दुकानदार जे मिळेल ते विकत आणि घेणाऱ्याला जे मिळेल ते घ्यावे लागे. आमच्या जमान्यांत निवडा निवडीला ज्यास्त वाव होता आणि दुकानदारही त्यांच्या सप्लायर्सना हे चालते ते चालत नाही म्हणून नव्या गोष्टी मागवू लागले होते. आता तर व्हरायटी असल्याखेरीज

कोणी पाऊल टाकत नाही दुकानांत. म्हणजे कस्टमर ईज किंग या घोषणेचा खरा अर्थ दिसू लागला आहे. मार्केट मध्ये वस्तूंची रेलचेल झाल्यामुळे आणि बनवणारेही कस्टमरला काहीतरी किंमत देऊ लागल्या मुळे नवी पिढी तेवढीच चोखंदळ बनली आहे.

स्वस्त, टिकाऊ, सुबक आणि वैविध्यपूर्ण असा बदल होत गेला आहे. घेणारेही आता हुशार झाले आहेत. चार ठिकाणी चौकशी केल्याखेरीज घ्यायला जातच नाहीत दुकानांत. त्यांतही ऑनलाईन खरेदीचे प्रमाण फारच व्यापक बनले आहे, इतके की या पुढच्या पिढीला दुकाने म्हणजे काय ते समजावायला लागेल.

भांडी घासण्याचे आणि स्वयंपाकघराचे हे एक फक्त उदाहरण आहे. बाकी जगण्याच्या इतर क्षेत्रातही असेच बदल झालेले दिसतील. पैशांच्या बाबतीत चिकटपणा आहे तसाच आहे फक्त त्याचे "परवडत नाही", "इतके महाग कशाला पाहीजे" वरून "इकॉनॉमिक आणि फ्रूगल लिव्हिंग" असे वर्णनात रूपांतर झाले आहे.

आमच्या पिढीला आमच्या अगोदरच्या पिढीने असेच पाहिले असेल. त्यांच्या दृष्टीने आम्ही उधळे असू. आम्ही आमच्या पुढच्या पिढीकडे कसे बघतो ते आम्हीच ठरवायला पाहीजे. त्या त्या वेळचे वातावरण आपल्याला

तसे वागायला प्रवृत्त करत असते. आता आपल्या पुढची दुसरी पिढी आपल्याकडे कशी बघते ते पाहणे मनोरंजक ठरेल. आपल्या आज्जी आजोबांना आपण कसे दिसले असू तसे आपल्या आई वडिलांना नक्कीच नसेल. आपल्याला आपली मुले आणि नातवंडे कशी पहातात तेही मजेचे असेल. अर्थात आपण मुलांच्या आपल्याकडे पाहण्याचा अनुभव थोडा बहुत घेतलाच आहे. नातवंडांचा घेऊन पाहू. त्यांना आपले वागणे गमतीशीर वाटलेच असेल थोडे.

कोणीही दुसऱ्यांच्या वागण्यावर टीका करूच नये. सगळे त्या त्या परिस्थितीत बरोबरच वागलेले असतात. दुसऱ्याचा दृष्टीचा सन्मानच केला पाहिजे अगदी तो दुसरा किंवा दुसरी आपल्यापेक्षा पन्नास साठ वर्षांनी लहान असली तरी.

कारण त्यांची दृष्टी वाढणार आहे, मॅच्युअर होणार आहे.

नवी पिढी नवी दृष्टी

परिशिष्ट १

नव्या जुन्याचे संगम आणि आपली बदलती दृष्टी आपण पहिली आहे.

काही काही गोष्टी वाचण्यापेक्षा पाहिल्या तर मन अधिक प्रसन्न होते आणि विचारी होते.

या पहा, काही गोष्टी कश्या आपल्या स्मृती जागवितात ते.

ही अल्युमिनियमची पातेली आणि डबे. एके काळी त्यांच्या जमान्यांत राजे होते. आता ते रिटायर्ड राजे झालेले आहेत.

फक्त ती स्टेनलेस ची किसणी बसली आहे त्यांच्याशी स्पर्धा करत. हे डबे आणि पातेली, घासायला कहार आणि कितीही घासली तरी चमकायचे नांवही न घेणारी, एका हट्टी राजा सारखी. पण त्यांचेही राज्य येऊन गेले.

या कढया, रुपडे पालटणाऱ्या. पितळेची १९७५ मधली, अल्युमिनियमची ८०च्या दशकातली, स्टेनलेसची वाय टू के च्या दशकातली, गोल स्टील ची २०१० च्या दशकातली आणि नॉन स्टिक हँडल वाली आत्ता आत्ता ची या दशकातली. सगळ्यांची चलती होती पण अजूनही पितळेची कशी चमकते पहा. अजून सगळ्या चालतात आपल्या घरांत.

धातूंचे तवे आणि लाकडाच्या वस्तू. लोखंडी तवे कधीच एक्झिट घेऊन गेले. विटकरीनी घासून घासून दमून गेले बिचारे. आता अल्युमिनियमचे

शेजारचा तो नॉनस्टिक तवा, त्याला कधी घासावेच लागत नाही. पण तो दुसरा मात्र दररोज घासून घेतो स्वतःला. पोळपाट मात्र लाकूड ते अल्युमिनियम

ते पुन्हा लाकूड असा स्वतःला बदलत टिकून राहिला आहे. आणि तो शेव चकली करायचा सोऱ्या, तो मात्र जसाच्या तसा राहिला आहे त्याच्या पितळी डिस्क सकट. कधीतरी दिवाळीत काम करणारा तो, त्याला काय होणार. पण बघा, स्पेशल पर्पज आयटेम असल्याने त्याचा भाव जसाच्या तसाच राहिला आहे.

नव्या पिढीची नव्या टेक्नॉलॉजीची ही जनता नक्कीच मोठे राज्य करील. बिचारी आमची लोखंडी पळी मात्र अंग चोरून बसली आहे त्यांच्या मध्ये. एकेकाळी लोखंडी पळ्यांमध्ये फोडणी करायची असे, तो ज्यास्त हेल्दी असे. पण तुम्ही बदलला नाहीत तर तुम्ही गेला काळाच्या मागे.

ही नवीन पद्धतीने केलेली उलथणी, वांगे भाजायची जाळी, ही नवी पळी, ते मोसंब्याचा रस काढायचे यंत्रणा तो संगमरवरी खलबत्ता नव्या टेक्नॉलॉजीची ओळख करून देतात. गरीब बिचारी तो लाकडी रवी अंग चोरून घुसते आहे त्यांच्यामध्ये. पण तिने आता रिटायरच व्हावे, सन्मानाने. अजून पितळी शोभेच्या वस्तू आपली कला दाखवतातच.

कांदे, गाजरे, मुळा बारीक करायचे हे मशीन काम पण करते आणि व्यायाम पण करविते, ड्युअल रोल!

चाकू, सुऱ्या, रव्या आणि पळ्या आता नव्या स्वरूपांत नवीन पिढ्यांशी जुळवून घेतात. विळीनेही नवे रुपडे धारण करून आपला आब टिकवला आहे पहा. खरे तर चाकू सुऱ्या हे विळीचे दुष्मन, पण आज गुण्यागोविंदाने नांदत आहेत आपल्या स्वयंपाक घरांत.

काळा बरोबर पुढे जायचे आहे हे या वस्तूनाही जाणवले असेल. जो थांबला तो संपला ही शिकवण त्यांना निर्माण करणाऱ्या इंजिनियर्स नाही मिळाली आहे.

a

एक कविता शिकलो होतो आपण. आठवते?

आधी होते मी दिवटी, शेतकऱ्यांची आवडती
झाले मग मी ती पणती, घराघरातून मिणमिणती
समयी केले मला कुणी, देवापुढती नेवोनी
निघूनी आले बाहेर, ओकीत काळासा धूर
काचेचा मग महाल तो, कुणी बांधुनी मज देतो
कंदील त्यांना जग म्हणती, मीच तयातील परी ज्योती
बत्तीचे ते रूप नवे, पुढे मिळाले मज बरवें
वरात मजवाचून अडे, झगझगाट तो कसा पडे
आता झाले मी बिजली, घरे मंदिरे लखलखली
देवा ठाऊक काय पुढे, बदल माझ्यात घडे
एकच ठावे काम मला, प्रकाश द्यावा सकलांना
कसलेही मज रूप मिळो, देह जळो पण जग उजळो

ही आपली साधने हेच सांगतात आपल्याला, नाही का!

आता काय करावे?

परिस्थिती फार बिकट होत चालली आहे. काहीही करावे तरी आपल्यामागे काहीतरी झेंगट लागणारच आहे. मराठीतली ती म्हण आठवते का? "धरलं तर चावतंय, सोडलं तर पळतंय". म्हणजे काहीही करा आपल्याला अडचण आहेच.

म्हणजे असे बघा, आम्ही दाखल झालो आमच्या अर्ध्या शतका नंतर पुन्हा ओळख झालेल्या एका ग्रुप मध्ये. सगळे जण पाहिलेले तेंव्हा कॉलेज कुमार आणि कॉलेज कुमारी होते. पन्नास वर्षांची गॅप पडली होती. ग्रुप वर तू काय केलेस मी काय केलेची चर्चा सुरू झालेली होती. आपल्या कार्यकाळांत काय दिवे लावले याची उजळणी होत होती.

आम्हीही त्यांत उत्साहाने भाग घेऊन आम्हीही काय काय आणि कसे कसे दिवे लावले त्याच्या बढाया मारत होतो. जरी पैसे मिळविणे आणि आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करणे हाच आमचा मुख्य हेतू होता. आपल्या ललाट रेषेवर लिहिलेल्या प्लॅन प्रमाणे आमचा जीवन प्रवास सुरु होता. आता हा प्लॅन काही आम्ही आपण होऊन केला नव्हता. वरच्या त्या बॉसने ती प्रेरणा आम्हाला दिली होती.

a

सरळ सरळ जीवन जगावे आणि त्याचा उपभोग घ्यावा अशी साधीसुधी कल्पना होती आमची. पण त्यांत ते सोशल रिस्पॉन्सिबिलिटीचे प्रकरण आले. एकच चढाओढ लागली की कोणी किती सोशल रिस्पॉन्सिबिलिटी घेतली अशी कशी ते.

कोणी किती मंदिरे बांधली, कितींचा जीर्णोद्धार केला, किती शाळा चालवल्या, झोपडपट्ट्यांत जाऊन किती कुणाचा उद्धार केला अशी. कुणी हजारो लोकांना कसे दररोज जेवू घातले, कुणी किती लोकांना दारिद्र्यरेषेच्या वर आणले, कुणी किती गरजू लोकांना शिक्षणांत मदत केली ती अशीही.

त्यांतही चढाओढ म्हणजे चढा किती आणि ओढा किती ते समजणे आमच्या क्षमतेच्या बाहेरचे होते.

आपल्या स्वतःला प्रथम दारिद्र्यरेषेच्या वर आणणे आपले परम कर्तव्य आहे अशीच आमची धारणा होती.

पण त्या सोशल रिस्पॉन्सिबिलिटीच्या वर्णनाने आमची छातीच दडपून गेली. आता आपले काय होणार याची चिंता आम्हाला लागून राहिली. आम्ही काही चांदीचा चमचा तोंडांत धरून या जगांत आलेले नव्हतो. की आपल्या बालपणी आणि थोड्याश्या तरुणपणी अगदी ऐश्वर्यात लोळत वेळ घालवलेला

नव्हता. आम्ही ठार गरिबी पाहिली नव्हती आणि थोर श्रीमंतीही. आमच्या आजूबाजूला जे लोक होते किंवा जी परिस्थिती दिसली होती तींत कुणी गरजू किंवा अगदी भिकेला लागल्यासारखे कोणीच दिसले नव्हते. सगळे आपापल्या परीने सुखांत रहात असलेले दिसत होते. मग हे गरजू ओळखायचे कसे याचे ट्रेनिंग कोण देत असणार?

एक मात्र आम्हाला अगदी लहानपणा पासून माहीत होते की आपल्याला माहीत असलेल्या गोष्टी दुसऱ्याला शिकवल्या तर तो आनंदी होतो. आणि हे आम्ही अगदी बालपणापासून करत आलेले होतो. उदाहरणार्थ पतंग कसे उडवावेत, गोट्या कश्या खेळाव्यांत, बुद्धिबळाच्या चाली कशा कराव्यांत, ब्रिज मध्ये आपली कातडी सांभाळून दुसऱ्या जोडीला चीत कसे करावे ते. ते मात्र आम्ही दुसऱ्याला नक्कीच शिकवून आपल्या करता नवे कॉम्पिटिटर तयार केले होते. त्यांचा सोशल उद्धार नक्कीच झाला होता.

तसेच आमच्या त्या इंजिनियरिंग च्या जीवन प्रवासांत ME आणि BE झालेल्या नव्या इंजिनीयरना कसे काम करावे आणि त्यासाठी तयारी कशी करावी त्याचे इत्यंभूत ट्रेनिंग आम्ही दिलेले होते आणि नंतर हेच लोक आपल्यापुढे निघून गेलेलेही पाहिले होते. आमची सोशल रिस्पॉन्सिबिलिटी आमच्या परीने आणि आमच्या क्षमतेप्रमाणे आम्ही घेतलीच होती. वीस तीस नवीन जवान इंजिनीयर तयार केले होते. त्यांनीही असेच नवे इंजिनीयर तयार केलेले ऐकले होते. ज्योतीने ज्योत उजळली होती.

a

शिवाय नशिबाने आम्हाला दोन तीन वेळा विमान प्रवास करवला होता. त्यावेळी त्या फोल्डर मधले "दुसऱ्यांना मदत करण्यापूर्वी स्वतःला सेफ करा आणि ठेवा" हे वाक्य आमच्या मनांत पक्के घुसून बसले होते. आणि आमची वाटचाल तशीच होती. आपल्यालाच कमतरता असतांना हे लोक अशी सोशल रिस्पॉन्सिबिलिटी कशी काय घेऊ शकतात आणि दुसऱ्यांशी कंपॅरिझन कशी काय करतात याचे गूढ कधी उकललेले नाही.

आम्ही आपल्या परीने दुसऱ्यांना मदत नक्कीच केली होती. पण हे सर्व त्या सोशल रिस्पॉन्सिबिलिटीच्या व्याख्येत बसत नाही आणि ते पॅरामीटर आपल्याला लागू होत नाहीत हे बघून आमचे मन अगदी खिन्न होऊन डिप्रेशनच्या खाईत जाते की काय असे वाटू लागले होते आणि आता काय करावे, आपला हा ग्रुप आपल्यासाठी नाही की काय अशी मन दडपणारी भावना मनांत शिरली होती.

पण बोलरने बंपर टाकल्यावर, मारता नाही आला तरी डक करून वाचता येते, तसे आम्ही सरळ डक केले आणि थोडा वेळ अगदी चूप बसलो.

पण हाय रे रामा, जरा कुठे स्थिरस्थावर होते तर इकडे कवितांची वादळे सुरू झाली. कुणालाही समजायला कठीण अश्या पद्धतीने हे लोक असे विचार प्रकट का करतात हे एक अतिगूढतम गूढ असावे. इकडे कविता सुरू झाल्या

आणि आमचा श्वास पुन्हा दडपला. पण आता यातून सुटका म्हणजे हल्ला करणे! प्रत्येकवेळी आपणच का बळीचा बकरा व्हायचे? मग आम्हीही दम लावून मैदानात उतरलो.

असे मागे राहू नका, चला कविता करूया
चार शब्दांची उलाढाल करून, आपण सारे जिंकूया

या उतरा मैदानांत, होऊन जाऊदे काव्यरण
झाले अति आता, शुष्क शब्दांचे कंदन

चर्वितचर्वण पुरे आता, पुरे तो काथ्याकूट
सागर घुसळून काढू आता, शब्दांचे अमृत

तीच तीच ती चाले चर्चा, उगा कशाला डोके खर्चा
पर्वत फोडून मूषक काढा, थांबवू तो नन्नाचा पाढा

या मग कविवर, निघा व्हा पुढे
उधळूया शब्दांचे घोडे, दाखवुया यांना की

हम भी कुछ कम नहीं।

a

पहिल्याच तडाख्यात आपल्यालाही हे येते असा कॉन्फिडन्स आला आम्हाला. मग "अटॅक इज द बेस्ट डिफेन्स", या उक्ती प्रमाणे अजून एकदा अटॅक केला.

भांडी घासूनी, अति मी दमलो
थकलो रे नंदलाला, थकलो रे नंदलाला

साबणाचे मम हात झाले, घासुपणाचा शिक्का
विसळुनी सगळी भांडी झाली, ट्रे बघा सकल भरला

आता नवी ती भांडी आली, आता नवी ती भांडी आली
पुन्हा पहा घासण्याला, थकलो रे नंदलाला

हेच काम का मम जीवाला, तोच तोच का साबण
कधी येणार ती भांडीवाली, कधी मी जाणार खेळायला

कोरोना पुढती हात टेकले, नको नको हा कारावास
थकलो रे नंदलाला

a

याने एक परिणाम मात्र झाला. ग्रुप वरचे लिखाण "लिखाण" झाले आणि तो प्रास, यमक, छंद वगैरेचा पिच्छा सुटला. आणि त्या अगम्य कवितांपासून जराशी उसंत मिळाली. आम्हास गद्य रचना करण्यास उद्युक्त केले ते वालचंद कॉलेजच्या मधुर अविस्मरणीय आठवणींनी आणि आम्ही सर्व त्यांत अगदी बुडून गेलो. एके काळी आमच्या एका वर्ग मित्राने आम्हास "चार्ली" असे नांव ठेवले होते, त्याला कारण असावे आमचे श्रीरंग कौलगी असे उच्चारायला अवघड नांव. ते ठीक आहे, सगळ्यांच्या जिभा वळत नाहीत. श्रीरंग आणि कौलगी या दोघांनाही "या" लावता येत नाही. आणि ही तर इकडची पद्धत, मुलाच्या नावाला "या" लावायचे म्हणजे पक्या, म्हाद्या असे आणि मुलीच्या नावाला "ई". यमी, सुशी असे.

काहीतरी विचित्र नावाने कुणीतरी हाक मारण्यापेक्षा टोपणनाव बरे असा आम्ही विचार केला. आणि नंतर प्रेमाने त्याचे "चार्ल्या" असे रूपांतर झाले होते. इथे पर्यंत ठीक होते. अगदी हॉस्टेल यार होते त्यांना असेच आवडत होते.

पण आता नाही नाही ते लोक, ज्यांची आपली फारशी ओळख नव्हती आणि ज्यांचे रस्ते आपण कधी क्रॉस केले नाहीत तेही आम्हाला "चार्ल्या" म्हणायला लागल्यावर आता काय करावे हा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला.

शेवटी माझे नांव "श्रीरंग रघुनाथ कौलगी" आहे ठणकावून सांगायची वेळ आली. अजूनही या ग्रुप मध्ये आणि बाहेर आमचे नांव नीट लिहिणारे आणि

उच्चारणारे लोक फार कमी आहेत. आम्ही आमच्या जवळच्या सगळ्या लोकांना सांगतो की नावे सोपी ठेवा, त्याने पुढे चांगले असते. पण ऐकते कोण? मंडळी तुम्ही अगदी ऐका आमचे, नावे सोपी ठेवा, कारण कठीण नावे धरली तर चावतात आणि सोडली तर पळतात.

हुश्श म्हणून जरा विसावलो ग्रुप मध्ये तर एक नवीच कल्हई लागली. म्हणे लोक ग्रुप वर चालणाऱ्या फालतू डिबेटनी बोअर होतात. म्हणे अश्या डिबेट प्रायव्हेटली करा. मग ग्रुप पाहिजेच कशाला? आणि कोणा कोणाला खूष करायचे आणि कसे? साड्यांच्या दुकानातली महिला बरी, कमीत कमी हे तरी सांगते की तिला रेशमी भरजरी पहायच्या आहेत की सुताड्या. इकडे सगळाच आनंद. काय पाहिजे ते न सांगता आपली दिसेल त्याच्यावर टीका करायची.

ठीक आहे, सगळेजण जाणतात की नट नट्या गातात आणि अभिनय करतात, किंवा खेळाडू खेळतात आणि प्रेक्षक फक्त बघतात. आता आमच्या या थिएटरात प्रेक्षक भाग घेणार नाहीत पण अंडी आणि टोमॅटो तयार असतील त्यांच्या कडे. नाटकवाल्यानेच ठरवायचे किंवा खेळाडूनेच दाखवायचे की काय पेश करणार ते. जर असेच आहे तर आपण आपले करीत राहावे, पुढचे पुढे.

मग काय, आम्ही सरळ लेख, गाणी, व्हिडिओ करायला सुरुवात केली. त्यावरून चांगले कार्यक्रम करता येतील अशी एक आशा निर्माण झाली आहे.

आता आम्ही काय चिं. वि. जोशी किंवा पु. ल. देशपांडे किंवा किशोर कुमार किंवा महम्मद रफी नाही आहोत. त्यांची दैवी देणगी आम्हाला नाही पण आम्हाला देवाने एक देणगी नक्कीच दिली आहे, उत्साह.

लेख लिहावेत कुठल्याही विषयावर, गाणी म्हणावी आपल्या आवाजांत. कुणी काही कॉमेंट करे ना. आता आमच्या "कावळे" नावाच्या एका लेखावरून आणि त्याला लागून केलेल्या एका व्हिडिओ वरून आता आम्हाला नवेच "मुंबईचे कावळे" असे विशेषण लागते आहे की काय अशी नवी शंका आता येऊ लागली आहे. लागले तर लागले, ज्यांना दुसरे काही करता येत नाही त्यांना नावे मात्र ठेवता येतात ते खूपदा सिद्ध झाले आहे. आपल्याला लोक नावे ठेवतात म्हणजे आपण ओके आहोत असे समजावे.

आमचे प्रिन्सिपल म्हणजे ते करू ते उत्साहात आणि मन लावून. आमच्या सारख्याच आमच्या उत्साही मित्रांनी तीन कार्यक्रम केलेत, अगदी छानपैकी. बघू काय रिस्पॉन्स येतो ते. कमीत कमी पाहणारे गप्प राहिले तरी चालेल अशी परिस्थिती आहे. कौतुक सोडा, टीका केली नाही, बोअर झालो म्हटले नाही तरी बरेच मिळवले म्हणायचे.

आता अजून काय काय धरले तर चावणार आहे आणि सोडले तर पळणार आहे ते बघायचे.

तर काय फिलॉसॉफी असावी आपली?

॥ बंधू, काम करीत रहा ॥
॥ फळाची इच्छा धरू नको ॥
॥ काम करणे तुझ्या हाती आहे ॥
॥ फळ मिळवणे नाही ॥

अशी की, १९६६ ते १९७१ पर्यंतची

॥ ठेविले वसंते तैसेचि रहावे ॥
॥ क्लब जे देईल ते ते खावे ॥
॥ ऑफ पिरियडांत मानावे ॥
॥ समाधान ॥

मग काय काही आपल्याला चावणार नाही की काही आपल्यापासून पळून जाणार नाही.

काय, खरे ना?

बोक्याचे विश्व

मी बोका. म्हणजे मांजरातला पुरुष. राजा किंवा सम्राटच म्हणा ना. माझेही विश्व आहे. पण ते किती क्षणभंगुर आहे बघा.

मी तुमच्याच आळीत रहात होतो. माझ्या राण्याही तिथेच राहत होत्या. मीही राणीचा मुलगा म्हणजे युवराज होतो. माझे बाबा वाघासारख्या पिवळ्या रंगाचे होते आणि आई शुभ्र पांढरी. त्यामुळे मी वाघासारख्या दिसत असे. मी लहान होतो तेंव्हा माझी आई मला लपवून ठेवायची कारण माझे बाबा भलतेच रागीट आणि दुष्ट होते आणि मी दिसलो की ते माझी मानगूट धरायला धावायचे. की मग आईची तारांबळ उडायची आणि ती मला हळूच मानेला धरून उचलायची आणि त्या बंबा शेजारच्या कोळशाच्या पिंपात लपवून ठेवायची.

मी त्या कोळशाच्या पिंपात कोळश्यांबरोबर खेळायचो. सगळा काळाभोर झालो की आई यायची आणि मला चाटून पुसून स्वच्छ करायची. मधून मधून तिकडे काळ्या राखाडी रंगाचे प्राणी यायचे. काळेभोर डोळे असायचे त्यांचे आणि ते आमच्या समोर नाचायचे, उड्या मारायचे. मी आईला विचारायचो की हे काय आहे. पण आई मला गप्प बसवायची. माझे जग म्हणजे ते कोळशाचे पिंप होते, गोल, वरती फक्त उघडे. मी माझ्या या जगांत खूप मजा करायचो.

a

एकदा माझ्या आईने ती छोटा राखाडी प्राणी आणला आणि माझ्यासमोर ठेवला. मी त्याच्याशी माझ्या पंजाने खेळू लागलो तर तो इकडे तिकडे पळू लागला. आई आपली बघत होती माझ्याकडे. मी आपला त्या प्राण्याशी खेळत होतो आणि तो पळत होता. मग माझी ट्यूब पेटली आणि आईने तो प्राणी का आणला ते कळले. मग मी त्याला बोचकारला तर तो ओरडू लागला आणि त्याच्या अंगातून लाल लाल पाणी बाहेर येऊ लागले. मी ते चाटून बघितले. आवडले मला ते. मग मी त्याला चावलो. ते बघून माझी आई माझ्याकडे कौतुकाने बघू लागली.

माझं बाळ मोठं झालं म्हणाली.

एक दिवस मला आईने उचलले आणि पिंपातून बाहेर काढले. बापरे, किती भीती वाटली मला! किती मोठ्ठी जागा होती ती. खेळायला, उडया मारायला किती मज्जा येत होती. मी आई झोपली की तिच्या शेपटीवर माझा पंजा मारायचो. मग आई माझ्यावर रागवायची. एकदा तर मी तिला चांगलेच बोचकारले. रागावून तिने मला असा धपाटा घातला की मी रडायलाच लागलो.

एकदा मी आईजवळ खेळत असताना एक विचित्रच प्राणी आला तिथे आणि माझा वास घेऊ लागला. मी घाबरलोच. तो प्राणी माझ्यापेक्षा थोडासाच मोठा होता आणि माझ्याशी खेळता खेळता आपली शेपटी हलवायचा. मला

त्याची थोडी भीती वाटायची आणि थोडा राग यायचा. आईने मला सांगितले की त्याच्या बरोबर फार मैत्री करायची नाही. तो वाईट आहे.

असे खूप दिवस गेले. मग माझी आई मला सोडून कुठेतरी दूर निघून गेली.

आता मी काय करायचे? कुठे जायचे? कसे रहायचे? पण राहावे तर लागणारच. मग हिम्मत करून मी इकडे तिकडे जाऊ लागलो आणि हळू हळू मला आपला आसपास ओळखीचा होऊ लागला. मी तिथे ते राखाडी प्राणी स्वतः पकडून खायला सुरुवात केली. कधी कधी एक उंच प्राणी एक मोठ्या टोपलीतून पांढरे मेलेले प्राणी आणायचा. मला ते प्राणीही खूप आवडायचे. मग मी त्याच्या आजूबाजूला फिरून त्याला "मला दे ना, मला देना" असे सांगत असे, त्याला अगदी विनवीत असे, मग तो मला एखादा प्राणी द्यायचा.

कधी कधी एखाद्या घरातून मस्त गोड वास यायचा आणि मी जाऊन बघायचो की एक मोठ्या भांड्यांत पांढरे पांढरे पाणी गरम करायला ठेवलेले असते. एकदा गुपचूप मी ते पाणी चाटून बघितले तर "ओय, ओय", माझे ओठ आणि जीभ भाजून निघाली. पण ते पाणी छान लागत होते. मग मला त्या पाण्याची चटकच लागली. एकदा मी ते पाणी चाटून बघत होतो आणि त्याच्या आवडीने ते डोळे मिटून जिभेने पीत होतो तर एका उंच प्राण्याने काहीतरी माझ्या

पाठीत मारले. "आय आय" करत मी तिथून पळून गेलो. मग मला समजले की असे ते पाणी पिणे गुपचूप करायला पाहिजे.

जस जसा मी मोठा झालो तस तशी माझ्या अंगात शक्ती यायला लागली आणि त्या उंच प्राण्यांपासून जपून कसे रहायचे याची अक्कल पण यायला लागली. माझ्या त्या आळींत चार पाच मैत्रीणी झाल्या होत्या माझ्या. आम्ही भिंतींवर, कुंपणावर बसून रोज गाणी गात असू. कधीतरी आमची भांडणे पण व्हायची मग आम्ही एकमेकांना चांगले ओरबाडून कधी असू. कधी लाडात येऊन मिठ्या मारत असू.

एकदा माझ्या एका मैत्रिणीने मला लाजत सांगितले की तिला बाळ होणार आहे म्हणून. मी भलताच खूष झालो. आता मी माझ्या या इलाख्यांत कुणालाही येऊ देणार नव्हतो. हे राज्य माझे होते आणि माझ्या मैत्रिणी माझ्या राण्या होत्या. मी इकडला राजा होतो.

मग मी दररोज माझ्या राज्याची चक्कर मारून सर्व ठीक आहेना ते पहात असे. एकदा एक दुसरा बोका दिसला मला माझ्या राज्यात. मी हळू हळू त्याच्याजवळ जाऊन असा हल्ला केला की तो एकदम दचकलाच. मग मी त्याला चांगला ओरबाडला. त्याने ही मला चांगलेच ओरबाडले. लढाईत कोणीच जिंकले नाही पण कोणी हरलेही नाही. मग आमची दररोज लढाई

व्हायला लागली. दोघांचे चेहरे रक्ताने, ते लाल पाणी रक्त असते ते मला आता कळले होते, माखून जायचे.

मग एके दिवशी आमची लढाई चालू असताना तिथून एक मोठा काहीतरी प्राणी "पॉम पॉम" असा आवाज करत आमच्या अंगावर धावून आला. मी पटकन उडी मारली एक बाजूला, पण त्या प्राण्याने माझ्या त्या शत्रूच्या अंगावरून आपले गोल पाय नेले आणि माझा तो शत्रू निपचित पडला आणि त्याच्या भोवती त्याच्या रक्ताचे थारोळे झाले.

आता मला कोणीच शत्रू राहिला नाही आणि माझ्या लढायांनी खरवडलेला चेहरा बघून माझ्या मैत्रिणी भारीच खूष झाल्या. सगळ्यांना बाळे झाली. माझे जग माझा इलाखा, माझ्या मैत्रिणी आणि माझी मुले यांनी भरून गेले. मला माझी मुले आवडत नसत आणि मी त्यांना पकडायचा प्रयत्न करीत असे आणि माझ्या मैत्रिणी त्यांची बाळे लपवून ठेवू लागल्या, अगदी माझी आई मला कोळशाच्या पिंपात लपवायची तसेच.

आता मला कळले का ते.

आकाशातून पाणी पडायला लागले की मला आवडायचे नाही. मग मी पाण्यापासून दूर लपून बसत असे. मग काही दिवसांनी ते पाणी पडणे थांबायचे. असे तीन चार वेळा झाले.

a

मग मात्र माझी शक्ती जरा कमी व्हायला लागली. एकदा एक दुसरा बोका तिथे आला आणि आमची जोराची लढाई झाली. पण तो खूपच शक्तीवान होता आणि त्याने मला चांगलेच बडवून काढले. मला पळून जायला लागले मग. मग तो माझ्याच राज्यांत माझ्याच राण्यांना फितवू लागला. त्या ही बघा कश्या, गेल्या त्याच्या मागोमाग. माझा काही मान ठेवीनाश्या झाला. ओळखही दाखविनाश्या झाल्या.

अरेरे, आता माझे राज्य त्याने बळकावले आणि मला एखाद्या हरलेल्या राजा सारखे कुठे तरी लपून बसायला लागते आहे.

काय करावे, एकेकाळचा सम्राट मी आणि माझ्या चार पाच राण्या होत्या. आता मी तोंड लपवून रहातो आहे माझ्याच एकेकाळच्या राज्यांत. माझ्या राण्या मला सोडून त्या शत्रूच्या राण्या झाल्या.

मी अगदी एकटा झालो. काय माझे जग होते आणि काय झाले बघा.

माझा देव आता माझा राहिला नाही आणि माझे विश्वही माझे राहिले नाही.

शेवटी काळच सर्व शक्तिमान आहे. बाकी सर्व झूट आहे, दुसरे काय.

नाट्यसंगीत

यक्षगान नावाचा मनोरंजनाचा एक प्रकार फार पूर्वीपासून आपल्या देशांत आहे. अगदी पुराणकाळापासून जनमनोरंजन या विषयाला वाहून घेतलेले लोक आहेत. संगीत, नाट्य आणि ललितकला या फक्त आपले मन प्रसन्न करायला वाहून घेतलेल्या आणि निर्माण झालेल्या आहेत.

पूर्वीच्या काळांत खेडोपाडी हिंडून आणि गाव गाव भटकत कलाकारांच्या टोळ्या हिंडत असत. दिवसभराच्या कामाने शिणलेल्या मनाला काही आनंद मिळावा काही विश्राम मिळावा म्हणून अश्या टोळ्या नवनवीन संगीत, नृत्य, नाट्य निर्मिती करीत आणि लोकांच्या मनोरंजनाबरोबर आपलेही पोट भरत.

अगदी पूर्वी म्हणजे इसवी सनाचा आरंभ होण्यापूर्वी भारतांत संस्कृत ही प्रचलित भाषा होती आणि तिला राजाश्रय होता, मग साहित्य निर्मिती संस्कृत मध्ये होत असे यात काही नवल नाही. सर्वसामान्य जनतेला समजणारी बोली भाषा स्थानिक असल्यामुळे संस्कृत मधली काव्ये, नाट्ये रूपांतरित होऊन ती सगळ्यांपर्यंत पोचविण्याचे काम ही कलाकार मंडळी आपल्या टोळ्यांनी करीत असत.

a

संवादापेक्षा कवन मनाला लौकर भिडते, त्यामुळे प्रसिद्ध लोककथा, पौराणिक कथा, वीरकथा आणि भक्तीकथा गाण्याच्या रूपाने लोकांपर्यंत पोचविण्याचे कार्य हे लोक करीत असत.

संस्कृतमध्ये संगीतनाटके फारशी दिसली नाहीत पण पौराणिक कथांवर आधारलेली अनेक आली. त्यांत संगीतापेक्षा विषयावर ज्यास्त भर होता. रामायण आणि महाभारत हे बहुतेक नाटकांचे जन्मदाते. पण संस्कृत समजायला कठीण. मग प्राकृत म्हणजे बोलीभाषेतील नाटके आपला एक वेगळा सुभा करून तगली.

भारतांत एकंदरीतच आध्यात्म्याकडे कल ज्यास्त, त्यापेक्षा वीरश्रीकडे आणि युद्धखोरीकडे कमीच. त्यामुळे सर्व नाटकांमध्ये एक भाव भक्तीचा असायचाच.

आम जनता जरी शृंगार रसाकडे लौकर आकृष्ट झाली तरी शेवटी नाटकाचा अंत भक्तीरसातच व्हायचा. पण नाटकातील संगीता मुळे प्रेक्षक रंगून जायचा.

हळू हळू नाट्य आणि लोकनाट्य वेगळे होऊ लागले. त्यांचे संगीत वेगळे होऊ लागले. त्यांचा बाज वेगळा होऊ लागला.

a

संगीत नाट्य शास्त्रीय संगीताकडे ज्यास्त झुकत गेले आणि त्याचा संगीताला एक प्रकारचे वेगळे वजन प्राप्त झाले. आशयगहन काव्य दोन्हीत होते पण त्याचे सादरीकरण वेगळे झाले. शास्त्रीय संगीतावर आधारीत रचना झाल्यामुळे नाट्यसंगीतांचे गायकही तेवढेच शास्त्रीय संगीतात तरबेज झाले. नंतर नंतर तर गाणारा नट किंवा नटी चांगली म्हणून त्यांच्या देहरूपाकडे दुर्लक्षच केले जाऊ लागले आणि नाट्यसंगीत हा एक विशेष गानप्रकार झाला.

एक ऑर्गन, काही तबले, एक सारंगी आणि ते गायक एवढ्यावर ही नाट्यगीते समृद्ध झाली. चांगले मोठे गवईही ही नाट्यसंगीतात उतरले. गायकही त्यांच्याकडे तालीम घेऊन चांगले कसलेले कलाकार झाले.

एवढेच नाही तर कसलेले शास्त्रीय संगीत गायक नाट्यगीते आपल्या कार्यक्रमांत गाऊन त्यावर मेहेनतही घेताना दिसू लागले. याचे मुख्य कारण म्हणजे त्या नाट्यगीतांची बांधणी शास्त्रीय संगीतावरच योग्य रागांत केलेली होती. शास्त्रबद्ध संगीत नेहमीच कानांना भावते.

एकोणिसाव्या शतकाच्या अंतापासून विसाव्या शतकाच्या साठी पर्यंत हा नाट्यसंगीताचा सुवर्ण काळच म्हणावा लागेल. सौभद्र, मानापमान, मृच्छकटिक, संशयकल्लोळ, स्वयंवर, एकच प्याला, रणदुन्दुभी यासारखी

संगीत नाटके निर्माण झाली. या नाटकातील बहुतेक सगळीच गाणी सुपर हिट म्हणावी अशी झाली आणि त्या नाटकांनी जनामनाचा ताबाच घेतला.

नंतर विसाव्या शतकाच्या साठी सत्तरी नंतर नव्या दमाची नव्या रुपांतली नव्या संगीतातली नाटके येऊ लागली, त्यांत शास्त्रीय संगीताचा बाज प्रायोगिक ज्यास्त झाला आणि सिनेमातील संगीताची थोडी थोडी भेसळ त्यांत होऊ लागली. मत्स्यगंधा, मंदारमाला, जय जय गौरी शंकर, लेकुरे उदंड झाली, कट्यार काळजांत घुसली या प्रकारची नवी नाटके रंगमंचावर आली.

पण त्या क्लासिकल संगीत नाटकांची गोडी काही या नव्या नाटकांत आली असे काही वाटले नाही. अर्थात या संगीत नाटकांचाही प्रेक्षक वर्ग होता आणि त्याने ही नाटकेही डोक्यावर घेतली.

नाट्यसंगीताची वेगळीच गोडी असते यात काही संशय नाही. मुळांत नाटक हे करून दाखवायचे असते आणि त्यांतली गाणी ही गाऊन दाखवायची असतात त्यामुळे त्यातील कलाकार लाईव्ह असतात. त्यामुळे एकदा एखादे गाणे आवडले की प्रेक्षक वन्स मोअर चा आग्रह धरतो. संगीत नाटकांत काही काही वेळा वन्स मोअर दहा दहा वेळा दिला आहे आणि रात्री नऊला सुरू झालेले नाटक पहाटे पाच पर्यंत चाललेले आहे. प्रेक्षक खूष आणि कलावंतही खूष.

अर्थातच त्या नाटकांचे नट आणि नट्या सुपर स्टारच होते आणि त्यांना प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलेच होते.

काही काही वेळा नाटकातील गाण्याचे बोल असे असतात आणि ते गायक असे उच्चारतो की त्या गाण्याला काही अर्थ आहे की नाही असे ऐकणाऱ्याला वाटावे. पण ही गीते खूपच आशयगहन असतात आणि हे त्या नाटकाचे पुस्तक वाचल्यावरच समजते.

दे हाता या शरणागता ॥
मदविलासित नदगता पंकयुता मुखमलिना धना हो त्राता ॥
संपदा चपलचरणा । आपदा भोगि नाना । परत ये पद्मसदना ॥
कुवलय तव मुख तिला; अजि कमला विनवि तुला, मला घे आतां ॥

- या पदाचा अर्थ नाटक पाहत असताना किंवा गीत ऐकत असतांना काढणे फार कमी लोकांना शक्य होईल असे वाटते. पण काव्य वाचल्यावर मात्र अर्थ लगेच ध्यानी येतो. पण अशी गीतेही प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली ती त्यांच्या संगीताने आणि गायनाने.

युवतिमना दारुण रण रूचिर प्रेमसे झाले ।

रणभजना संसारी असे अमर मी केले ॥

रमणिमनहंसा नर साहस सरसी रमवी;
शूर तोचि, विजय तोचि, हे शुभ यश मज आले

या पदातील अर्थ ही कविता वाचल्यावरच कळतो पण प्रेक्षक फक्त कविता ऐकत नाहीत तर संगीताचा आणि सादरीकरणाचा रस घेतात आणि ही आणि अशी अनेक नाट्यगीते अमर होतात.

नाट्यसंगीताचा सामाजिक उपयोग लेखकांनी असा केला आहे की ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनजागृती करण्यासाठी रणदुन्दुभी सारख्या नाटकांवर त्यावेळच्या सरकारने बंदी घातली आणि एक प्रकारे त्या नाटकाचा सन्मानच केला.

मृच्छकटिक नाटकांतील हे गीत पहा -

जेथ मित्रा, तत्वार्थ पाहण्याला शक्ती नसते भूपाल लोचनाला,
तिथे वक्त्याला दैन्य रोज येते, समज अथवा बहु निंद्य मरण येते॥

फक्त दोन ओळींत कसा संदेश दिला आहे ते.

a

एवढी क्षमता असूनही संगीत नाटकांना हळूहळू उतार लागला आणि आज तर संगीत नाटकाचे नावही ऐकू येत नाही. गायक नट नट्या नाहीत असे मुळीच नाही आणि नाटके तर अजूनही आहेतच पण काही काही नाटके कालबाह्य झाली आहेत. प्रत्येक कलाकृतीला एक लाईफ असते.

आता नाटकात पुढे काय होणार हे नवल अजिबात राहिले नाही त्यामुळे संगीर नाटके पहायची तर ती त्यांच्या नाट्यसंगीताचा निखळ आनंद मिळविण्यासाठी.

आजही नवे गायक पुढे येतात. संगीत साधना करतात. त्यांनाही ही नाट्यगीते तेवढाच आधार देतात आणि कितीहीवेळा गायली तरी ती शिळी होत नाहीत यातच त्यांचे नवल विशेष आहे. त्यांचे लेखक आणि संगीतकार कधीच काळाच्या पडद्यामागे गेले पण त्यांच्या रचना अजूनही आपले मन लुभावतात.

हा एक सांस्कृतिक ठेवाच आहे जो कुणालाही कधीही निराश करत नाही.

असिम्पटोमॅटिक

आमच्या शब्द संपदेत सतत भर पडते आहे. त्यामुळे आम्ही अगदी आनंदित झालो आहोत. म्हणजे असे पहा, त्या वालचंद कॉलेजमध्ये असताना समजायला केवळ अशक्य असे कितीतरी शब्द आमच्या कानावर पडले. फक्त गणित आणि फिजिक्सच घेतले तरी हजारो असे शब्द माहीत झाले ज्यांचा प्रत्यक्ष जगण्यांत काडीचाही उपयोग नव्हता.

"पाऊलीज एक्सक्लूजन प्रिन्सिपल" नावाचा एक शब्द समूह आम्ही ऐकला. त्याचा अर्थ लावणे तर दूरच, सरळपणे उच्चारता आला तरी पुरे झाले, म्हणजे परीक्षेत पेपरांत एकदाचा उतरता आला आणि त्याचा "दोन न्यूक्लियर पार्टीकल्स एकाच वेळी एकाच एनर्जी लेव्हल आणि स्थितीत असू शकत नाहीत" हे अर्थ लिहिला तरी फिजिक्सच्या पेपरांत पास होता येते, एवढे समजले. पुष्कळ झाले की!

आणि गणितात म्हणजे भूमितींत असिम्पटोटीक कर्व्ह म्हणजे जी तिला जायचे तिथे जाऊ पहाते पण तिथे कधीच पोचत नाही अशी कर्व्ह. पॅराबोला, हायपरबोला आशा त्या कर्व्हज असतात म्हणे. असोत बिचाऱ्या. त्या त्यांच्या ठिकाणी आणि आम्ही आमच्या. कसेतरी आम्ही ते शब्द यांच्या जिभांना वळवत वळवत पाठ केले आणि सुटलो एकदाचे त्यांच्या तावडीतून.

पण पुढच्या आयुष्यांत आता परीक्षा काही द्यायच्या नाहीत अशी सुखद जाणीव झाल्यावर त्या डोक्यांत गच्च बसलेल्या शब्दांनी आपली अस्तित्वाची जाणीव करून दिली.

म्हणजे असे पहा, आम्ही असिम्पटोटीक स्कॉलर आहोत असे आम्हाला जाणवू लागले, म्हणजे ते असे की आम्ही स्कॉलर होतोच आणि पुरेसा वेळ दिला असता तर आम्ही शंभर टक्के मार्क मिळवू शकलोच असतो, कोणत्याही विषयांत. फक्त प्रत्येक विषयाचा पुरेसा वेळ किती ते विचारायचे नाही.

त्यानंतरच्या आयुष्यांत ही असेच नवे नवे शब्द आम्हाला शिकायला मिळाले. प्रमोशन, इन्क्रीमेंट, डिपार्टमेंट हेड असले. काही काही तर आम्ही आत्मसातही केले. ते जे काय असते ते आम्ही मिळविले सुद्धा.

गेल्या वर्षा पासून एक नवा शब्द आमच्या सारख्या कानावर पडतो आहे. असिम्पटोमॅटिक. काय बर असावा याचा अर्थ ते काही ध्यानांत येत नाही. कुणाला जर विचारले तर ते असे काही उत्तर देताहेत की त्यापेक्षा हा शब्दच सोपा वाटायला लागला आहे. आता कुणाला विचारण्याऐवजी आपणच त्याचा अर्थ काढून पहावा हे चांगले.

सिम्पटम म्हणजे लक्षण असा बहुतेक अर्थ असावा मराठींत असा आमचा एक अंदाज आहे.

तसे जर असेल तर सिम्पटोमॅटिक म्हणजे बहुतेक सिम्पटम दाखवणारा असा असू शकेल.

आपल्या राणीच्या इंग्लिश मध्ये बऱ्याच शब्दांना "a" लावला की उलटा अर्थ होतो असे ऐकले आहे. म्हणजे सोशल, समाजप्रिय आणि असोशल, असमाजप्रिय.

मराठीतही रसिक आणि अरसिक, क्षर आणि अक्षर, असे आहेतच की.

म्हणजे असिम्पटोमॅटिक म्हणजे सिम्पटम न दाखवणारा पण तरीही असू शकणारा असा आहे की काय?

म्हणजे एखाद्या गोष्टींत किंवा व्यक्तींत किंवा प्राण्यांत कोणतीही लक्षणे दिसत नाहीत पण तो किंवा त्या तश्या असतात. महान अर्थ, आजपर्यंत कुठल्याही नोबेल पारितोषिक मिळविणाऱ्या शास्त्रज्ञालाही असे सुचले नसेल.

अरेच्चा, असे आहे का? आत्ता कळले!

मग एवढा अवघड शब्द अगदीच आपल्या ओळखीचा निघाला की.

म्हणजे असे पहा, आम्ही स्वतः असिम्पटोमॅटिक स्कॉलर आहोत. आमच्यांत स्कॉलरची कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत, तरीही आम्ही स्कॉलरच आहोत. तपासून बघा.

तसेच आम्ही असिम्पटोमॅटिक गायक, वादक, लेखक आणि कवीही आहोत. हे मात्र आम्ही अनेकवार सिद्ध केलेले आहे. असेच आम्ही असिम्पटोमॅटिक वडीलही आहोत पण मुले ते मानायला का तयार होत नाहीत ते कळत नाही. ती ही असिम्पटोमॅटिक आज्ञाधारक हुशार, कामसू, आणि कष्टाळू आहेत असे ती म्हणतात. तपासून पहावे लागेल.

आता या करोनाच्या काळांत या महाप्रचंड, समजायला इम्पोसीबल आणि अवघड शब्दाला भलतेच महत्व आलेले आहे असे दिसते.

"असिम्पटोमॅटिक कोरोना पॉझिटिव्ह" म्हणजे नक्की काय हे कोणीतरी आम्हाला सांगा हो. आम्हाला सर्दी झालेली नाही, आमचे डोके दुखत नाही, आम्हाला नेहमीपेक्षा वेगळ्या शिंका येत नाहीत, आम्हाला ताप कणकण वगैरे

काही वाटत नाही, पण आम्हाला ते लोक सांगतात की तुम्ही कोरोना पॉझिटिव्ह आहात म्हणून. आता काय करावे?

त्यांना विचारले की काहीतरी प्रूफ दाखवा तर ते दाखवत नाहीत. आम्ही म्हटले की आम्ही सेकंड ओपिनियन घेऊन येतो तर ऐकत नाहीत. त्यांचे रिझल्ट सिक्रेट आहेत आणि ते आम्हाला ओढत ओढत त्या सेंटर कडे घेऊन चाललेत. आता काय करावे ते कोणीतरी सांगा ना.

टेस्ट करणार ते, तिची समीक्षा करणार ते, कोरोना सेंटर मांडणार ते, आम्हाला काहीही दुखत खुपत नसतांना असिम्पटोमॅटिक पॉझिटिव्ह म्हणणार ते, पॉझिटिव्ह आणि निगेटिव्ह म्हणजे काय ते ठरवणार ते, सेंटर मध्ये डांबून ठेवणार ते, साध्या खोकल्याच्या आणि सर्दीच्या गोळ्या देऊन वर साठ सत्तर हजार रुपयांचे बिल हातात ठेवून आता तुम्ही बरे झालात असे म्हणून तिथून पाठवून देणारे ते आणि मग पुन्हा पुन्हा आमच्यावर लक्ष ठेवायला वेळी अवेळी फोन करणारे आणि आमची बिल्डिंग सील करायची इच्छा दाखवणारे ही तेच. केवढी पॉवर आहे पाहिले त्या असिम्पटोमॅटिक शब्दांत.

कोरोनाचे जाऊ द्या. तो एक अदृश्य आहे. त्याची ती पॉवर आज आहे उद्या जाईल. पण आता तो असिम्पटोमॅटिक शब्द आमच्या डोक्यांत घुसला तो घुसलाच.

पण एवढा मोठ्ठा शब्द वापरण्याऐवजी आपण त्याला अलाक्षणिक असे म्हटले तर. कमीत कमी भीती तरी वाटणार नाही त्याची. पण नकोच तसे, त्या असिम्पटोमॅटिक शब्दाचा दरारा, धाक, दम आणि भीती आमच्या अलाक्षणिक या शब्दांत कुठे आहे. अगदीच बावळट वाटतो तो शब्द.

म्हणजे जरा वळून पाहिले तर आम्ही असिम्पटोमॅटिक असिस्टंट होतो, बॉस होतो, कार्यकर्ते होतो आणि स्वयंसेवकही होतो. पाहण्याच्या दृष्टीवर अवलंबून आहे हे सर्व. बऱ्याच लोकांना, जास्त करून आमच्या सिनियर्सना समजले नसावे हे बहुतेक.

तसे पाहिले तर आपण सर्व साठ सत्तरी नंतर असिम्पटोमॅटिक नवरा आणि बायको, वडील आणि आई, भाऊ आणि बहीणही झालो आहोत की काय? कधी कधी वाटते का तसे? कदाचित तुम्ही मानणार नाही कारण येत्या प्रसंगाला तोंड द्यायचा तो धीर उरला नसेल तुमच्यांत. आमच्यात थोडासा, म्हणजे बराचसा नाहीये, उगाच खोटे कशाला बोला.

पण जरा आपल्या मनाचा कप्पा उघडा आणि त्या आरशांत डोकावा आणि वाट्टेल त्याची शपथ घेऊन सांगा की असे नाहीये म्हणून.

a

चाळीस पंचेचाळीस वर्षे एकत्र घालवल्यावर अतिपरिचयांत अवज्ञा होणे अगदी नॅचरल आहे, त्याची शरम कसली आणि चिंता कसली? पण अजूनही धरून आहोत ना एकमेकांना, त्यांतच सर्व आले.

पण बंधू भगिनींनो, आपण आता काही असिम्पटोमॅटिक या शब्दाला घाबरणार नाही. आहे हे असे आहे. आम्हाला चालते असे.

काल परवाच ग्रुप वर वाचले, कोणीतरी फॉरवर्ड केला होता की मराठी भाषेतील जुने शब्द कसे हरवताहेत आणि कशी आमची मराठी विसरली जाते आहे म्हणून. पण अजिबात खरे नाही ते. भाषा कशी ओघवती पाहिजे, जुने विसरायला पाहिजे नव्याचे स्वागत केले पाहिजे.

म्हणूनच आम्ही म्हणतो की असिम्पटोमॅटिक, असिम्पटोटीक, कोरोना, पॉझिटिव्ह, कोविद सेंटर, असे शब्द आता मराठीत येऊ द्यात. त्याने आपली भाषा अपटुडेट राहील मग अश्या शब्दांची काहीच भीती उरणार नाही.

कथा रसग्रहण - मॉबी डिक

आम्ही आत्ताच अमेरिकन लेखक हर्मन मेलव्हीलचे "मॉबी डिक" नावाचे एक पुस्तक वाचून हातावेगळे केले आहे. चांगले पाचशे पन्नास पानांचे पुस्तक आहे हे. ते सुद्धा अमेरिकन पुनरुत्थानाच्या काळातल्या इंग्रजी भाषेत लिहिलेले. बरेच जुन्या स्टाईलचे शब्द आहेत आणि वाक्यरचना आहे, त्यामुळे सारखे गूगल डिक्शनरी घेऊनच वाचायला लागले. तीन महिने लागले वाचायला. पण वाचल्यावर एक समाधान वाटले की जिला जगांतली एक प्रसिद्ध कलाकृती म्हणतात ती वाचली आम्ही.

अमेरिकेतले नानटकेट हे बेट, न्यूयॉर्क जवळच आहे ते, दर्यावर्दी लोकांच्यामुळे प्रसिद्ध झाले आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला पेट्रोलियमच्या तेलांचा शोध आणि वापर होण्याआधी समुद्रातल्या माशांची तेले सर्वत्र वापरांत होती. त्यांतही स्पर्म व्हेल माशाचे तेल त्याच्या विशिष्ट गुणधर्मांमुळे जास्त उपयोगी आणि त्यामुळेच जास्त किमती होते. शिवाय त्याच्या पोटांत सापडणारे अंबरग्रीस अत्तरे आणि सुवासिक पदार्थ बनविण्यात वापरले जात असे. दोन्ही गोष्टींना खूप किंमत मिळायची. त्यामुळे व्हेल फिशरी हा एक मोठाच उद्योग होता.

a

या व्हेल फिशरी मध्ये युरोपातील आणि आशियातील अनेक देश आणि स्वतः अमेरिका मोठया प्रमाणांत गुंतली होती. नानटकेट बेटावर व्हेल मासे मारून त्यांचे तेल आणणारी अनेक जहाजे होती. सगळी त्या काळाप्रमाणे शिडांची जहाजे होती आणि त्यावरचे खलाशी, सारंग, कॅप्टन त्या काळांतल्या टेक्नॉलॉजी वापरून जगभर सर्वत्र जाऊन स्पर्म व्हेल मारून तेल घेऊन येत असत. बरेच लोक पृथ्वी प्रदक्षिणाही करायचे.

व्हेल बोट म्हणजे खास स्पर्म व्हेलची शिकार करायला बनवलेली. तीवर चरबी पासून आणि स्पर्म व्हेलच्या स्पर्मासेटीचे तेल काढायची यंत्रणा आणि व्यवस्थाही असायची. स्पेशल पर्पज बोट. तीवरचे खलाशी, सारंग, हारपूनवाले, सुतार, लोहार, तेल काढणारे सगळे स्पेशालिस्ट असायचे.

स्वतः हर्मन मेलव्हील एका व्यापारी जहाजावर खलाशी म्हणून गेला होता आणि त्याने हा व्हेल फिशरीचा उद्योग जवळून पाहिला होता, त्यामुळे या कथेला एक वजन प्राप्त झाले आहे. त्याचा कथाकथन करणारा इशमाएल त्याने स्वतः वरून घेतला आहे आणि कथानायक कॅप्टन अहाब, आणि इतर दर्यावर्दी लोक आपल्या स्वतःच्या अनुभवातून उभे केले आहेत.

त्याकाळचे ते दर्यावर्दी लोक, त्यांचे आचार विचार, त्यांच्या अंधश्रद्धा आणि श्रद्धा, कॅप्टन वरचा तो अगाध विश्वास, अखंड श्रम करायची त्यांची ताकद आणि इच्छा, समुद्राची वर्णने, जगातल्या ठिकाणची वर्णने, निरनिराळ्या

देशांतली माहिती आणि मुख्य म्हणजे स्पर्म व्हेलचे शारीरिक आणि मानसिक विवेचन यामुळे ही कथा विस्तीर्ण पण रोमांचक झाली आहे.

आणखी एक विशेष म्हणजे लेखकाने व्हेल आणि त्यांतल्या त्यात स्पर्म व्हेलचे वर्णन तपशीलवार केले आहे. एक लक्षांत ठेवायला पाहिजे की हे सर्व वर्णन १८५१ मध्ये लिहिलेल्या कथेत आहे आणि आजचे व्हेल बाबतचे ज्ञान खूपच पुढे निघून आले आहे. व्हेलला मारण्यासाठी जहाजातून समुद्रांत होड्या उतरवल्या जात आणि त्यांच्यावरचे व्हेलर हारपूनने त्या व्हेलला मारून टाकत असत. आता व्हेल हा काही हलका फुलका प्राणी नव्हे, चांगला ८०-९० टन वजनाचा प्राणी. तो मारून टाकणे म्हणजे शिकार आणि शिकारी या दोघांतली लढाईच असे.

व्हेल मारल्यावर आणि त्याला ओढत जहाजाकडे नेल्यावर त्याची चरबी, स्पर्मासेटी काढून त्यापासून तेल करून जहाज पुन्हा स्वच्छ करायचे याचेही वर्णन खूप तपशीलवार केले आहे.

कथानक सांगण्याचा उद्देश इथे नाही. पण थोडक्यांत म्हणजे एका अलबिनो स्पर्म व्हेलने आपला पाय तोडल्यानंतर इरेला पेटलेला कॅप्टन अहाब, त्याचे साथीदार त्यांच्या पेकोड जहाजाने त्या पांढऱ्या स्पर्म व्हेल चा माग घेत तीन महासागरांत सफर करतात आणि शेवटी त्या व्हेलची भेट झाल्यावर तो व्हेलच ते जहाज आणि सर्व खलाशी नष्ट करतो. आपला कथा सांगणारा फक्त वाचतो त्यातून आणि ही कथा उभी रहाते.

या कथेत निरनिराळ्या देशांतील रितिरिवाज, दंतकथा, व्हेल बद्दलची वर्णने, खासकरून विष्णूच्या मत्स्यावताराचे उल्लेख आपल्याला चकित करतात. व्हेल मासा नव्हे पण पूर्वीच्या शिलालेखांत, कोरीव कामांत, अगदी इजिप्तच्या पिरॅमिड मध्येही त्याची वर्णने मासा म्हणूनच केली आहेत. अगदी नीट पाहिले तर विष्णूच्या मत्स्यावताराचे चित्र व्हेलची शेपटीच दाखवते.

१८५०च्या काळातील कंपास, त्यावेळचे नवीन शोध लागलेले विद्युत निरोधक, शिडाच्या जहाजाचे संचलन, त्यावेळच्या दर्यावर्दी लोकांच्या कल्पना आजही आपल्याला गुंतवून ठेवू शकतात.

या कथेला स्वरूप देतांना हर्मन मेलव्हीलने त्यावेळी झालेल्या घटनांचा आधार घेतला आहे. १८२० मध्ये व्हेलने आपल्या टकरीने फोडून बुडवलेल्या एसेक्स, ऍन अलेक्झांडर आणि इतर अश्या जहाजांच्या कथा मिसळल्या आहेत. अटलांटिक, इंडियन आणि पॅसिफिक महासागरांची वैशिष्ट्ये वर्णली आहेत.

माणसाचा शिकारी स्वभाव, वेळीवेळी मनात येणाऱ्या विचारांनी होणारी आंदोलने, समुद्रावरचे एकलकोंडे जीवन, एखादा साथीदार समुद्रावर असताना बुडून मेला तर त्यावेळची त्यांची रुक्ष वृत्ती आणि घरच्यांची आठवण आल्यावर त्यांचा होणारा मनाचा प्रक्षोभ हे हृदयस्पर्शी रीतीने वर्णले आहे. एका माणसाच्या

अट्टाहासाने होणारा दुःखांत पण त्याला थांबविणारी मनशक्ती नसलेली त्याची ईर आपल्याला अचंबित करते.

जहाजाचा राजा म्हणजे त्याचा कॅप्टन. त्याला काही झाले तरी कोणीही विरोध करायचा नाही अशी मनोवृत्ती. तो सरळ सरळ धोक्याकडे घेऊन चाललेला आहे हे दिसतांनाही त्याला विरोध न करणे कोणत्या मनोवृत्तीचे दर्शक आहे असा विचार वाचणाऱ्याच्या मनांत येतोच. पण समुद्री कायदा याला कारण असावा.

या कथेच्या अनुषंगाने एसेक्स, ऐन एलेक्झांडर, कॅथलीन, म्युटीनी ऑन द बाउंटी, ताहिती, व्हेलच्या बाबतीतले इंग्लिश कायदे यांचेही एकदा वाचन झाले.

आपली सर्वांची एक पद्धत असते. एक वाचतांना त्यातून निघणाऱ्या इतर गोष्टीही आपण शोधून शोधून वाचतो. त्यामुळेच त्या मूळ गोष्टीचे आपले आकलन सखोल होत जाते.

माझा तरी असाच अनुभव आहे.

सुसंस्कृत

या आठवड्यांत दोन पोस्ट, म्हणजे एक वाचायला आणि दुसरी पाहायला, मिळाल्या. हां, आजकाल कुठल्याही लेखाला, कवितेला, ऑडिओ किंवा व्हिडीओला पोस्टच म्हणावे लागेल कारण की आजकाल याचे प्रकाशन ऑन लाईनच होते आहे.

पहिली पोस्ट होती डॉ. आगाशे यांची लिखित. त्यांत आजकालच्या सामाजिक परिस्थितीवर आणि करोनाच्या तीवर पडलेल्या प्रभावावर भाष्य केले होते. पोस्ट चांगली विचारवंत वाटली.

दुसरी पोस्ट आमच्या या इंजिनियर्स च्या ग्रुप वर पाहिली. ती व्हिडीओ होती. त्या पोस्ट मध्ये पूर्व भारतांत दुकानदार गिऱ्हाइकांवर विश्वास टाकून कसे सेल्फ हेल्प दुकान चालवतात याचे विवेचन व्हिडीओ मध्ये केले होते.

विचार करायला लावणाऱ्या पोस्ट आहेत दोन्ही.

एका पोस्ट मध्ये संचारबंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर आणि मास्क इत्यादी नियम न पाळणाऱ्यांवर दंड आकारायचा आणि शिक्षा करायची या विचारावर भाष्य केले आहे. दंड आकारायचा कुणी आणि त्याची वसुली करायची कुणी,

आणि त्या वसुलीचे नंतर काय होणार यावर मात्र त्या पोस्ट मध्ये लिहिलेले भाष्य नाही दिसले. म्हणजे नियमभंग केला तर त्याचे पैसे करायचे यावर भाष्य होते.

नियम आणि कायदे सगळे प्राणिजगत आपण होऊन तयार करते आणि त्याचे पालनही करते. जो हे पाळत नाही त्याला दुःखाला आणि क्लेशांना तोंड द्यावे लागते. बंडखोरपणा धोक्यांकडे घेऊन जातो हा सर्वच प्राण्यांना येणार अनुभव आहे. कायदेभंग आणि नियमभंग हे कशाचे निर्देशक आहेत?

कायदेभंग किंवा नियमभंग म्हणजे "गुन्हा" अशी जी काय व्याख्या आहे ती अजब आहे. मुळांत इतके कायदे आहेत आणि त्यांचे इतके नियम आहेत की बसल्याजागी प्रत्येक जण कितीतरी कायदे मोडत असेल आणि नियम पायदळी तुडवत असेल. प्रत्येक कायदेभंगाचे आणि नियमभंगाचे आर्थिक दंड हे उत्तर असू शकते का?

कायदेभंग आणि नियमभंग हे उत्पन्नाचे साधन म्हणून वापरले जावेत का?

कायदा म्हणजे लिखित नियम अशी व्याख्या करता येईल. आपण यापुढे कायदे आणि नियम यांना "नियम" असेच संबोधूया.

a

घोळक्याने रहाणारे सर्व प्राणी काहीतरी नियम असल्या खेरीज एकत्र राहूच शकणार नाहीत. त्यांचे नियम अलेखित पण कडक असतात. जेंव्हा नियमांचे पालन आपण होऊन होते तेंव्हा तो घोळका एकसंध आणि विद्रोहविरहित रहातो. शेवटी नियम म्हणजे तरी काय? सामाजिक स्वास्थ्यासाठी करायच्या आणि न करायच्या गोष्टीच ना? सामाजिक जीवनाचे फायदे मिळवायचे असले तर प्राणी आपोआपच ते नियम पाळतात. शत्रूपासून रक्षण, अन्नाचा शोध, एकमेकांना मदत आणि आपली प्रजा सुखरूप रहावी हाच जीवनाचा उद्देश. तो हे नियम पाळल्याने साध्य होतो. जे प्राणी बंडखोरी करतात त्यांना त्यांचा समाज बाहेर टाकून देतो. मग त्यांना एकटेपणा, क्लेश, भूक, धोके आणि प्रसंगी मृत्यूलाही सामोरे जावे लागते.

संस्कृती म्हणजे नियमांचे व्यवस्थित पालन करणे असे म्हणता येईल. सुसंस्कृत म्हणजे नियमांचा आदर आणि त्यांचे उत्तम पालन करणारा प्राणी किंवा समाज असेही म्हणता येईल.

अगदी बाळ असल्यापासूनच नियमांचे पालन कसे करावे याचे प्रशिक्षण प्राण्यांतील माता आपल्या मुलांना देतात. प्रगत प्राणीसमाजांत हे शिक्षण आणि नंतर प्रशिक्षण माता कसोशीने देतात. थोड्या अप्रगत प्राणीसमाजांत ते थोडे कमी मिळते मुलांना. मग निसर्ग ही उणीव जास्त पिल्ले निर्माण करून भरून काढतो. जेवढी आयुष्याची लांबी जास्त तेवढे हे संस्कृती शिक्षण ही जास्त काळ

चालते. आता पिल्लांना नियमांचे ज्ञान जन्मतः असते का? ते ही टक्के टोणपे खात शिकत असते. पण काय करू नये हे लौकर शिकते. असे नको ते केल्याची अपराधी जाणीव मुलांना खूप लौकर येते.

नियम अनुभवातून येतात. चांगल्या आणि वाईट. वाईट अनुभव कुणालाच नको असतात त्यामुळे त्यांचे ज्ञान लौकर व्हावे लागते. शिवाय प्रत्येकालाच स्वतःच्या अनुभवातून शिकायची गरज नसते त्यामुळे दुसऱ्याला आलेल्या अनुभवातून शिकणे त्याच्या फायद्याचे आणि सुरक्षित असते. याविरुद्ध चांगले अनुभव देणारे नियम सगळ्यांनाच आवडतात. ते मात्र प्रत्यक्ष मिळण्यासाठी प्रत्येकजण प्रयत्न करतो.

नियम जरी ठरले असले तरी ते सर्वांपर्यंत पोचले पाहिजेत. मानवेतर प्राणी ते सर्वांपर्यंत कसे पोचवतात हे अजून गूढ आहे. एकतर इतरांची कॉपी करायची किंवा नैसर्गिक उर्मी मधून पालन करायचे असे उपाय त्यांच्याकडे असतात. हे शिक्षण बहुधा पिलांची आईच देते. काही थोड्या प्रजातीत वडील देतात.

चांगले काय आणि वाईट काय हे विचार करणाऱ्या विशेषतः मनुष्यप्राण्याला समजण्यासाठी धर्म आणि अधर्म, सामाजिक, असामाजिक आणि दया आणि क्रूरता अशी नावे देऊन त्यांची ओळख आणि वर्गवारी केली

आहे. वर त्या ओळखीला वजन येण्यासाठी स्वर्ग आणि नरक आदी कल्पना केल्या आहेत.

दुसऱ्याने मिळवलेली, केलेली किंवा शोधलेली गोष्ट आपण आपली म्हणून वापरू नये नाहीतर आपल्याला समाज नावे ठेवील किंवा आपल्यावर बहिष्कार घालेल अशी भीती मनांत उत्पन्न केलेली असते.

विशेषतः वाईट गोष्ट असेल, समाजाला हानिकारक असेल तर कसून त्या गोष्टीचा विरोध केलेला असतो, उदा. चोरी, हिंसा, अतिचरण, खोटे बोलणे आणि असे.

याविरुद्ध एखाद्याने चांगली गोष्ट केलेली असेल तर तिचे कौतुक होते, समाज त्याचा आदर करतो, त्याने केलेल्या त्या गोष्टीचा प्रसार आणि प्रचार करतो, त्याचे नाव प्रसिद्ध होते. त्याचे विचार समाजप्रिय आणि समाज हितकारी होतात. त्याच्यामुळे समाजाची प्रगती होते.

पण काहीवेळा एखादा काही विचार करतो, काही कार्य करतो, काही नवीन गोष्टी समाजापुढे आणतो पण त्या तो इतरांना देण्यासाठी आडकाठ्या आणतो, आपले विचार, आपले आचार, आपले ज्ञान माझे म्हणून लपवून ठेवू पाहतो. त्यावेळी तो त्याचे प्रसिद्ध केलेले विचार, आचार, ज्ञान मिळवू शकणाऱ्या किंवा

त्याचा उपयोग चांगल्या कारणा करता करू पाहणाऱ्यांना आडकाठी आणतो किंवा त्यांना असामाजिक संबोधून म्हणून त्यांच्यापासून दूर जाऊ पहातो. अश्या व्यक्तीला काय म्हणावे?

प्रकट आणि अप्रकट ज्ञान सर्वत्र असते. ज्ञान किंवा चांगले विचार, आचार आणि त्यांचा प्रचार ही समाजाला हितकारीच असतात. त्याने समाजाचे प्रगतीचे प्रयत्न जास्त परिणामकारक होतात. एखाद्या कार्याला लागणारे श्रम कमी होतात.

संस्कृती आपल्याला काय सांगते? चांगल्या गोष्टींचा आणि वाईट गोष्टींचाही प्रचार करा म्हणजे सर्वांना त्याचे ज्ञान होईल आणि चांगल्या गोष्टी लोक करतील आणि वाईट गोष्टी टळतील. समाज सुसंस्कृत होईल.

ज्ञान हे एक लक्षण आहे. ते मिळविल्याने कोणीतरी सुखी, समृद्ध किंवा सुसंस्कृत होईल याची काही खात्री नसेल तसेच तो दुःखी, गरीब आणि असंस्कृत होईल अशीही खात्री नसेल.

पण ज्ञान विकले जाऊ शकते, धनाच्या स्वरूपांत किंवा कीर्तीच्या स्वरूपांत. धनलोभी ज्ञानी विद्वान खराच पण आपले ज्ञान लपवू पाहील किंवा त्याचे धनांत रूपांतर करू पाहील, त्याच्या ज्ञानाला तो सर्वपरीने सांभाळण्याचा

प्रयत्न करील, तो पेटंट घेईल, त्याचे ज्ञान पैसे न देता वापरणाऱ्यावर खटले भरील, त्यांना बहिष्कृत करू पाहील. तो सुसंस्कृत म्हणावा का, की फक्त आपल्या ज्ञानाचा व्यापारी?

निर्लोभी ज्ञानी तेवढाच विद्वान, पण तो समाजाच्या उद्धारासाठी, सामाजिक श्रम कमी करण्यासाठी आपले विचार, आचार आणि ज्ञान वापरू देईल. त्यालाही प्रसिद्धी मिळेल पण ती आदराने, मानाने आणि मनापासून.

संस्कार आणि संस्कृती नियमबद्ध असते. नियमभंग करणाऱ्याचे काय करायचे याचेही विवेचन तींत केलेले असते.

आता त्या दोन पोस्टकडे वळलो तर काय दिसून येते. एक विचार नियमभंग करणाऱ्यांवर दंड लावा. म्हणजे त्या नियमभंगातून पैसे काढा. कसला विचित्र विचार आहे हा, यावरचे भाष्य.

नियम आपणहून पाळायचे असतात कारण ते आपल्या भल्याकरता असतात असे धरून चाललेले असते. नियम पाळण्यासाठी कायद्याची भीती नव्हे तर मनाची शरम हा प्राईम फोर्स असला पाहिजे. शरम किंवा अपराधी भावना हा एक मोठा ड्रायव्हर आहे.

a

दंड भरून परत तसाच नियमभंग करणारा काय शिकतो? की गुन्ह्याला औषध पैसे! पैसे भरा आणि गुन्हे करा!

जे आतून, मनापासून येते तीच संस्कृती. त्या पूर्वभारतातल्या दुकानदारांकडून आणि त्यांच्या गिऱ्हाईकांपासून आपण धडा घेतला पाहिजे की चांगले काय ते. एकमेकावरचा विश्वास दाखवतो तो व्हिडीओ.

वरवर कायद्याचे पालन करणारे आणि आतून पार विरोध करणारे आणि सरळ सरळ उलटे वागणारे आणि दंड लावून कायद्याचे पालन करवणारे दोघेही धन्य असोत. त्यांना काय विशेषणे लावावीत ते समजत नाही.

शेवटी सुसंस्कृत कोण आणि असंस्कृत कोण, समाज हितकारी कोण आणि समाज विघातक कोण हे ज्याचे त्यांनीच ठरवायचे आहे.

पुढे काय?

चला.

आणखी एक ऍक्शन झाली. आपले दोन्ही डोस घेऊन झाले. आता तसे आपल्या बऱ्याच मंडळींचे झालेले दिसतात. एक टप्पा गाठला आपण सर्वांनी. तसे आता बरेच टप्पे दिसायला लागले आहेत.

जातो, चाललो म्हणणारा कोरोना परत फिरून आला. गेल्या वर्षीच्या मार्च एप्रिल सारखे त्याने पुन्हा ठाण मांडले. पण आता परिस्थिती थोडी वेगळी झाली आहे. गेल्यावर्षी घबराटीचे वातावरण होते. लॉक डाऊन चा अनुभव नवा होता. जग अंधारात चाचपडत होते. कोरोनाचे रहस्य अजून पूर्णतः समजले नव्हते.

एक वर्षाचा टप्पा गाठला. आता कोरोनाची जाणीव आणि जागरूकता वाढली आहे. शत्रूच्या पहिल्या भडीमारानंतर जी दाणादाण उडते त्यातून थोडे सावरलो आहोत. कोरोनाची भीती काहीशी कमी होते आहे. नवीन माहिती पुढे येते आहे. पहिली लाईन ऑफ डिफेन्स तयार झाली आहे. त्याप्रमाणे थोडे थोडे वागता येऊ लागले आहे. मुख्य म्हणजे कोरोनाची ट्रीटमेंट आणि त्याचे निवारण या दोघांमध्ये आता विश्वास निर्माण झाला आहे.

a

जनजागरणांत थोडी प्रगती झाल्यामुळे लसी त्यांचे प्रकार, त्यांचे परिणाम, काळजी घेतली तर वाचण्याची शक्यता यावर विश्वास बसू लागला आहे. गेल्या वर्षी इतर देशांच्या अनुभवामुळे बसलेला धसका जरातरी कमी झाला आहे. आपल्याच देशांत असलेल्या उपायांनीही कोरोनावर मात करता येईल असे वाटू लागले आहे. सरकारांनी उचललेल्या पावलांचे परिणाम दिसू लागले आहेत.

यावर्षी कोरोनाची दुसरी लाट वेगळे रूप घेऊन आली आहे. पण तिचा अभ्यास वेळेवर होतो आहे त्यामुळे तिच्याशी लढण्याचा आत्मविश्वास दिसतो आहे. गेल्या वर्षांपासून चाललेल्या अभ्यासामुळे कोरोनाच्या टेस्ट कश्या असतात आणि त्यांचे निष्कर्ष कसे काढायचे याचे विवेचन सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचते आहे.

त्या टेस्ट मधली गूढता कमी होऊन तिचे उद्दिष्ट काय याचे आकलन होत आहे. टेस्ट मध्ये पॉझिटिव्ह आले तरी भीती न वाटता त्याच्या उपाय मिळतो यावर विश्वास बसतो आहे. टेस्ट पॉझिटिव्ह आली हे गुप्त न ठेवता उलट जाहीर करून इतरांना सावध करण्याची वृत्ती वाढते आहे. स्वतःला आयसोलेट करून इतरांचे रक्षण करण्याची वृत्ती वाढते आहे.

काही काही बाबतीत दुर्लक्ष्य होताना दिसते आहे पण त्या दुर्लक्ष्याचा विरोधही होताना दिसतो आहे. लोक पुढे येऊन आपली मते मांडू लागले आहेत.

ही सगळी सकारात्मक वातावरणाकडे घेऊन जाणारी लक्षणे आहेत.

विविध विचार पद्धती आपापले दृष्टिकोन मांडू लागल्यामुळे जागरूकता आणि चर्चाही बोधप्रद होत आहेत. कोणत्याही आजारावर एकापेक्षा जास्त उपचार असतातच. प्रत्येक उपचाराची पद्धत आणि परिणाम वेगवेगळ्या रीतीने दिसून येतात. जसे शारीरिक उपचार असतात तसेच मानसिक उपचारही असतात. आजच्या दिवसांत दोन्ही उपचार पद्धतीवर विवेचने दिसत आहेत.

लसीकरण कार्यक्रम जोरदारपणे चालला आहे त्यामुळे एक प्रकारचा सामाजिक विश्वास वाढत चालला आहे. सामाजिक आणि सरकारी जडत्व थोडेफार असणारच. पण एकदा गाडी चालू झाली की तिचे चांगले परिणाम होतीलच.

शारीरिक स्वास्थ्यासाठी औषधे, प्रिव्हेंटिव्ह केअर, लसीकरण हे उपाय आहेतच. मानसिक स्वास्थ्यासाठी आता ज्योतिष वैज्ञानिकही पुढे येऊ लागले आहेत. आपण कुठल्याही दुःखक्लेशाची कारणे शोधतोच. हा शोध भौतिक आणि मानसिक पातळीवर होतोच.

a

काल परवाच एक व्हिडिओ पाहिला. त्यांत २०१९च्या मध्यापासून आजवरचे आणि यापुढच्या दोन तीन वर्षांचे ज्योतिषशास्त्रीय विवरण केले आहे. त्यानुसार ग्रहस्थिती अशी होती की असे संकट येणारच होते.

मंडळी, जरा थांबा. टीका टिप्पणी करण्या अगोदर जरा विचार जरा. आपण इंजिनीयर आहोत, विज्ञानाचा आपण अभ्यास केला आहे. फिजिक्स, केमिस्ट्री, गणित आणि बायोलॉजीवर आपला विश्वास आहे. आपण ऑब्झरवेशन आणि अनलिसिस वर विश्वास ठेवतो. विचारपूर्वक सगळ्या गोष्टी समजावून घेतो. पण सगळे असे असत नाहीत. जे ही विज्ञाने समजू शकत नाहीत ते इतर विज्ञानांवर विश्वास ठेवतात आणि अश्या लोकांची संख्या जगांत खूपच जास्त आहे. त्यांचे मत झुगारून टाकण्यासारखे नाही. ज्योतिषशास्त्र आणि भविष्य कथन यांना आजही चांगला मान दिला जातो. ज्योतिष्यांचे अगदी सिरियसली ऐकले जाते. समाजातल्या सर्व थरांत.

तर त्या व्हिडीओ मध्ये असे म्हटले आहे की रवी, गुरू, शुक्र, प्लूटो, शनी, राहू आणि केतू यांचे प्रभाव पडल्यामुळे अशी स्थिती झाली आहे. अश्या स्थितीचा पूर्वीचा मागोवा घेतला आहे आणि १९१८ ते १९२० मध्ये आलेल्या स्पॅनिश फ्लू चा उल्लेख केला आहे. आणि पुढे या व्हिडीओ मध्ये असे म्हटले आहे की २०२१च्या मध्यापासून सुरुवात होऊन २०२२च्या मध्यापर्यंत ही साथ

ओसरणार आहे. ठीक आहे, असे विवरण आपल्या विश्वासाप्रमाणेच घ्यायचे असते.

अशी भाकिते कितीही लोकांनी केली आणि कितीही लोकांनी नाकारली तरी बरेच लोक त्यांवर विश्वास ठेवतात हे सत्य नाकारता येणार नाही.

असेच भाकीत २०२०मध्ये वाचल्याचे आठवते का?

त्या भाकीताप्रमाणे कोरोनाची लाट दोन तीन वेळा येणार आहे हे जीवशास्त्रज्ञांनी सांगितले होते. त्यांनी त्यांच्या व्हायरस च्या अभ्यासांचा हवाला देऊन हे सांगितले होते. एवढेच काय पण कोरोना व्हायरस जुनाच असून त्याचे लक्षण आणि त्याचे निवारण यावरही भाष्य केले होते. कदाचित शास्त्रज्ञांना ही लाट एवढी मोठी येईल आणि जगभर पसरेल असा अंदाज आला नसावा.

सरकारे गाफील राहिली आणि त्यांनी शास्त्रज्ञांचे म्हणणे सिरियसली घेतले नाही हे उघड आहे. याचे कारण "लांडगा आला रे आला" असे असू शकेल. शास्त्रज्ञ नेहमीच अतिसावध सूचना देतात. पण त्या पाळायचा तर आर्थिक आणि सामाजिक किंमत द्यावी लागते. आणि बहुधा त्या सूचना निरर्थक ठरतात असे त्याचे मत होते. पण औषध कंपन्यांनी मात्र अगदी सिरियसली घेऊन पुढे पाऊल टाकले. लसीकरणाचा त्यांचा अभ्यास आणि काम सुरू केले.

आपणही या गाफीलपणाची किंमत दिली आहे. आपले किती साथीदार बळी पडले आहेत किंवा किंवा कितीतरी साथीदारांनी या आजाराची लक्षणे आणि उपचार यांना तोंड दिले आहे.

साथी येतात आणि जातात, आपली किंमत वसूल करून जातात. कोरोनाच्या साथीने एक मात्र शिकविले. "टेक मी सिरियसली, ऑर यू विल बी सिरीयस".

मग पुढे काय?

जग चालतच असेल, आयुष्य चालतच असेल. आपण आपले जीवन जगतच असू. नवे जुने आजार येतील आणि जातील. जर आपण सावध असलो आणि तयार असलो तरी आपण त्यांना तोंड देऊच, यशस्वीपणे.

एक गोष्ट आपल्याला या साथीने चांगली समजावली आहे ती ही की घरांत बसून आपण बोअर नक्कीच होत नाही. लॉक डाऊन म्हणजे अगदीच तुरुंगवास नाहीये. पूर्वी अत्यावश्यक वाटणाऱ्या गोष्टी तेवढ्या अत्यावश्यक नाहीत. चार नातेवाईक, चार मित्र मंडळी, चार पै पाहुणे यांचे दुरुनही स्वागत करता येते आणि त्यांच्याशी चार गप्पा गोष्टीही करता येतात. आपलेही मन लिखाण,

काव्य, संगीत आणि चित्रकला यांतून गुंतून ठेवता येते. उलट यापूर्वी करता न आलेल्या कितीक गोष्टी आता करायला मिळाल्या आहेत आणि त्यांतला आनंद नव्याने घेता आलेला आहे. आपण आपल्या घरच्यांच्या जवळ किती आलो ते पाहून चकित होऊ.

आता वेळ आहे आपल्याकडे. सुप्त कला आहेत आपल्याकडे. त्यांचा विकास करायची संधी आली आहे आपल्याकडे. टीव्ही वरच्या त्याच त्या क्लेशकारक बातम्या वाचून आता टीव्हीची गरजच काय इथपर विचार करायची वेळ आली आहे.

आता वेळ आली आहे ती स्वतःला प्रकट करायची. इतरांच्या टिमक्या वाजवल्या एवढी वर्षे, आता स्वतःच्या वाजवू.

स्वतः गाणी गाऊ. स्वतः कथा लिहू. स्वतः कविता करू. आपण आपल्याला व्यक्त करू.

पुढे काय संकट येणार आहे त्यापेक्षा पुढे काय संधी मिळणार आहेत यावर मन केंद्रित करू.

a

जसा पुस्तक दिन असतो तसा कला दिन ही असावा. त्यादिवशी सगळ्यांनी मिळून आपल्या कला प्रकट करायच्या.

एक एक टप्पा दिसत जातो तो गाठला की पुढचा. टप्पे संपणार नाहीत पण आयुष्याला एक दिशा देऊन जातील, एक लक्ष्य देऊन जातील.

नव्या टप्प्यांचे स्वागत करू आणि त्यातून नव्या संधी शोधू.

वादाचे महत्व

शिकण्याच्या पद्धतींत वाद घालणे ही एक मोठीच पद्धत आहे. "वादे वादे जायते तत्वबोधः" अश्या या अर्थाचे संस्कृत वचन (म्हणजे शब्द, प्रॉमिस नाही) कुठेतरी वाचले आहे असे आठवते. वादाचा आधार घेऊन आपल्या विचारांना तोंड फोडणे ही ही एक शिकण्याची पद्धतच आहे.

वाद, वादविवाद, वादावादी, वाद घालणे, वितंडवाद आदी नावाने ही पद्धत ओळखली जाते. परंतु या प्रत्येक शब्दाला वेगळा वास आणि चव आहे. जो तो आपल्या आवडी प्रमाणे त्याचा सोयीस्कर अर्थ लावत असतो असे दिसले आहे.

बहुधा जो प्रथम वादाला तोंड फोडतो, त्यांच्या मते त्याने एक विचारपूर्वक मांडलेला मुद्दा असतो तो. त्याने खूप कष्ट घेऊन, ऍनालिसिस करून काही विषय एका मुद्द्यावर आणलेला असतो असतो आणि त्याला एकतर हा मुद्दा बळकट करायचा असतो किंवा अजून असे मुद्दे उपस्थित करण्यासाठी फीडबॅक घ्यायचा असतो.

अतिशय उदात्त हेतूने त्याने मांडलेला मुद्दा वादविवादाच्या सभेत बसलेले लोक अश्या काही विचित्र हेतूने विचाराला घेतात की त्या वादातीत मुद्द्याचे

वरील प्रकारांत परिवर्तन होते. हरे राम, काय करायला गेलो आणि कोणीकडे मुद्दा चालला आहे असे त्यास वाटू लागते. सांस्कृतिक भाषेत "हेच फळ काय मम तपाला?" किंवा ग्रामीण भाषेत "करायला गेलो गणपती अन झाला मारुती" किंवा ग्राम्य भाषेत "झक मारली. बास आता" असे म्हणून तो गप्प बसतो.

वादाचे विषय तरी काय असावेत? काहींच्या केसेस बघूया.

१ मास्क लावणे

मास्क लावण्याने जंतू थांबतात की नाही? मग आत्ताच का मास्क लावायचे? आता पर्यंत काय जंतू नव्हते का? चिनी मास्क चांगला की इंडियन? मास्क मधेच जंतू असतात का? मास्क लावल्याने आपण आपलाच श्वास पुन्हा पुन्हा घेत नाही का? का मास्क लावल्याने हवेतला ऑक्सिजन पूर्णतः वापरला जातो?

२ व्हॅक्सिनेशन करावे की नाही?

व्हॅक्सिनेशन ने खरंच फायदा होतो का? व्हॅक्सिनेशन पहिल्यांदा कुणी करावे? "पहले आप, पहले आप" असे करावे का? व्हॅक्सिनेशन देणाऱ्याने अगोदर केले आहे का? सुईतून संसर्ग होईल का? नक्की लस आहे ना जी साधे पाणी आहे? लहानांना अगोदर लस द्यावी की मोठ्यांना? सुया उकळून घेतात का? नक्की लस दंडांत टोचली आहे का नाही?

३ कोरोना हा नैसर्गिक आहे का?

कोरोना हा खराच व्हायरस आहे का? की औषध कंपन्यांनी केलेली एक चाल आहे? याचा एवढा गाजावाजा का झाला? शेतांत दिवस रात्र राहणाऱ्यांना कोरोना कसा होतो? औषध कंपन्यांनी लस निर्मितीची प्रोसेस दोन वर्षांपासून कशी काय सुरू केली? त्यांना काय स्वप्न पडले होते का की कोरोना येणार आहे म्हणून?

४ ऑक्सिजन चा तुटवडा का?

हवेत किती ऑक्सिजन असतो? मेडिकल ऑक्सिजन इतर ऑक्सिजन पेक्षा वेगळा असतो का? इतर ऑक्सिजन हुंगला तर काय होईल? पण असेच तर जन्मभर करत आलो आहोत ना? मग आता मेडिकल ऑक्सिजन का पाहिजे? ऑक्सिजनचा तुटवडा कसा काय असू शकतो? ऑक्सिजन गोडाऊन मध्ये साठवून ठेवता येतो का?

५ फॉरवर्ड करावेत की नाही?

फॉरवर्डला इतका विरोध का आहे? फुकटं फाकटांत एवढे ज्ञान मिळते ते का नाकारायचे? सगळे लोक फक्त फॉरवर्डच करत असतील तर मग ते बनवतो कोण? त्या फॉरवर्ड बनवणाऱ्या आणि लिहिणाऱ्या लोकांना कसे काय सगळे समजते? मग आपल्याला कसे समजत नाही? फक्त दोन चार बटणे दाबून एवढी

करमणूक होत असतांना लिहिण्याची किटकीट कशाला करायची? फॉरवर्ड करायची स्पर्धा का लावू नये?

आता हे वरचे विषय फक्त सॅम्पल म्हणून घेतले आहेत. खूप आहेत असे विषय. एकदा बघा वाद घातल्यामुळे आपले ज्ञान किती वाढते ते.

एकदा एका ट्रेनिंग प्रोग्रॅम मध्ये आम्हाला शिकविले की ज्ञानवर्धनाचे चार प्रकार आहेत.

१ विचार करणे
२ ऐकणे
३ सांगणे
४ करणे

ऐकणे तर शाळेपासून आणि खरेतर जन्मापासून करत आलो आहोत. त्यामुळे ते आपल्याला अगदी माहितीचे आहे.

सांगणे या प्रकारांत शिकवणारा विचारतो की काय समजले ते सांग. मग तो शिष्य जसे समजले तसे सांगतो. एखाद्यावेळी पुन्हा शिकवायला लागते.

a

करणे म्हणजे अनुभव घेणे, करून पहाणे, हात काळे करणे, असे. सगळ्यांत खर्चिक आणि दमवणारा प्रकार हा. पण काही बाबतीत अगदी आवश्यक. उदा. लग्न, संसार वगैरे. तिथे पहिले प्रकार नक्की तोकडे पडणार!

रहाता राहिला पहिला प्रकार, विचार करणे. देवाने सर्वांना छानपैकी मेंदू दिला आहे. शिवाय आयडीएशन, कंपॅरिझन, ऍनालिसिस, कनक्लूजन या प्रक्रियाही दिल्या आहेत. मग ज्ञान मिळवायला आणि ते इतरांच्या पर्यंत पोचवायला आपण सज्ज आहोत. आपल्या विचारांना इतरांच्या विचारांची जोड देऊन किंवा त्याच्या विचार लक्षांत घेऊन आपले जास्त सखोल आणि त्रुटी विरहित कसे होतील ते करता येते आहे.

विचारांची देवाण घेवाण म्हणजे वादविवाद. फक्त ती निरोगी पाहिजे. एकदा इगो नावाचा व्हायरस त्यांत शिरला की वादविवादाचे वादावादी, वितंडवाद आणि वाद घालणे या त्याच्या वर म्हटलेल्या नको त्या रूपांत परिवर्तन व्हायला वेळ लागत नाही. वाद कुठे थांबवायचा हा एक नाजूक प्रश्न आहे. नाहीतर ती एक ब्रेकलेस गाडी होते आणि उगाच विध्वंस होण्याची शक्यता होते.

पूर्वी वादविवादाच्या स्पर्धा असायच्या. निरोगी पद्धतीने मांडलेल्या मुद्द्यावर चर्चा घडवून तो मुद्दा पक्का करून समाजाच्या प्रगतीसाठी वापरला

जायचा. कधीतरी स्पर्धे करता स्पर्धा म्हणून लोकांना आपले डोके चालवायचा चान्स मिळायचा.

अगदी राजे सम्राट ही आपल्या पदरी असे वादपटू आणि वाकपटु लोक ठेवायचे. ते त्या राजाचे मनोरंजन आणि प्रसंगी सल्ला मसलतही करायचे. दुसऱ्या राज्यांतल्या वाकपटूचा पराभव करून राजाचे मन सुखवायचे.

नंतरच्या म्हणजे अगदी आपल्या काळांत उमेदवार निवडताना तो किती चांगले पटवून देऊ शकतो आणि कसा इतरांना लीड करतो ते पाहण्यासाठी डिबेट या एक इंटरव्यूचा प्रकार आला होता. आता त्यांत बोलघेवडे लोक बाजी मारायचे ती गोष्ट वेगळी पण अंगच्या हुशारी बरोबर ती हुशारी वापरात ही आणता आली पाहिजे हा विचार वादविवाद घडविण्यांत होताच. पब्लिक रिलेशन करता ही कला बेस्ट.

रिकामा वेळ घालवायला याहून उत्तम उपाय दुसरा नसेल. डोके तल्लख पण करायला काही नाही अश्या मंडळींना हा एक टाइम पास एकदम फक्कड! खर्च काही नाही, डोके चालवल्यामुळे शीण गेलेला, झोप मस्त लागणार. शिवाय मन कसे हलके हलके होणार.

a

बरं, याला आयक्यू, पैसे, शिक्षण, जागा, काळ, वेळ, वय, लिंग, सामाजिक स्तर याचे काहीही बंधन नाही. कोणीही वादविवाद करू शकतो. एक प्रकारची मानसिक लढाईच. त्यामुळे जिंकल्याचे सुख मिळविण्याची शक्यता. त्यामुळे कुठेही वाडविवादाचे अड्डे बसू शकतात.

"तबला" म्हणजे एक विशिष्ठ दिशा नसलेला वादविवाद. आम्ही सर्वजण यांत अगदी पारंगत होतो. कुठेतरी सुरुवात करून कुठेतरी संपणारा किंवा संपवलेला तो वादाचा प्रकार होता.

निरोगी वादविवादात बहुधा कोणीच जिंकत किंवा हरत नाही. बरेच मुद्दे आणि त्यावरून आलेले प्रतीमुद्दे बरोबरच असतात. फक्त वादाची दिशा "काय मुद्दा आहे" अशी पाहिजे, "कोणी मुद्दा आणला" अशी नको कारण मग वेगळीच कलाटणी मिळते त्या वादाला. जे बरोबरीचे असतात तेच अर्थपूर्ण वादविवाद करू शकतात. बरोबरीचे म्हणजे वैचारिक रित्या बरोबरीचे.

फक्त हरणाऱ्या पासून सावध रहायचे. कारण एकदा वैचारिक मुद्दे संपले की तो हरणारा शारीरिक, वैयक्तिक आणि इतर अनाठायी मुद्द्यांवर उतरणार हे नक्की. हरायला कुणाला आवडते? पण शारीरिक किंवा वैयक्तिक मुद्द्यांवर येणारा हा विचार करत नाही. त्याला हरणे सहन होत नाही. मग तो मुद्द्यावरून

गुद्यावर किंवा त्याहून वाईट म्हणजे वैयक्तिक पातळीवर उतरतो आणि मग सगळी कुस्करी होते.

मानवजात प्रगती करू शकली आहे ती विचारांची देवाण घेवाण केल्यामुळे. मग आपण त्याला हातभार लावला तर काय बिघडते?

तर बंधू भगिनींनो, वादविवाद जरूर करू. काहीतरी तत्वबोध होईलच. पण भांडणे नकोत. आज आम्ही जिंकलो, उद्या तुम्ही जिंका पण भाग घ्या. काठावर बसून हरण्या जिंकण्याची मौज कशी येणार? भाग घेण्यांतही जो आनंद आहे तो तरी लुटा.

सर्वांचे स्वागत आहे.

जाहिरातबाजी

आपण कोण आणि आपण काय आहोत ते इतरांना कळले नाही तर काय उपयोग?

रामदास स्वामींनी सांगितले "आपली आपण करी स्तुती, वडिलांची सांगे कीर्ती, तो येक मूर्ख जाणावा". पण रामदास स्वामी जर आज असते तर ते काय म्हणाले असते? अर्थात, असा विचार करणारे आम्हीच एक विचारवंत नाही. अगोदरच कुणीतरी महान आत्म्याने असा विचार मांडला आहे आणि ती आम्हाला पटला आहे आणि आम्ही त्याचीच री ओढत आहोत.

तसे नसते तर रेडिओ सिलोनच्या व्यापार विभागाला आम्ही इतके डोक्यावर घेतले असते का? बिनाका गीतमाला ही प्रथम "बिनाका" होती आणि नंतर गीतमाला होती असे त्या काळातले शेंबडे पोर सुद्धा सांगेल. पण शेंबडे पोरच का? चांगली इंजिनियरिंगला शिकणारी पोरेही सांगत होती तसे. ती शेंबडी नसून! आणि हो, शेंबडे पोर बावळट असते असे कोण म्हणते? भले हुशार असते ते. शेंबूड पुसण्यात वेळ घालवत नाही.

जे रेडिओ सिलोनच्या व्यापार विभागाला एवढे लौकर पन्नाशीच्या दशकात समजले ते आमच्या ऑल इंडिया रेडिओला समजायला सत्तरीचे

दशक का उजाडले याचा रिसर्च कुणी केला आहे का? केला असल्यास तो प्रसिद्ध करणे. पण एकदा ते समजल्यावर आमचा झोपी गेलेला जागा झाला आणि चांगलाच चळवळ करायला लागला. विविध भारती ने जाहिरातींचे प्रसारण करायला सुरुवात केल्यानंतर जाहिरातींना नुसता फुलोरा आला. दोन जाहिरातींमध्ये फक्त टिंग टॉंग असे वाजविण्या ऐवजी सतारीचे झंकार आणि बोल ऐकविण्याची आमची भारतीय पद्धत न्यारीच.

रेडिओ सिलोन चा व्यापार विभाग पार मागे पडला. कुणी ऐकेनासा झाला.

नंतर दूरदर्शन (दुर्दशन नव्हे हो!) च्या जाहिराती सुरू झाल्या आणि त्याला सोन्याची खाण गवसली. छायागीत, रविवारचा सिनेमा या जाहिरातींनी फुलून गेले. कधी कधी तर सिनेमापेक्षा जाहिरातीच जास्त मनोरंजक असायच्या.

"हॉकिन्स की सीटी बजी, खुशबूही खुशबू उड़ी
लज्जतदार मजेदार खाना है तैयार, हांजी खाना है तैयार
मुर्ग मुस्सलम, टमाटो सूप, मटर पुलाव, मांकी डाल
खीर और दम आलू!
हर व्यंजन स्वादिष्ट बनाये, मिनिटोंमें झटपट पकाए
हॉकिन्स, हॉकिन्स, हॉकिन्स प्रेशर कुकर!"

a

जाहिरात ऐकून आणि नीना गुप्ताचा नृत्याभिनय पाहून एखाद्याला वाटेल की हॉकीन्स प्रेशर कुकर आणला की झाले! द्रौपदीची थाळीच जणू. सर्व पंचपक्वान्ने समोर हजर झालीच बघा. अशी पाहिजे जाहिरात!

अशीच "ला लारा लारा, लारा लारा ला, लारा लारा ला, ला ला ला" एवढीच धून असलेली लिरील ची जाहिरात! एकही शब्द नसतांना केवढी दिलखेचक होती नाही? आणि ती ओढ्यांत भिजणारी मुलगी? एका जाहिरातीने केवढी प्रसिद्ध झाली होती!

तेंव्हाच्या जाहिराती पाहिल्या आणि ऐकल्या तर असे लक्षांत येईल की जेवढे माध्यम दुबळे तेवढी जाहिरातीची क्वालिटी चांगली. रेडिओ पेक्षा टीव्ही पॉवरफुल. ब्लॅक आणि व्हाइट टीव्ही पेक्षा रंगीत टीव्ही पॉवरफुल. रंगीत एसडी टीव्ही पेक्षा एचडी टीव्ही पॉवरफुल. पण जाहिराती दुबळ्या, एवढी टेक्नॉलॉजी असतांना.

आज जाहिरातींना एवढा भाव आला आहे की त्यामध्ये सिनेमातले रिटायर्ड लोक येऊ लागले आहेत. पूर्वी सिनेमांत जायच्या आधी जाहिरातीत यायचे मग सिनेमांत जायचे असे होते. आता उलटे. पण पैसे मात्र सिनेमा सारखेच घेणार. सारखे लोकांच्या डोळ्यांसमोर राहिले पाहिजे नाहीतर लोक विसरणार त्यांना.

a

इन्शुरन्स च्या जाहिरातींना उत आला आहे. जसे काही इन्शुरन्स घेतला नाही तर संपलेच सर्व. आणि त्या इन्शुरन्स च्या जाहिरातीतला नट काय सांगतो ते त्याचे त्यालातरी समजते का असा प्रश्न येतो मनांत.

एका इन्शुरन्स च्या जाहिरातीत दाखविले आहे की मागे एक पेशंट हॉस्पिटलच्या कॉट वर पडला आहे आणि हा आमचा नट सांगतो आहे की "या पेशंट ने फक्त पाचशे रुपये महिन्याची ही पॉलिसी घेतली असती तर ही वेळ आली नसती". म्हणजे काय? जर पॉलिसी घेतली असती तर तो आजारीच पडला नसता? की हॉस्पिटल मध्ये ऍडमिटच व्हायला लागले नसते? की हॉस्पिटलचे बिल कमी येणार होते? जाहिरातदाराला सांगायचे तरी काय आहे?

आजच्या जाहिरातीत सौन्दर्य प्रसाधने हा विषय इतका मोठा आहे की जसे काही त्याविना आपण जगूच शकणार नाही. किंवा अश्या जाहिरातींना काय म्हणावे की ज्या सांगतात की अमुक तमुक तेल वापरा की तुम्हाला हार्ट प्रॉब्लेम येणार नाही, किडनी प्रॉब्लेम येणार नाही. किंवा आमच्या अमुक तमुक प्रॉडक्ट ने ९९.९९९९९९ टक्के जंतू आणि व्हायरस मरतात! १०० टक्के नाहीत हो, नाहीतर मग तुम्ही परत आमचे प्रोडक्ट घेणारच नाही!

एखाद्या कणभर सत्यावरून जो फुगा फुगवलेला दिसतो जाहिरातीत की यांना खरे खोटे कोणी विचारणारे आहेत की नाही असे वाटावे.

त्या खेळांच्या ऍप च्या जाहिराती बघा. त्याचे व्यसन लागते, बेटिंगमुळे पैशाचे नुकसान होते हे सर्व सांगून नंतर आमचे ऍप वापराच हा आग्रह. एखादे व्यसन लावणारी जाहिरात कुठल्या एथिक मध्ये बसते?

प्रॉडक्ट काहीही असो. आपले ऍड जगत त्याला साजेशी जाहिरात करायला सदैव तयार असते. जाहिरातींना पारितोषिके ही मिळतात असे ऐकले आहे. बलसाराच्या काही जाहिरातींनी कोलगेट सारख्या कंपनीला जेरीस आणले होते. जाहिरातींमधले स्टार घरोघरी प्रसिद्ध झाले होते. "भाई साहाब, सस्ती चीज और असली चीज मे फरक होता है" वाल्या माया अलघ बाईंसारखे.

आतातर जाहिरातींच्या उत्पन्नावरच टीव्ही चॅनेल चालतात. एवढेच काय तर खेळांचे प्रसारण बहुतांशी जाहिरातींच्या उत्पन्नावरच चालते, तिकीटविक्री वर मुळीच अवलंबून रहात नाही. यावरून जाहिरातदारांची पॉवर दिसून येते.

टीव्ही चॅनेल एकदा का जाहिरातदारांच्या हातात गेले की मग त्यांचे स्वातंत्र्य संपल्या सारखेच नाही का? फक्त जाहिरातींचेच चॅनेल सुरू झालेच आहेत.

ऍड जगताची इकॉनॉमी पाहिली तर ती चित्रपट जगताला सहज मागे टाकेल असे वाटते.

a

रामदास स्वामींनी त्यांच्या काळांत योग्य होते तेच सांगितले. आजच्या काळांत "आपली आपण करी स्तुती, वडिलांची सांगे कीर्ती" असे नाही केले तर आपण कोण, काय करतो हे इतरांना कसे समजणार? हे स्वामींनी सांगितलेच नाही कारण त्यांच्या काळांत ती गरजच नव्हती. आज आम्ही जर आमची जाहिरात केली नाही तर कोणी विचारणारच नाही आम्हाला.

तर जाहिरातबाजी तर पाहिजेच आजच्या जगांत. कोणी त्या ऐकत पहात असोत किंवा नसोत. आणि काहींच्या वडिलांची कीर्ती जर सांगितली नाही तर कित्येक लोकांना हे कोण आहेत हेसुद्धा कळणार नाही.

जरा विचार करा. L& T, सीमेन्स, टाटा या काही कमी प्रसिद्ध कंपन्या नव्हेत. पण त्यांना सुद्धा लोकांसमोर रहाण्यासाठी जाहिराती करायला लागतात. ज्यांची उत्पादने जीवनावश्यक आहेत त्यांनाही जाहिरात करायची गरज वाटते. एवढेच काय अगदी सरकारलाही आपली जाहिरात करावी लागते, यांतच सगळे आले.

तर प्रगत आणि प्रगतिशील अश्या सर्व समाजांत जाहिरात आणि जाहिरातबाजीचे महत्व आहे. तर जाहिरातबाजीला गौण मानून चालणार नाही. तिला मानच दिला पाहिजे.

रिझर्व्हेशन किंवा आरक्षण

आपल्या एका वर्गमित्राचे रिझर्व्हेशन वरचे विचार वाचले.
बरेच पॉईंट्स लॉजिकल आहेत पण सर्व नाहीत.

रिझर्व्हेशन हा शब्दाला आजकाल जो काही रंग आणि वास चढला आहे त्यामुळे तो शब्द भाषेतून नाहीसा करावा की काय असे वाटू लागले आहे.

वास्तविक रिझर्व्हेशन म्हणजे राखून ठेवणे या अर्थी हा शब्द वापरला जातो आणि त्यांत काही गैर आहे असे वाटत नाही.

दररोजच्या आयुष्यांत आरक्षण वापरले जाते.

गावाला चाललेले आहात, सामान सुमान भरपूर आहे. अश्या वेळी आपण गाडीची तिकिटे रिझर्व्ह करीत नाही का? ऐनवेळी जाऊन गाडी बस मध्ये जागा मिळवायला लागण्याची कटकट आणि त्रास आपण टाळत नाही का रिझर्व्हेशन करून?

चांगलीशी एखादी गोष्ट, चांगलासा एखादा सिनेमा किंवा नाटक आपण बुक म्हणजेच रिझर्व्ह करीत नाही का?

a

आपल्यापेक्षा दुबळ्या लोकांना, ज्यांना झगडून मिळवायची शक्ती नाही त्यांनाही आपण काहीतरी मिळावे अशी इच्छा बाळगत नाही का? त्यांना देण्यासाठी काहीतरी बाजूला काढून ठेवत नाही का?

आपण काहीकाही खास कामे तश्याच खास लोकांकरिता राखून ठेवीत नाही का? आपण काही विशेष उपकरणे तश्याच विशेष कामाकरता राखून ठेवीत नाही का? "असून अडचण नसून खोळंबा" ही म्हण रिझर्व्हेशन मुळेच आली नाही का?

तर आपण रिझर्व्हेशन या शब्दाला किंवा त्याच्या अर्थाला विरोध करायचे मुळीच कारण दिसत नाही.

कामाची वाटणी केली असता कामे सुरळीत पार पडतात हे त्रिवार सत्य आहे की नाही? एखादी योजना किंवा संघटना चालवायला कामाची वाटणी आवश्यकच असते यांत काही संशय आहे का?

मुळांत सगळ्या समाजांत जातीव्यवस्था आणि कलाप्रेरीत व्यवस्था कामाच्या विभागणी करता केलेली होती. चातुर्वण्यांत कामाची वाटणी हेच ध्येय होते. हे काय फक्त एका धर्मांत नाही. जगभर सगळीकडे चालते हे.

वाटून दिलेले काम करण्यांत डावे उजवे अपेक्षित नव्हते. पण बुद्धीचे काम, बळाचे काम, निरनिराळ्या सर्व्हिस देणे आणि अश्या लोकांना सर्व्हिस देणे यांत लागणारी कला वेगवेगळ्या होत्या. म्हणून त्याप्रमाणे त्या त्या वर्गांत त्या त्या कलांची डेव्हलपमेंट झाली.

त्यावेळेला कोणी कुठला वर्ग निवडायचा असे बंधन नव्हते.

पण समाजाच्या सोयी करता आणि या कलांच्या डेव्हलपमेंट करता त्या पारंपारिक झाल्या आणि त्या कला असलेले लोक स्पेशालिस्ट झाले.

एवढेच नाही तर प्रत्येकाने आपल्याला आवडेल ते काम स्वीकारावे अशी मोकळीक ही होती. एकाच कुटुंबात विचारवंत, बलसंपन्न लढाऊ, व्यापारउदीमनिष्ठ आणि सेवाभावी असे लोक असत. ते आपापल्या आवडीप्रमाणे काम करून आपले जीवन जगत.

नंतर सामाजिक सोयीसाठीच वडिलांचे काम मुलाने करावे म्हणजे स्किल डेव्हलपमेंट होत रहाते आणि स्पेशल स्किल कुटुंबातच राहते या विचाराने पिढीजात आणि मग जन्मजात कला निर्माण झाल्या. जातींचा उगम असा झाला असे म्हणता येईल.

मग बुद्धीचे काम करणारे ब्राम्हण, बळाचे काम करणारे क्षत्रिय, व्यापार, उदीम, शेती, हस्तकला, आणि इतर कला ज्याला आपण बलुते म्हणतो ते करणारे वैश्य आणि या सर्वांची सेवा करणारे ते शूद्र असे गणले गेले.

a

प्रत्येकाची कामाची वाटणी व्यवस्थित होती आणि समाज सुसंध आणि सुसंस्कृत होता.

पण नंतर तेच तेच काम करत राहिल्याने लोकांची कामाची व्हरायटी आणि करण्याची क्षमता नाहीशी झाली आणि एकच एक काम करत राहिले.

त्यामुळे आपले सोडून दुसऱ्याचे काम कसे करावे हे ज्ञानच मिळेनासे झाले.

ब्राम्हण बुद्धिमत्तेने, क्षत्रिय बळाने आणि वैश्य धनाने पॉवरफुल असल्याने ते इक्विव्हॅलंट राहिले पण शूद्र मात्र लिखित आणि वैचारिक ज्ञानाला पारखे झाले.

सर्व जाती दुसरे काही न येणाऱ्या झाल्या.

जर ही व्यवस्था अशीच रहाती तर काहीच प्रॉब्लेम नव्हता पण इतरांना जेंव्हा दुसऱ्यासारखे व्हावेसे वाटू लागले तेंव्हा अडचणी सुरू झाल्या.

बुद्धीने आणि बळाने धन मिळते हे तर दिसतच होते. मग आपणही ते का मिळवू नये अशी ईर्षा निर्माण होणे साहजिकच आहे. पण ती मिळवायला लागणारे ज्ञान कसे मिळणार?

a

आपले ज्ञान दुसऱ्यांना देऊन नवीन कॉंपिटीटर निर्माण करणे कुणाला आवडणार आणि परवडणार? त्यामुळे ज्ञान दुर्लभ झाले.

इंग्रजांनी बरोबर हा दुवा हेरला. फोडा आणि झोडा हीच त्यांची नीती असल्याने त्यांनी या विभाजकाला खत पाणी घालून जातीयतेचे विष डेव्हलप केले. जातींची वर्गवारी करून फूट पाडली. जातींचे आणि जमातींचे शेड्युल केले. त्या राजकीय केल्या.

आता या जाती काही आपण निर्माण केल्या नाहीत आणि त्यांचे अस्तित्व आपण नाकारू शकत नाही. मग आपण एकमेकांशी का भांडावे?

मुळांत मागासलेल्या जाती का निर्माण झाल्या? एक तर त्यांना पुरेसा गाईडन्स नसेल किंवा त्यांना इतरांची कामे करण्याची आवड किंवा इच्छा नसेल. आपले आहे ते ठीक आहे अशीही त्यांची समजूत असेल.

प्रत्येक जातीत हुशार लोक असतातच. ते आपापली प्रगती बरोबर करतात. त्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येत नाही. साधू संत काही रिझर्व्हेशन मधून निर्माण झाले नाहीत. ते मुळातच आदरणीय होते. लढवय्ये सेनापती आणि राजे आपले आपणच निर्माण झाले.

a

भारत ज्यावेळी स्वतंत्र झाला तेंव्हा अनेक धर्म आणि अनेक जातींचे ओझे आपोआप समाजावर पडले. यांत अशी भिन्नता राहू नये आणि समाज एकसंध व्हावा म्हणून मागासलेल्या लोकांना बरोबर घेऊन जावे या इच्छेने त्यांना काहीतरी संरक्षण द्यावे या हेतूने आपल्या संविधानात याची तरतूद करावी अशी जाणीव राज्यकर्त्यांना झाली आणि म्हणून संविधानात १९५० मध्ये सामाजिक रित्या मागासलेल्यांच्या साठी रिझर्वेशनची तरतूद केली होती. एकदा सर्व समाज एक पातळीवर आला की ही तरतूद मागे घेण्याची त्यावेळच्या राज्यकर्त्यांची विचारसरणी होती असे मानायला जागा आहे. ती मागे घेतली नाही आणि आपण ती मागे घ्यायचा आग्रह केला नाही हे ही सत्यच आहे.

पण राजकारणांत अशी प्रगती कायम ठेवायची तर आग धगधगती ठेवली पाहिजे. मग रड्या मुलाला "तुलाही देऊ हं" असे म्हणून काहीतरी राखीव ठेवण्याची ही आयडिया आली.

पण सध्या मात्र फक्त जातीवर अवलंबून आरक्षण हाच विषय आहे. तो सुद्धा फक्त मराठा याच एका जातीवर. इतरांचे काय? त्यांना कोण काय देणार? की जो भांडेल झगडेल त्यालाच मिळणार असा संदेश आहे का?

जगांत धर्म जाती सोडून इतरही आरक्षणे आहेत पण त्यावर कोणी बोलत नाही.

a

आपल्या काळी युनिव्हर्सिटीमध्ये कोटा सिस्टिम नसती तर आम्ही इंजिनीयर होऊच शकलो नसतो. आपल्या युनिव्हर्सिटी मध्ये ६० टक्के जागा मुंबई युनिव्हर्सिटीला होत्या. त्यावेळी मुंबई युनिव्हर्सिटी मार्क देण्यांत खत्रुड म्हणून प्रसिद्ध होती. बाकीच्या युनिव्हर्सिटी बऱ्याच सढळ होत्या. त्यामुळे मुंबईचे ५०-६० टक्केवाले विद्यार्थी रागाचे धनी झाले होते ते आपल्याला आठवत असेल.

पुढच्या वर्षांत या सर्व खूप मार्क मिळविलेल्या काही विद्यार्थ्यांचे काय झाले हा इतिहास आहे. म्हणजे फक्त रिझर्व्हेशन हा प्रश्न नाही हे उघड आहे. जे सबळ असतात ते तरतात आणि त्यांना हा रिझर्व्हेशनचा प्रश्न जाचत नाही हेही स्पष्ट आहे.

रिझर्व्हेशन फक्त जातीधर्मावरच असते का? नाहीच नाही.

स्त्रियांना हक्क आणि रिझर्व्हेशन एकाच वेळी मिळते हे लक्षांत आहे का? त्याला विरोध करणार का? स्त्रियांना ५० टक्के संधी मिळाल्याच पाहिजेत याला कोणाचा विरोध आहे का?

आपल्या घरात दुबळ्या बाळाला झुकते माप मिळते हे ध्यानांत आहे का?

स्त्रिया आणि दुबळी बाळे आजच्या आरक्षण मागणाऱ्यापेक्षा काय वेगळी आहेत.

त्यांनाही आरक्षण द्यावे लागते, तेही जन्मभर आणि सगळ्या बाबतीत.

एकदा बस मध्ये चढल्यावर सगळे समान होतात का?

बस मध्येही स्त्रिया, वृद्ध, अपंग यांना वेगळे आरक्षण असतेच ना? का त्यालाही विरोध करणार?

जसे हे बसमधले आरक्षित प्रवासी वागतात तसेच हे राजकीय आरक्षणवाले वागताहेत का याचाही विचार झाला पाहिजे. आपापसात भांडून काय होते ते त्यांना समजत नाही का? आरक्षणात आरक्षण हे काय प्रिन्सिपल आहे?

त्यांच्या मागे लपलेल्या त्या दुष्ट राजकारण्यांचे काहीतरी करायला हवे की नाही? इंग्रजांचीच फोडा आणि झोडा ही नीती ते वापरत नाहीत का? विरोध त्यांना करायला हवा.

एकदा आरक्षणाने काहीतरी मिळवल्यावर ते राखणे आलेच. म्हणून मग प्रमोशन, इन्क्रीमेंट सुद्धा आरक्षितच पाहिजे अशी मागणी होईलच? जर हे मागणारे समर्थ असते तर त्यांनी अशी मागणी केली असती का?

a

बस मध्ये आरक्षित सीट वर बसून शिवाय तिकिटांच्या दरांत कन्सेशन मागण्यासारखे आहे. पण लोक हेही मागत आहेत आणि ते दिले जात आहे. मग फक्त एवढाच एक जातीवरून आरक्षणाचा मुद्दा घेऊन चालवण्यात काय अर्थ आहे? त्यांत या रिझर्व्हेशन शब्दाचा बळी का द्यायचा?

इतर देशांत आरक्षणे नाहीत का? अमेरिकेत गेलेल्या लोकांनी खास तिथले आदिवासी आणि म्हणून मालक असलेल्या लोकांना बळाने हाकून लावून त्यांना विशिष्ठ जागांत बंदी करून टाकले आणि त्या जागांना रिझर्व्हेशन असे नांव दिले. हा रिझर्व्हेशनचा गैर उपयोगच नव्हे काय? रिझर्व्हेशन शब्दाला अगदी वाईट अर्थ दिला त्यांनी.

जरा पुन्हा विचार करू बघा. आरक्षण असणे अजिबात वाईट नाही, त्यांनी कित्येक निर्बळ लोकांना संरक्षण मिळते, त्यांचा विकास होऊ शकतो.

पण आरक्षण कितीवेळ असावे यावर विचार झाला पाहिजे. मोठ्या वृक्षाखाली छोटी झाडे वाढत नाहीत. त्यांना शेवटी उनपाऊस सहन करायलाच पाहिजे नाहीतर त्यांची वाढ खुंटणार हे निश्चित.

माणसांना निरनिराळ्या कारणांमुळे आरक्षणाची गरज लागते. माणसांचे सोडा वाघा सिंहानाही आणि इतर पशु पक्ष्यांना ही आरक्षणाची गरज भासते.

a
शारीरिक रित्या इतके बलवान असूनही त्यांना आरक्षणाची गरज लागावी यांतच सर्व आले.

आरक्षण असावे आणि तेही थ्रूआउट असावे असेही तुमचे मत होईल. खालील उदाहरणे पहा.

उदा.

१ रेल्वेत तुमची सीट किंवा तुमचा बर्थ प्रवासाच्या शेवटपर्यंत आरक्षित असतो.

२ घरच्या जेवण्याच्या टेबलावर तुमची जागा आरक्षित असते

३ कंपनीच्या मिटिंग मध्ये बॉस ची जागा आरक्षित असते

४ नोकरीच्या ठिकाणी टेबल खुर्ची कॉम्पुटर तुमच्या करता आरक्षित असतात

५ रेल्वेत आणि बस मध्ये जागा वयोवृद्ध, अपंग किंवा स्त्रियांना म्हणूनच आरक्षित असते

६ तुमची पत्नी, मुले, कुटुंब तुमचे म्हणूनच ओळखले जाते

७ तुमची मालमत्ता तुमचीच म्हणून आरक्षित असते

a

आम्हाला असे म्हणायचे आहे की आरक्षण असावे आणि तेही शेवट पर्यंत असावे असा विचार करायला सुरुवात केली पाहिजे. नाहीतर रेलवे मध्ये मिळालेला ती बर्थ घालवायची पाळी येईल.

जगातील सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत. आरक्षण नसले तर काय होईल हेही लक्षांत घेतले पाहिजे. बळी तो कान पिळी असे जगायला आवडेल का?

आपल्या लक्षांत येईल की आरक्षण केले असता काही काही गोष्टी ज्यास्त सुलभतेने करता येतात.

आता हा मुद्दा जर संकुचित दृष्टीने मांडला तर त्याला विरोधच होईल.

विचार करून बघा.

बघ बुवा, आमचे मत तर असे आहे की आरक्षण वाईट नाही, त्याचा अति उपयोग किंवा गैर उपयोग वाईट आहे. त्याला विरोध झाला पाहिजे.

आजोळ

माझ्या आईचे जन्मगाव कोल्हापूर. म्हणजे आमचे आजोळ. मोठे एकत्र कुटुंब. मुलेबाळे एकत्र वाढलेली. मामा जरी तिथेच रहात होते तरी मावश्या आमच्या सारख्या पाहुण्या म्हणून यायच्या.

कोल्हापूरला सुट्टीत आजोळी गेले की आमच्या मामेभावंडांशी खेळण्यांत असा वेळ मस्त जायचा की विचारू नका.

आम्ही मुंबईकर, ते कोल्हापुरी, त्यामुळे त्यांच्या आणि आमच्या भाषेत आणि बोलण्याच्या स्टाईल मध्ये बराच फरक असायचा. खेळ म्हणजे गोट्या, विटीदांडू आणि गल्ली क्रिकेट.

शाहूपुरीतली ती तिसरी गल्ली आम्हाला चांगली रुंद वाटायची तेंव्हा. बीटी कॉलेज गल्लीच्या टोकाला होते. तिथपर्यंत विटी हाणत गेले की किती लांब गेलो असे वाटायचे.

तसे आम्ही कोल्हापूरला आजोळी आठवण रहायला लागल्यापासून तीन चार वेळाच गेलो होतो, कारण एक सोडून एक वर्षी ते आमच्याकडे मुंबईला यायचे. पहिल्या ट्रिप मध्ये बस बिस काही नव्हती. दुसऱ्या ट्रिपच्या वेळी के एम

टी च्या बसेस सुरू झाल्या. अगदी रिकाम्या जायच्या त्यावेळी सुरुवातीला. लोक आपले पायी, सायकलने किंवा टांग्यानेच जायचे. राजारामपुरी ते शिवाजी पुतळा अशी बस सुरू झाली होती.

कोल्हापूरला गेल्यावर लगेच जाणवणारा फरक म्हणजे स्टेशन जवळचे खोंडाचे चित्र काढलेले शेतकरी सहकारी संघाचे कार्यालय आणि इमारत आणि जवळच्या तेलाच्या टाक्या. अगदी वेगळे मोकळे वातावरण वाटायचे आम्हाला तेंव्हा.

स्टेशनमधला तो "राजाचा डबा" आणि त्याचे ते दगडी घर ह्या उत्सुकता वाढविणाऱ्या गोष्टी होत्या. स्टेशनातला तो "इंजन" फिरवायचा गोल म्हणजे एक संध्याकाळचा स्पॉट होता म्हणा ना. तेंव्हा स्टेशनवर फिरायला जायला काहीही बंदी नव्हती.

संध्याकाळी लौकर गेले तर इंजिनातून वाफ बाहेर सोडताना बघायला मिळायचे. तो वाफेचा झोत आणि नंतर शेजारच्या आंब्याच्या झाडाच्या पानातून ठिबकणारे पाणी बघायला मजा यायची. त्या इंजिनाच्या उभ्या रहायच्या जागेजवळूनच आमच्या घरी शाहूपुरीत जायचा रस्ता होता.

एवढ्या वेळेला कोल्हापूरला जाऊनही त्या राजाच्या डब्यांत चढून बघायची हिम्मत कधी नाही झाली आमची कोणाची.

सिग्नलला "बावटा" म्हणायचे असे आमच्या कोल्हापुरातल्या मामेभावंडांनी शिकवले. स्टेशनवर दररोज संध्याकाळी मुक्काम असे आमचा. पांच ते सात पर्यंत. मुख्य मुक्काम "इंजना"च्या, इंजिनाच्या नाही बरे, गोलाच्या तिथे.

पाच सव्वा पाचला बावटा पडायचा आणि पुण्यापर्यंत जाणारी गाडी जायची मिरजेला आणि मग सांगलीला. मग शेजारच्या लाईन वर उभी असलेली गाडी मागे पुढे शंटिंग करत "प्ल्याटफार्म" ला जायची ती आठची मेल म्हणून.

सहाच्या सुमाराला पुन्हा "बावटा पडला" की फाटकाशेजारच्या उंचवट्यावर जायचे. मग मिरजेहून गाडी यायची. ती "प्ल्याटफार्म" ला न जाता साईड च्या लाईन वर जायची कारण "प्ल्याटफार्म"ला आठची मेल लागलेली असायची. आणि एकच "प्ल्याटफार्म" होता. मग या आलेल्या गाडीचे "इंजन" गाडी सोडून लाईनी बदलत गोलावर यायचे. मग आमचा मुक्काम त्या गोला शेजारी. कधीतरी गोल वळवायला ढकलायची "मदत" करायची. "इंजन" वळवताना अर्धे वळले की आता जर चालू झाले तर काय होईल, याची चर्चा

करायची. पण तसे काही व्हायचे नाही. एकदा इंजन वळवले की ते "राजाच्या डब्या"च्या घराकडे कडे जायचे. मग तिथे ते पाणी कसे पिते ते बघायचे. ते झाल्यावर पुन्हा मोर्चा फाटका शेजारच्या उंचवट्यावर. पुन्हा बावटा पडण्याची वाट बघत. पण तो काही आठ पर्यंत पडायचा नसायचा. मग नाईलाजाने घराकडे कूच.

कोल्हापूर स्टेशन असे टुमदार होते तेंव्हा. ब्रॉडगेज गाडी आल्यावर फाटकच प्लॅटफॉर्म मध्ये गेले! मग स्टेशनची मजाही गेली.

नंतर वालचंद कॉलेजला यायच्या आधी एक दोन वेळा कोल्हापूरला जाता आले, पण ते एसटी बसने. एसटी ने प्रवास खूप सुलभ व्हायला लागला. गाड्या बदलायची किटकीट गेली. आमच्या आईबाबांशिवाय एकटे कोल्हापूरला जाता येऊ लागले. पण त्यामुळे रेल्वे स्टेशनवर जाणेच बंद झाले. आम्ही मुले मोठी झालो, आमच्या आवडी बदलल्या.

नंतर वालचंद कॉलेजमध्ये आल्यावर कोल्हापूरशी पुन्हा एकदा जवळचा संबंध जुळला. बरेच वर्गमित्र कोल्हापूर आणि मिरजेचे असल्याने त्यांच्याशी मैत्री घनिष्ठ झाली. इकडे आजोळीही भावंडे मोठी झाली, मुलींची लग्ने झाली, मुले कॉलेजात, पॉलिटेक्निक मध्ये गेली. एक प्रकारचे अंतर पडत गेले. बरीच भावंडे कोल्हापूर सोडून इतरत्र गेली.

a

सायकलीवरून कोल्हापूरला जाणे ही एक छान कल्पना झाली. तीस मैल जायला जवळ जवळ रेल्वे इतकाच वेळ लागायला लागला. एखाद्या शुक्रवारी किंवा शनिवारी कोल्हापूरला सायकलने जाऊन येणे मजेचे झाले. तिथे गेल्यावर मित्रांच्या बरोबर ज्यास्त वेळ घालवायला लागलो आणि आजोळी कमी.

एकदोनदा तर फक्त गावांत भटकून परत सांगलीला आलो, त्या घरी न जाताच.

आमच्या आज्जी आजोबांच्या काळी सुरुवातीला आमचे ते आजोळचे घर खूप मोठे वाटायचे आणि भरलेले असायचे. पण आमची वये वाढल्यावर तेच घर छोटे वाटू लागले.आज्जी आजोबा कधीच गेले होते. एकत्र कुटुंब थोडे विस्कळीत झाले होते. भावंडांतील ती जवळीक वाढत्या वयाबरोबर थोडी विरळ झाली होती. मामांनी तीन जागांमध्ये वाटणी केल्यावर थोडा तुटकपणा आलाच होता. पण तो आता बराच जाणवू लागला होता.

शेवटी तीन मामांची कुटुंबे तीन गावांत रहायला गेल्यानंतर त्या घराचे घरपण नाहीसे होऊ लागले होते. मी इंजिनीयर होता होता दोन मामांनी आपापली घरे बिल्डरला विकून टाकली होती आणि त्यांनी कोल्हापूर सोडले होते. मग ते जुने घर पडून टाकून नवी बिल्डिंग झाली. त्या घराच्या फक्त

आठवणीच राहिल्या. फक्त एक मामा तिथेच स्थायिक झाले, त्यांचे घर मात्र आजोळीच्या आठवणी देत राहिले.

कोल्हापूर मग फक्त आठवणींचेच आजोळ राहिले. पण मित्र मंडळी बरीच झाल्याने आवडीचे गाव राहिले. ते आजही आहे. कोल्हापूरला जायचे म्हटले की एक नवाच उत्साह येतो अजूनही.

मला वाटते आपल्या सर्वांचा हाच अनुभव असावा. आजोळ जरी संपले तरी त्याच्या आठवणी अजून राहतील आपल्या सर्वांत.

एक न विसरणारा अनुभव म्हणून

मातृभाषेतून शिक्षण भाग १

आमच्या पिढीतल्या बहुतेकांचे शिक्षण मातृभाषेतूनच झालेले आहे. अकरावी पर्यंत सगळे विषय, अगदी इंग्रजी धरून, आम्हाला मराठीतूनच शिकविले होते. पाचवी पासून हिंदी आणि आठवीपासून इंग्रजी असलेले आम्ही विद्यार्थी.

आमचे इतर राज्यातले भाईबंद असेच त्यांच्या त्यांच्या मातृभाषेतून शिकलेले. बॉर्डरच्या जिल्ह्यांत तर दुभाषिक आणि त्रिभाषिक शाळा होत्या त्यामुळे तिथल्या मुलांना चार पाच भाषा अगदी सहज यायच्या.

मराठीतून सायन्स शिकतांना कधीच अडचण आली नव्हती. आणि आमचे मराठीतले सायन्स इतर शाळांच्या गुजराती, हिंदी किंवा इंग्रजी पेक्षा कमी किंवा ज्यास्त चांगले किंवा वाईट कधीच नव्हते. गणिताचा तर प्रश्नच नव्हता. त्याची भाषाच वेगळी. फक्त आकडे आपापल्या भाषेच्या लिपीत लिहायचे.

अगदी सायन्स कॉलेजमध्येही बोली भाषा मराठीच. गुजराती, हिंदी, सिंधी, ख्रिश्चन आणि अश्या इतर विद्यार्थ्यांच्या भाषा त्या त्या. पण म्हणून कधी मैत्रीत ओळखीत कधी दुरावा आलाच नाही. शिक्षणाची कॉमन भाषा मात्र इंग्रजीच

राहिली कारण सगळी पुस्तकें इंग्रजी मध्ये. पण त्याला आम्ही काय करणार? आमची युनिव्हर्सिटी जर दुसरी भाषा वापरू देत तर आम्हीही पाहिजे त्या भाषेतूनच शिक्षण घेतले असते. युनिव्हर्सिटी इंग्रजी भाषेची सक्ती करणार, मग काय? शिक्षक, विद्यार्थी तर त्यांना आवडणाऱ्या भाषेतच संभाषण करायचे.

मग इंग्रजीला एवढे महत्व का? आम्हा सगळ्यांना काय इंग्लंड अमेरिकेत स्थायिक व्हायला जायचे होते का? आमच्या मायबाप सरकारची कामाची भाषा इंग्रजी. तो वारसा आम्हाला आलेला. ते जोखड आम्ही कसे टाकून देणार होतो. त्यांत आमचा भारत देश भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेला आणि त्याचा आम्हाला अभिमान. मग एक समान भाषा कशी असणार?

हिंदी पट्ट्यातले सरकार हिंदी लादणार आणि दक्षिणी लोक त्याला विरोध करणार अश्या वातावरणांत वाढलो आम्ही. आमच्या रेल्वेगाड्या विविध भाषांतील घोषणांनी रंगवलेल्या. यांना पाहिजे ते त्यांना नको, या वातावरणांत परकी इंग्रजी का असेना, एक सर्वमान्य भाषा झालीच होती. तिला कोणाचा विरोध असल्याचे दिसले नाही. मग तीच भाषा कॉमन भाषा म्हणून का न वापरावी?

वालचंद कॉलेजमध्येही हीच री ओढली गेली. बहुतेक प्राध्यापक तेंव्हा मराठी किंवा कन्नड होते पण सगळे मराठी बोलणारेच. FE चे तीन वर्ग. त्यांत

मात्र चांगला भाषिक मिक्स होता. पहिल्याच आठवड्यांत प्रा. भालबा केळकरांचा वर्ग होता ऍप्लाईड मेकॅनिक्सचा. सर विद्यार्थ्यांचे टेन्शन कमी करण्यांत एकदम कुशल होते. ते अगदी मराठीतून इंजिनियरिंगचे विषय नक्कीच शिकवू शकले असते. त्यांनी सुरुवातच "नमस्कार मंडळी" अशीच केली होते. आमचे इतर प्राध्यापक ही तेवढेच कुशल होते. पण आम्हा सर्वांची मातृभाषा मराठी कुठे होती? पहिल्या दिवसापासून प्राध्यापकांनी वर्गांत मराठीत बोलायला विरोध झाला होता अमराठी विद्यार्थ्यांचा. नंतर गाडी आपोआप इंग्रजीवर आली.

इंजिनियरिंग मराठीतून निश्चित शिकविता आले असते, पण पुस्तके? ती तर इंग्लिश मध्येच होती. आणि मराठीत सर्व पारिभाषिक शब्द कुठे होते. अगदीच आग्रह धरला असता तर तेही करता आले असते पण ते सरकारी भाषांतरा सारखे क्लिष्ट आणि समजायला अवघड झाले नसते का? हे झाले मराठीचे. इतर मातृभाषांचे असेच झाले असते.

जर्मनी, फ्रांस, चीन, जपान, रशिया किंवा इटली मध्ये त्या त्या भाषेतून सर्व शिक्षण दिले जाते पण ते देश प्रगत होते आणि सर्व विषयांच्या परिभाषा त्यांच्याकडे तयार होत्या कारण त्यांनी मुळापासून ते विषय निर्माण आणि विकसित केले होते. आमच्याकडे तसे कुठे होते?

आजही मेडिकलचे विषय इंग्रजी माध्यमातून पण लॅटिन भाषेतून शिकवले जातात भारतात आणि इतरत्र. मेडिकलची भाषाच लॅटिन आहे. मेडिकल मातृभाषेतून कसे शिकविणार ते अगोदर डेव्हलप व्हायला पाहिजे की नाही?

इंजिनियरिंग आणि मेडिकल या विषयांत जगभर एकच अर्थ निघाला पाहिजे तरच आपण काय बोलतो ते दुसऱ्याला समजणार कसे?

एकाच इंजिनियरिंग किंवा मेडिकल कॉलेज मध्ये मातृभाषेतून शिकवणारे वेगवेगळे वर्ग असतील का आणि ते किती असतील याचा विचार व्हायला पाहिजे. एकाच कॉलेजात किती माध्यमे असू शकतात? प्रत्येक माध्यमाचे वेगळे कॉलेज असणार का? की जे राज्य त्याची भाषा सगळ्यांना अनिवार्य असे होणार? राज्यकर्ते काहीही करू शकतात. अगदी असे नियम ही आणू शकतील.

मातृभाषेतून किंवा आवडीच्या भाषेतून शिकणे ठीक आहे पण सर्वजण एकाच पातळीवर आले पाहिजेत की नाही? नाहीतर गोंधळच गोंधळ होईल.

मातृभाषेतून शिक्षण एक विचार म्हणून ठीक आहे किंवा राजकीय कार्यक्रम म्हणून ठीक आहे पण तो प्रत्यक्षांत आणताना नीट विचार नाही केला गेला तरी फायद्या ऐवजी नुकसान होण्याची शक्यताच ज्यास्त.

a

पुन्हा परदेशी जाऊ पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना नव्या अडचणी काय येऊ शकतील याचाही विचार झाला पाहिजे. आम्ही इंजिनीयर झालो तेंव्हा सर्व शिक्षण इंग्रजी मधून घेऊनही टोफेल परीक्षा द्यावीच लागायची अमेरिकेतल्या युनिव्हर्सिटी मध्ये प्रवेश घ्यायचा तर. म्हणजे तेंव्हाही आमच्या इंडियन इंग्लिश वर विश्वास नव्हताच त्यांचा.

समान शिक्षण झालेले लोक नंतर आपले विचार आपापल्या भाषेंत नक्कीच प्रकट करू शकतात जसे नोकरी करतांना किंवा कारखाना चालवताना. पण कामाची भाषा मात्र एकच असते, इंजिनियरिंग हीच ती भाषा.

मातृभाषेतून इंजिनियरिंग किंवा मेडिकल शिकविण्याच्या अट्टहासामुळे आपण जगावेगळे होऊच. मग आपण इतर जगाच्या बरोबर कसे रहाणार. ते काय आपल्याला सावरून घेणार आहेत काय? त्यांना काय पडली आहे? भारत एवढा महान व्हायला अजून थोडा वेळ लागेल. मग ते देतील मान भारतीय भाषांतून शिकलेल्या इंजिनीयर आणि डॉक्टरना. तो पर्यंत तरी आपल्याला धीर धरला पाहिजे.

मी ज्यावेळी इंजिनीयर होऊन कामाला सुरुवात केली त्यावेळी माझा अश्या लोकांशी संपर्क झाला ज्यांच्याकडे इंजिनियरिंग च्या प्रत्येक क्रियेला आणि साधनाला मराठी शब्द होता आणि तो ही अगदी विशेष. असे लोक

a
कारखान्यांत आणि माथाडी समाजात खूप होते. त्यांनी काही काही कामे अगदी अचाटपणे करून दाखवली आहेत. पण ती पिढी आता संपली आहे आणि ते पारिभाषिक शब्द विसरले गेले आहेत.

तर हे सगळे रामायण सांगायचं मतितार्थ असा की उच्च शिक्षण कुठल्या एका भाषेतून असावे असा दुराग्रह मुळीच धरू नये. या प्रकारची प्रगती फार सावकाश होते आणि आपल्यासारख्या जगाच्या मागे पन्नास वर्षे असलेल्या देशाला आत्तातरी एकदम अनुसरणे योग्य होणार नाही.

तुम्हाला काय वाटते ते जरूर प्रकट करा. एक समान पातळीवर विचार विनिमय आणि चर्चा होऊ दे.

a

मातृभाषेतून शिक्षण भाग २

हे वर्ष आहे २०३०. माझी दीर्घ कार्यकक्षा आणि कार्यकाळ पाहून मला वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने मानद व्याख्याता म्हणून निरनिराळ्या विषयांवर व्याख्यान देण्यासाठी सादर आमंत्रित केले आहे. विषय कार्यपटला प्रमाणे मांडले आहेत आणि तसतशी व्याख्याने द्यायची आहेत.

आता अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून व्याख्याने द्यायची आहेत. महाराष्ट्रांत मराठी ही भाषा निश्चित केली आहे त्यामुळे सर्व व्याख्याते मराठीतूनच शिकवितात.

मला काही अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना जे काही विषय शिकवायचे आहेत. त्यापैकी एक आहे अंतर ज्वलन यंत्र. दहा ते अकरापर्यंत वर्ग आहे. मी तयार आहे. विद्यार्थीही तयार आहेत.

वर्ग भरला आहे. विद्यार्थी उत्सुक दिसतात. ते चांगले आहे. व्याख्यानाला सुरुवात करावी असे वाटले.

a

"नमस्कार, मी श्रीरंग कौलगी. मी या महाविद्यालयातून १९७१ मध्ये यांत्रिकी अभियांत्रिकीची पदवी घेतली आहे त्या दृष्टीने मी तुमचा महाविद्यालयीन बंधूच आहे.

तर आपण विषयाला सुरुवात करू. मनुष्याने आपल्या शारीरिक विकलतेवर मात करण्यासाठी यंत्रांचे शोध लावले आहेत. त्यामध्ये अंतर ज्वलन यंत्र ही येते.

या यंत्रांत हवा आणि तेल यांचा संयोग करून शक्ती निर्माण केली जाते.

प्रथम याची रचना बघूया. या तक्त्याकडे बघा. इथे हे यंत्र कापलेल्या दृष्टीतून दाखविलेले आहे. यामध्ये एक एक नळी एका दुसऱ्या घराला लावलेली आहे. एक नळी उभी आहे आणि दुसरी मोठी आडवी नळी तिला जोडून हे घर बनविलेले आहे.

या वरच्या नळीत एक दट्ट्या बसवलेला आहे. तो वर खाली होऊ शकतो. हा दट्ट्या अलमीन किंवा ओतीव लोखंडाचा बनवता येतो. त्याला हे तीन चर पाडले आहेत, त्यांत ओतीव लोखंडाच्या तीन बांगड्या बसवतात. दट्ट्यामध्ये एक आडवे भोक कातकाम करून पाडलेले आहे, त्यांत एक कठीण पोलादाची काडी घालून एक जोड दांडू बसविलेला आहे.

या जोड दांडूचे दुसरे टोक एका अकेंद्रिय काठीला जोडले आहे. ही अकेंद्रिय काठी दट्ट्याची सरळ रेषेतली हालचाल गोल फिरविण्यांत बदलते. ही अकेंद्रीक काठी लोहार काम करून कठीण पोलादातून बनविलेली असते.

आपले धान्य दळायचे जाते कसे फिरते तसेच ही अकेंद्रिय काठी फिरते. तिला दोनही बाजूने ही पितळी किंवा गोळ्यांची किंवा काडी ची आधारतत्वे दिलेली आहेत. या खालच्या घरांत तेल भरले की ते ही सर्व यंत्रणा सुरळीत फिरायला मदत करते.

आता पर्यंत सर्व रचना लक्षांत आली का? काही प्रश्न आहेत का?"

वर्गाकडे नजर टाकली. बहुतेक विद्यार्थ्यांचे डोळे स्तब्ध झाले आहेत की काय असे वाटले. कुणीही काहीच प्रश्न विचारले नाहीत. मग व्याख्यान पुढे सुरू ठेवले.

"त्या अकेंद्रीत काठीला यंत्राच्या घराच्या बाहेर एक चक्र बसविले आहे. ज्यावेळी हे यंत्र फिरते तेंव्हा त्याचे फिरणे समान करण्यासाठी हे चक्र कामात येते.

a

दट्ट्याच्या वर उभ्या नळीवर एक यंत्रशिर बसवलेले आहे ते बघा. त्या यंत्रशिरामध्ये चार तोट्या आहेत त्या दट्ट्याने खेचलेली हवा आणि बाहेर टाकलेले गरम वायू यावर नियंत्रण होते. हा तोट्या एका विशिष्ट काठीने वरखाली केलेल्या काड्यांनी चालतात. ही काठी खालच्या अकेंद्रीत काठीने साखळी वापरून चालवली जाते.

हलके तेल जर वापरायचे असेल तर एका ठिणगीची गरज पडते पण जड तेल असेल तर फक्त हवेच्या तपमानाने तेल पेट घेऊ शकते. ठिणगी पाडण्यासाठी एक ठिणगी बूच बसवता येते किंवा जड तेला साठी एक पिचकारी लावता येते.

इथे आपली यंत्राची रचना पूर्ण होते. काही प्रश्न असतील तर आता विचारा."

वर्गांत एक प्रकारची गहन शांतता पसरली होती. डोळे नुसते स्तब्धच नाही तर एका प्रकारची काचेसारखी त्यांवर झाक आली होती त्यांच्यावर. मी म्हटले, एखादवेळी विषय अगोदरच माहितीचा असेल त्यामुळे या विद्यार्थ्यांचे डोळे असे झालेले असतील. नंतर विचारतील काय ते.

व्याख्यान सुरू ठेवले.

" आता हे पहा, या यंत्रांत तेल या दट्ट्याच्या वर नळींत पेट घेते म्हणून याला अंतर ज्वलन यंत्र म्हणायचे. आता हे कसे चालते ते पाहू. पहिल्यांदा याला त्या बाहेरच्या चक्राने फिरवायचे. मग तो दट्ट्या खाली वर होईल. एकदा खाली जातांना या ताज्या हवेच्या दोन तोट्या उघडलेल्या असतील त्यामुळे बाहेरची हवा आत ओढली जाईल. मग फिरवीत राहिल्याने तोट्या बंद होतील आणि कोंडलेली हवा दाबली जाईल. दाबलेल्या हवेचे तपमान वाढेल आणि दाब ही वाढेल.

हलक्या तेला करता दाबाचे प्रमाण ९ला१ आणि जड तेला करता ते प्रमाण २३ला१ असे असेल. यंत्रशिर कुठले तेल वापरायचे यावर ठरले जाईल.

दट्ट्या वर पोचता पोचता त्या पिचकारीतून तेलाचा फवारा नळीत पडेल. जर हलके तेल असेल तर त्याचवेळी ठिणगीबुचातुन ठिणगी पडेल आणि तेल पेटेल. जर जड तेल असेल तर ते आपोआपच पेटेल.

ते पेटलेले तेल दाब वाढवील आणि दट्ट्या खाली ढकलला जाईल त्यामुळे अकेंद्रीत काठीला शक्ती मिळेल. ही शक्ती काठीला बसविलेल्या चक्रांत साठेल आणि दट्ट्या पुन्हा एकदा वर येईल. त्यावेळी त्या दुसऱ्या तोट्या उघडतील

आणि गरम हवा आणि ज्वलन पदार्थ बाहेर टाकले जातील. मग हेच चक्र चालत राहून हे यंत्र शक्ती देत राहील.

तर असे चालते हे अंतर ज्वलन यंत्र. याला कितीही दट्टे लावता येतात आणि त्याप्रमाणे हे यंत्र कमी ज्यास्त शक्तीचे करता येते. मग ते आपण निरनिराळ्या कामाकरता वापरू शकतो.

काही प्रश्न, शंका आहेत का? असतील तर विचारा."

असे म्हणून मी माझे व्याख्यान आवरते घेतले आणि वर्गावर नजर फिरविली. आता ते काचेसारखे झालेले डोळे पुन्हा माणसांचे होऊ लागले होते, व्याख्यान संपले म्हणून असेल कदाचित.

एक हात वर आला. "विचारा", मी म्हटले.

" माझ्या रेसर बाईकला हाय स्पीड इंजिन आहे आणि त्याचा एक्झॉस्ट खूप नोईझी आहे तर त्याला ट्यून करण्यासाठी मला काय काय मॉडिफिकेशन्स करावी लागतील आणि फ्युएल इंजेक्शन सिस्टिम मध्ये काय काय चेंजेस केले तर माझी बाईक मल्टीफ्युएल क्वालीफाइड करता येईल?"

a

"है शाब्बाश, अब आयेगा मझा", मी म्हटले.

"तुला एक्झॉस्ट टेंपरेचर मेझर करून व्हॉल्व्ह टायमिंग असे ऍडजस्ट करावे लागेल की मग त्यातून एक्झॉस्ट व्हेलॉसिटी अशी ऍडजस्ट होईल की व्हॉल्व्ह्स व्हायब्रेट होणार नाहीत आणि एक्झॉस्ट टेंपरेचर ऍम्बियंट पेक्षा हंड्रेड डिग्री केलवीन ज्यास्त असेल, त्याहून कमी नाही की ज्यास्त नाही. आणि मल्टिफ्युएल बाईक करण्यासाठी तुला व्हेरिएबल सिलिंडर हेड लावायला लागेल आणि कंट्रोल वर स्पार्क सिलेक्टर जो फ्युएल प्रमाणे स्पार्क टायमिंग सेट करील"

" सर, आता समजले की इंटर्नल कंबस्चन इंजिन कसे चालते ते"

"सर्वांचे आभार, आणि पुन्हा भेटू नंतर", म्हणून मी माझे व्याख्यान संपवले.

तर सांगतो काय, मातृभाषेतून शिकविणे अगदी नक्की आणि सहज शक्य आहे. बस, प्रयत्न केला पाहिजे, व्याख्यात्यानी आणि विद्यार्थ्यांनी.

नाहीतर गाडी पुन्हा परक्या इंग्रजीवर घसरायची.

अस्मिता आणि असूया

माणसाच्या मनातले सहा शत्रू, काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे पूर्वीपासूनच माहितीचे झाले आहेत. काही अव्यक्त शत्रू आता डोके वर काढताहेत. ते म्हणजे अस्मिता आणि असूया.

माणसाला स्वाभिमान पाहिजेच, त्यालाच गोड नाव म्हणजे अस्मिता, "आम्हीही काही कमी नाही आहोत". आणि नव्याने डोके काढणारा दुसरा शत्रू म्हणजे, असूया, "त्याच्याकडे आहे ते मला का नाही मिळत? मग त्यांना मिळालेले फालतूच आहे"

आजकाल अश्या या पोस्ट फिरताहेत सोशल मीडियावर ज्या हे शत्रू शिरल्याचे लक्षण आहे. आमच्या वालचंदच्याच एक मित्राने पाठवलेली, अर्थात फॉरवर्ड करूनच.

उदघृत
दोन मोलकरणींचा संवाद.

"अगं शिकून नोकरी करण्यापेक्षा केर लादी , भांडी.धुणी करून मी जास्त कमवते."

a

"हो गं ,प्रत्येक कामाचे हजार बाराशे म्हणजे घरटी साडेतीन हजार तरी सुटतात"

"एका सोसायटीत पाच घरं तरी मिळाली तरी बास."

" शिवाय कुठे तरी चहा नाश्ता असतोच"

" मालकीण बाई उरलं सुरलं घरी न्या म्हणतेच"

"पोरांचही भागत!"

"दिवाळी चा पगार मिळतो,

लग्न मुंजीच्या वेळी साडी नक्कीच"

"मी तर महिन्यात ३ ,४ सुट्ट्या घेतेच"

"गणपती नवरात्र म्हणजे भर पगारी रजा.."

"माझी सासू बाळंतपणानंतर तेल मालीश करायला महिना पाच हजाराखाली पै घेत नाही."

" शिवाय वर साडी चोळी आहेच."

"खरंच की!"

काय मित्रानो आपल्या कडे हीच स्थिती आहे ना!

आपण वाशिंग मशिन आणतो, महागड्या पावडरी आणतो त्याचा फायदा कुणाला होतो.

a

दोघेही नोकरी करता,महागडे फ्ल्याट घेऊन उंची इंटेरियर करता, यांचा उपभोग कोण घेतो,तर मुलांना सांभाळणारी बाई.

आणि आई वडील..

दूर कोकणातल्या चंद्रमौळी घरांत.मनिआर्डरची वाट पहात.

नाहीतर महागड्या वृध्दाश्रमात.दिवस मोजत.

फार भयावह आहे हे.

अनउदघृत

वाईट वाटले आम्हाला अशी पोस्ट वाचून आणि त्यातही आपल्याच मित्राने अशी पोस्ट पाठवली म्हणून.

मग आम्ही त्याला उत्तर दिले,

उदघृत

हे तर खरे आहेच पण ही आपली लाईन नाही.

आपण शिक्षण का घेतले आणि त्यांनी का नाही याची कारणे वेगवेगळी आहेत.

मोलकरणींचे, मेकॅनिक लोकांचे, झाडूवाल्यांचे, ड्रायव्हर, कंडक्टर लोकांचे किंवा इतर श्रमजीवींचे ऐकून आपण दुःखी होऊ तर स्वतःलाच प्रश्न

विचारायला पाहिजे की आपल्या मुलांना आपण शाळा कॉलेजांत घालून का शिकवले म्हणून. त्यांना सरळ पैसे कमवायला का नाही लावले.

श्रमजीवी वेगळे आणि बुद्धिजीवी वेगळे. त्यांची विचारसरणी वेगळी आणि आपली वेगळी.

पैसे मिळविणे हेच सर्वकाही श्रेष्ठ आहे का?

पन्नास साठ हजार पगारवाला प्रोफेसर आणि दोन लाख मिळवणारा चौथी पास कॉन्ट्रॅक्टर यांत तुम्ही श्रेष्ठ कोणाला मानणार?

पु ल देशपांड्यांच्या "व्यक्ती आणि वल्ली" मध्ये तो ड्रायव्हर काय म्हणतो ते वाचलेले आठवले का? "पैसा काय रंडीबी कमावते, पण आमाला मान कोन देनार? आमाला तुमच्यासारकी साळा शिकवली असती आमच्या आईबापाने तर आमीबी तुमच्यासारके मोठे झालो असतो."

यातच सर्व आले.

बुद्धिजीवी आयुष्य स्वीकारल्यावर इतरांशी तुलना करणे अगदी चुकीचे आहे.

तर साहेब, असे विचार करू नका, जे केलेत ते उत्तम केलेत. काही चुकीचे केले नाहीत. अशी खंत नको आता मनात यायला.

आजकाल अश्या पोस्ट खूप फिरताहेत ग्रुप्स वर.

नव्व्याण्णव टक्के पोस्ट अश्या लोकांनी टाकवल्या आहेत जे लौकर मिळवते झाले, काहीही कारणाने आणि आता मध्य वयांत त्यांना आपल्याला कोणी मान देत नाही अशी खंत लागून राहिली आहे.

या वयांत पुढे आपले शिक्षण सुरू करण्याची दानत त्यांची नाही.

मग जे शिकले त्यांची टवाळी करणे, त्यांच्या डिग्र्यांची टिंगल करणे, त्यांना कश्या मुली लग्नाला नाकारतात किंवा आमचा दहावी पास मुलगा कसा लाख रुपये दूध काढून कमावतो किंवा आमची शाळा सोडलेली मुलगी कशी डिलीव्हऱ्या देऊन हजारो कमावते याप्रकारच्या बढाया मारतात, आणि अश्या शिकलेल्या लोकांना आम्ही कसे नोकर म्हणून ठेवतो असा बडेजाव करणे असले उद्योग ते करवत आहेत.

अश्या लोकांना रामराम करून आपले चालू ठेवणे हेच उत्तम.

अनउदघृत

आमच्या इंजिनियर्सच्या ग्रुप वर असाच एक व्हिडिओ कुणीतरी पोस्ट केला होता. त्यांत एक मनुष्य भाषण देतो आहे. सांगतो आहे की शिक्षण घेऊन काय उपयोग आहे. असाच काही तो व्हिडिओ होता, त्याचे थोडे वर्णन वर आलेच आहे.

आता शिक्षण मिळू शकले नाही किंवा घेतले नाही अशी परिस्थिती लोकांवर येत असेल. त्याला त्यांच्या नशिबाचा भाग असेलही. पण शिकलेल्यांबद्दल तिरस्कार आणि आपल्याला त्यांच्यासारखे कोणी वागवत नाही किंवा वागवणार नाही अशी सल या प्रकारे व्यक्त करणे हे फक्त या नव्या शत्रूची करामत वाटते.

अस्मिता ठीक आहे कारण मनुष्य आपल्या कार्याच्या बळावर यशस्वी होऊ शकतो आणि खूप लोक असे झालेत. पण अश्या लोकांनी शिक्षणाचा काय फायदा? शिक्षण घ्यायचेच कशाला असले प्रश्न नाही विचारले. उलट शिक्षण घ्या असाच सल्ला दिला.

जरा वळून बघा मागे, तुमच्या आयुष्यांत असे प्रसंग आले असतील की तुम्हाला आपल्यापेक्षा कमी शिक्षण घेतलेल्या लोकांबरोबर किंवा अश्या लोकांच्या हाताखाली काम करायला लागले असेल कधीतरी. पण तुम्ही त्यांच्या कसबासाठी किंवा त्यांच्या कलेसाठी त्यांचा सन्मानच केला असेल.

मग ही हीनतेची किंवा असूयेची जाणीव आज काही लोकांच्यात का यावी आणि आपल्या सारख्या सुशिक्षित लोकांनी त्या जाणिवेचे समर्थन आणि प्रसारण का करावे? की त्यांनाही आता असेच वाटू लागले आहे की काय? अजब वाटचाल आहे ही समाजाची.

मध्ये एक लेख वाचला होता आणि आम्हाला वाटते तो ग्रुपवर प्रसिद्ध ही केला होता, ज्यामध्ये नासा मधल्या एक स्त्री शास्त्रज्ञांची मुलाखत होती. ही शास्त्रज्ञ पहिल्यांदा नाट्यकला आणि नृत्यकलेत पारंगत झाली, अनेक स्टेज कार्यक्रम केले तिने आणि मग एकाएकी सायन्स मध्ये शिरली, शिकली, नासा

मध्ये गेली आणि ज्यूनो या अंतराळ यानाच्या इन्स्ट्रुमेंट्स ची मॅनेजर झाली. आज ती इन्स्ट्रुमेंट्स गुरू ग्रहाभोवती काम करत आहेत.

अशी मनोवृत्ती आपल्याकडे का नाही याचे वैषम्य वाटते. शिक्षण फक्त बालवयातच घ्यायचे असते नंतर ते मिळत नाही असे आपल्याकडे का समजतात?

जर या वरच्या धुणीभांडीवाल्या आणि तो यशस्वी कृषिक पुन्हा शिकू इच्छितील तर त्यांना कोण आडकाठी घालेल का? कदाचित पुढे शिकल्यानंतर त्यांची ही असूया नक्कीच नाहीशी होईल.

जर आईवडीलच असा विचार करू लागले तर मुलाना शिक्षण घेण्याची प्रेरणा कोण देणार? आणि त्यांतही ती मुले जर स्वतः धडपडून शिकली तर हेच आईवडील त्यांना उत्तेजन देतील की त्यांची टिंगल करतील?

विचार करण्यासारखी गोष्ट आहे ही.

आमचाही भाषासंभार

बहुभाषिक असणे आमच्या पिढीची गरज झाली होती. ज्यास्त करून जिकडे जाऊ तिथल्या मुलांच्या बरोबर संवाद साधण्यासाठी आणि त्यांनी आपल्याला खेळण्या बिळण्यांत सामील जरून घ्यावे म्हणून.

नुसती भाषा येऊन चालत नाही तर "बोली" भाषा सुद्धा यायला पाहिजे हे बरेच लौकर आमच्या लक्षांत येऊ लागले.

थोडेसे बालपण गुजरातमध्ये आणि ते सुद्धा "शुद्ध" गुजराती, गुजराथी नव्हे बरं का, अहमदाबाद मध्ये गेल्यामुळे थोडी थोडी गुजराती भाषा यायला लागली होती. अगदी आई वडिलांच्या चुका काढण्या इतकी.

पण नंतर मुंबईला आमचे आई बाबा शिफ्ट होऊन स्थायिक झाले, ते सुद्धा जे जे हॉस्पिटल सारख्या भागांत. मग काय, बंबय्या हिंदी मध्ये आमचा प्रवेश झाला.

आज अमिताभ बच्चन हे हिंदी त्याच्या "विनोदी" शैलीत म्हणतो ती हिंदी.

" हम जाता है, तुम आता है क्या?"

"वो लडके लोग पागल है"

"तुमको क्या मंगता है?"

"हमको तुम्हारा पतंग दे दोना मॅन"

अशी ती बंबय्या हिंदी.

शुद्ध हिंदी शाळेने शिकवली. कहावते, मुहावरे, अलंकार, श्लेष, छंद, मोठ्या कवींच्या कविता आणि मोठ्या लेखकांचे लेख आणि गोष्टी. एकदम प्युअर आणि संस्कृतप्रचुर.

मराठी तर काय, ती तर आपली मातृभाषा. आई शिकवेल ती आपली मराठी. ती बरीच "पुणेरी" शुद्ध असायची.

पण कोल्हापूरला आजोळी गेल्यावर मामे आणि मावस भावंडांची भाषा वापरली नाही तर आम्हाला हसतील या भीतीने कोल्हापुरी मराठी वापरायची. सिग्नल नाही, बावटा. इंजिन नाही इंजन. गंड म्हणजे राजा, ह्यांन्नी म्हणजे राणी, हे तिथे कळले, गोट्या खेळतांना. गाडी "जाते" नाही म्हणायचे, गाडी "जाती" म्हणायचे

संस्कृत तर काय, सर्व भारतीय भाषांची आज्जी. आणि ती सुद्धा शाळेत कंपल्सरी, त्यामुळे पाठांतर, श्लोक, नावे चालवा, रसग्रहण करा हे सगळे

करायला लागलेच अगदी एसएससी पर्यंत. थोडीफार वाक्यरचना करता येऊ लागली. एखादे पत्र सुद्धा लिहिता यायला लागले.

मग आठवीपासून इंग्रजी, किंवा इंग्लिशची "कास" (म्हणजे काय हो?) धरली. इंग्लिश मध्ये प्राविण्य मिळवायचेच होते कारण नंतर जन्मभर ती साथ देणार होती. ते तर थोडे फार मिळवलेच. त्यांतही जेम्स हॅडले चेझ, रीडर्स डायजेस्ट, पॉप्युलर सायन्स आणि पॉप्युलर मेकॅनिक्स आपली छाप पाडून गेले.

सांगलीला गेल्यावर एक लक्षांत आले की xxxx असलेली भाषा आली नाही तर इकडचे लोक आपल्याला "सिक्सर" समजणार. मग नाईलाजाने तिचा उपयोग करून घ्यावा लागला. पण ते अपवाद म्हणून, अजिबात आवडले नाही तरी. घरांत अशी भाषा वापरली असती तर दोन्ही कान चपटे केलेले झाले असते आमचे. पण जे शिव्यांखेरीज एक वाक्य संपवू शकत नव्हते असे निर्मळ मनाचे लोक आमचे जिवलग मित्र झाले.

गावरान मराठी ज्यास्त चालते हे पाहिल्या नंतर तिचाही मुक्त जिव्हेने उपयोग करावा लागला कारण तसे न करता आमची मुंबई मराठीच लावून धरली असती तर रिजेक्शनचा धोका दिसत होता. मुंबई सारखे "मस्का लावणे" म्हणायचे नाही, "गूळ लावणे" म्हणायचे. हे सुद्धा सर्व मोठ्या आवाजात, नाहीतर कोणीतरी आम्हाला बुळा म्हणायचे.

मुलाच्या नावाला "या" लावला आणि मुलीच्या नावाला "ई" लावली तर मैत्री ज्यास्त घनदाट होतें हे लक्षांत आल्यामुळे आणि त्याचा उपयोग केल्यामुळे तसे मित्र बरेच झाले. मैत्रिणी मात्र अजिबात केल्या नाहीत, त्यामुळे '"इ" लावणे फक्त बहिणींपुरते मर्यादित ठेवले.

कामाला सुरुवात केल्यानंतर एक वर्किंग इंग्लिश शिकायला लागली. ही म्हणजे इंग्लिश आणि इंजिनियरिंग याचे ग्रेट आणि थेट मिश्रण.

अश्या रीतीने, मंडळी, आम्हीही बऱ्याच भाषांत पारंगत झालो.

म्हणतात ना, रोम मध्ये रहायचे तर रोमन सारखेच रहायला लागते, अगदी तसेच.

असे आहे ना की भाषा विचारांचे साधन आहे मग जेवढ्या भाषा, आणि "बोली" भाषा आपल्याला येतील तेवढे चांगलेच.

विसरण्याचा स्विच

कॉम्प्युटरचे एक बरे असते. आजतरी तो आपल्या कह्यांत राहतो आहे. त्याचे ते प्रोग्रॅम, आजकाल ॲप्स म्हणतात त्यांना, आणि त्याची ती मेमरी जे आपण ठेवू तेवढेच साठवते आणि बिनकामाची मेमरी पुसून टाकते. पुन्हा आपण त्याला काय कर ते आजतरी सांगू शकतो. त्याला कमांड म्हटले असले तरी तो कॉम्प्युटर त्याला न आवडणाऱ्या गोष्टी अजिबात करत नाही. सरळ "बॅड कमांड" म्हणून नकार देतो. फारच ऐकेनासा झाला तर त्याची पॉवरच बंद करून कोण मालक आणि कोण नोकर हे त्याला समजावता येते. नाहीतर त्यांच्याकरता खास केलेली कंट्रोल अधिक आल्टर अधिक डिलीट बटणे दाबून त्याला गप्प करता येते. कधीकधी तो आपल्याला त्रास द्यायला बघतो, धमकी देतो की "ऑल डेटा विल बी लॉस्ट फॉर एव्हर". पण त्याला अजिबात न भिता शहाणा तो माणूस आणि मूर्ख तो कॉम्प्युटर असेच आपले त्याच्याबरोबर वागणे असते.

पण देवाने आपल्याला असा काही एक कॉम्प्युटर देऊन ठेवलेला आहे की त्याचे आपण जन्मापासून मृत्यू पर्यंत गुलाम असतो. तोच आपले जीवन चालवतो आणि तोच आपला जीवन रक्षक स्वामी बनून आपल्याला त्याचेच ऐकायला लावतो.

त्याला कंट्रोल करायला कोणतीही बटणे देवाने आपल्याला दिली नाहीत की त्याची पॉवर ऑफ करता येत नाही. आपल्या सगळ्या मानसिक शक्ती त्यांत एकवटल्या आहेत. तो कॉम्प्युटर कधी विसरतो कधी नाही. कधी नको तेंव्हा विसरून आपल्याला ओशाळे करतो किंवा कधी नको तेंव्हा आठवून देऊन आपल्याला सतावतो.

कल्पना करणे हे त्याचे काम आहे आणि ते मात्र तो अगदी व्यवस्थित करतो. त्याला देवाने फीड केलेले प्रोग्रॅम सहसा बिघडत नाहीत की त्यांना अपडेट करायला लागत नाही. तो बिनकामाचा कधीच बसत नाही. अगदीच काही काम नसले की तो आपला कल्पनाशक्ती नावाचा प्रोग्रॅम सुरू करतो. झोपल्यावर आपल्याला स्वप्ने नावाचे 3डी सिनेमे दाखवून आपले मनोरंजन करतो किंवा घाबरवून सोडतो.

मग कल्पनाशक्तीची उड्डाणे करून बघू या की.

समजा आपल्याला त्याने शिकलेले विसरायचे काहीतरी साधन दिलेले आहे. समजा की आपले दोन कान विशिष्ट बाजूने पिळले तर एखादे शिकलेले विसरून जाऊ, अगदी पूर्णपणे, तर कसे होईल?

a

तुम्ही तो सायकलचे हँडल उलटे फिरणारा व्हिडीओ पाहिला असेल. नसेल तर सांगतो. एका सायकल "इंजीनियर"ने हँडल असे बदलले की डावीकडे जायचे तर हँडल उजवीकडे फिरवायचे आणि असेच विरुद्ध बाजूला. त्या व्हिडिओवाल्याने असे दाखविले आहे की त्याला ही सायकल चालवायला शिकायला आठ नऊ महिने लागले. पण त्याच्या तीन वर्षांच्या मुलाला आठ दिवस सुद्धा लागले नाहीत. असे का म्हणे? कारण या मोठ्या बुवाचा मेंदू सायकल चालवायला शिकलेला होता. ते मेंदू इतका पक्का शिकलेला होता की ते विसरून नवी पद्धत शिकायला त्याला नऊ महिने लागले. तीन वर्षांचा मुलगा मात्र आठ दिवसांत शिकला कारण त्याच्या मेंदूत असा पक्का बसलेला प्रोग्रामच नव्हता. पुन्हा नंतर साधी सायकल चालवायला लागला तर ती येईना. पुन्हा शिकणे आले.

म्हणजे शिकलेले विसरणे अगदी जड जाते. ते शिकलेले कितीही चांगले वाईट का असेना. जर आपल्याला शिकलेले विसरायचे काही साधन मिळेल तर आपण काय करू? सायकलवर बसू, दोन्ही कान पिळू, आणि सायकल चालवायला लागू. आपल्यालाही आठ दिवसांत येईल अशी सायकल चालवायला.

आणि मोटर चालवायला, आणि विमाने उडवायला, आणि इंजिनियरिंग विसरायला, आणि खूप पैसे मिळवायला, बघा संधी खूपच आहेत. तर पाहिजे का असा कंट्रोल? म्हटले तर खूप फायदा आणि म्हटले तर खूप तोटा.

पोलीस चोराच्या मनातला चोरीची कला असलेला प्रोग्रॅम डिलीट करू शकतील आणि चोर पोलिसांच्या मनातला हा चोर पकडून झोडायचा प्रोग्रॅम असाच डिलीट करू शकतील.

आणि मेमरी पुसायचा प्रोग्रॅम किंवा साधन मिळाले तर? नको त्या आठवणी पुसून टाकता येतील आणि मेंदूत नव्या किंवा आवडत्या गोड आठवणींचीच ठेव ठेवता येईल.

मित्रांबरोबर, नातेवाईकांच्या बरोबर, बायकोमुलांबरोबर झालेली भांडणे आणि वादविवाद विसरून टाकता येतील अगदी कायमचे तर किती चांगले होईल. नोकरीधंद्यांत झालेल्या कटकटी विसरता येतील तर काय बहार होईल. नको ते शिकलेले टेबला खालचे व्यवहार करायचे स्किल, पाठ चावणे विसरता येईल तर किती छान होईल.

नको त्या ज्ञानाने मेंदूत केलेली अडगळ साफसूफ करता येईल आणि नवी कलाकुसर शिकायला मेंदू फ्री करता येईल.

आजच देवाने असा कंट्रोल प्राण्यांना दिला आहे. मांजरांच्या बहुतेक प्रजाती दिलेले बक्षीस किंवा शिक्षा ताबडतोब विसरून जातात. वानर समाज जे डोळ्याला दिसते ते अदृश्य झाले की लगेच विसरून जातो. किडे मुंग्या फक्त जगायला जे आवश्यक तेवढे सोडून इतर गोष्टी शिकतच नाहीत. पक्षी, कोळी, मुंग्या, किडे जगायला जेवढे स्किल लागते ते हार्ड वायर्ड करून देवाने त्यांना चिंतामुक्त ठेवले आहे. उगाच फालतू मेमरीने त्यांचा मेंदू लोड होत नाही.

आम्हीच बघा असे. महिना दोन महिने नाही झाले या जगात येऊन की लागले चळवळ करायला. कधी एकदा पालथा होतोय आणि घोडा घोडा करत रांगतोय आणि उभा राहतोय आणि सुट्टा होऊन चालायला लागतोय. हे शिकू का ते शिकू? काहीच बंधन नाही. पाहिजे त्याच्या बरोबर नको ते पण शिकून घेतो. आणि मग हे करू नको ते करू नको ऐकत बसतो. त्यापेक्षा जर शिकलेले कॅन्सल करता आले तर कसे होईल?

हां, कोण कॅन्सल करणार आहे त्यावर मात्र लक्ष ठेवायला लागेल. देवाने आपल्यालाच द्यावा हा कंट्रोल. नाहीतर सगळाच घोटाळा व्हायचा. आपल्याला असे पाहिजे की आता सायकल काही चालवायची नाही तर तिचा तो प्रोग्राम कॅन्सल करता आला पाहिजे. किंवा आता काही काम करून पैसे मिळवायचे नाहीत तर.....

लहानपणी गरीब होतो, कष्ट सहन करायला लागले, त्याच्या आठवणी आता आणून दुःखी कशाला व्हायचे. त्यापेक्षा सरळ त्या आठवणीच डिलीट केल्या तर. आणि ते दुसऱ्याने आपल्याला नोकरीत ओव्हरटेक करून जाणे, मग होणारी ती धुसफूस, चिडचिड पुसून टाकली तर किती छान होईल. अश्या दुःखदायक घटना मेंदूतून पुसून टाकता आल्या तर किती बरे होईल.

पण सगळे प्रोग्रॅम किंवा सगळ्या आठवणी नको बाबा पुसायला, नाही तर नको तो वांधा व्हायचा. लग्न झालेले विसरूनच गेलो तर? आणि पगार घ्यायला विसरलो तर?

जेंव्हा आपले लग्न झाले तेंव्हा गुरुजींच्या त्या मंत्रांनी आपल्या उनाड काळातल्या आठवणी पुसून टाकल्या असत्या तर? ते भाकड विलींग्डनला जाणे, तो गणिताचा पेपर, त्या बस स्टॉप वरच्या पऱ्या, ते नोकरी शोधणे, ते बॉस कडून "समजावून" घेणे, ते विदाऊट तिकीट पकडले जाणे, पाकीट नको त्या वेळी मारले जाणे, जाऊद्यात त्या आठवणी असेच म्हणू.

पण ती वादळपावसाची अचानक आलेली लाट, ते छान झाड, तिथे उभी असलेली ती, तिचे भिजणे..... हेही विसरायला आवडेल का?

a

विसरायचा स्विच द्यावा देवाने पण त्याचा उपयोग योग्यपणे करण्याची बुद्धीही द्यावी.

देव दयाळू आहे आणि त्याने अशीही व्यवस्था केली आहे की अति झाल्यावर आठवणी रेकॉर्डच होणार नाहीत मेंदूत. एक ठराविक वयानंतर तो आपण होऊनच सगळ्या आठवणी पुसून टाकतो. विसरायचा स्विच ऑनच रहातो मग.

मग आपला हा कॉम्प्युटर सगळे विसरून आपल्याला साधू संत करील. आणि कोणताही स्विच न वापरता फॉरमॅट करून नव्या आयुष्य अवस्थे साठी तयार करील.

"न सुख है, न दुख है, न दिन है न रात. सिर्फ मैं हूँ, मैं, मैं, मैं।"
अशीच आपली व्यवस्था होईल.

निसर्गाशी कुस्ती

माणूस हा एक विचित्र प्राणी आहे. सगळे प्राणी जमिनीला हातपाय लावून चालतात तर हा जमिनीवर उभा राहून चालतो. हात मोकळे झाल्यामुळे त्याचे डोके अजूनच चालायला लागले आहे त्यामुळे भराभर प्रगती करून आपली त्याने वृद्धी करून घेतली आहे.

जमिनीखाली, जमिनीवर, पाण्याखाली, पाण्यावर, हवेत आणि हवे बाहेर अवकाशांत संचार करायची त्याला कला मिळाल्यानंतर आता त्याला वाटू लागले आहे की निसर्ग हा माझा गुलाम आहे आणि मी निसर्गाला सहज ताब्यांत ठेवीन.

दुसरे सर्व प्राणी पहा, कोणीही निसर्गाशी पंगा घेत नाही. सगळे निसर्गाशी जुळवून घेतात, एक माणूस सोडून. तो नद्या काय वळवितो, समुद्र काय आटवितो, हवा काय बदलवतो, कृत्रिमरीत्या पाऊस काय पाडायला पाहतो जसे काही हे सर्व त्याचे नोकर आहेत आणि हा त्यांचा मालक.

पण एक भूकंप, एक ज्वालामुखी, एक सुनामी निसर्ग त्याच्याकडे पाठवतो आणि कोण स्वामी आणि कोण दास हे दाखवितो. पण शिकणे तर दूरच, उलटे माणूस निसर्गाला वळवू पहातो आहे.

माणसाची भूक, खरे म्हणजे हाव, इतकी मोठी की तो दुसऱ्या ग्रहावर जाऊन तिथे आपले राज्य प्रस्थापित करू पहातो आहे.

आपली पृथ्वी किती नाजूक आहे ते तिचा अभ्यास केल्यावर समजते आहे. तपमानात एक दोन डिग्रीचा फरक झाल्यावर जगभर पाऊसपाणी कसे बदलले आहे ते दिसू लागले आहे.

ज्या जागांनी पावसाचा थेंब कधी पाहिला नाही तिथे इतका पाऊस होतो आहे की आहे ते तिथले पर्यावरण संपूर्ण बदलते आहे. आजच्या माहितीच्या युगांत कानाकोपऱ्यातली बातमी समीर दिसते आहे. ज्या देशांनी शहरांनी पूर कधी पाहिले नाहीत ते पाण्याखाली गेलेले दिसताहेत. ज्यांची अश्या गोष्टीची तयारीच नव्हती ते आता त्याला तोंड देताहेत.

साल दोन हजारच्या सुमाराला एक छोटीशी बातमी आली होती की अंटार्क्टिका मध्ये एका देशाच्या स्टेशन बाहेर गवताची पाती उगवली म्हणून. बातमी छोटी होती, कुणाचे फार लक्ष ही गेले नसेल तिच्याकडे पण निसर्गाने एक माहिती पाठविली होती.

येणाऱ्या काळाची ती एक खूण होती.

विज्ञान आणि संशोधन आणि काबू करायला पाहणे या अगदी वेगळ्या गोष्टी आहेत. माणसाने विज्ञान आणि संशोधन करून माहिती तर खूप मिळविली आहे आणि त्याची हाव आता निसर्गावर मात करण्याची आहे हे उघड आहे. धन दौलत यामागे लागून निसर्गाचा बॅलन्स बिघडविण्याचा उद्योग तर माणूस करताच आहे पण निसर्गही ही हाव किती व्यर्थ आहे ते शिकवतो आहे.

पाऊसपाण्याचे प्रमाण बदलते आहे पण त्याच्याशी जुळवून आपला कार्यभाग साधण्याची कला माणूस लौकर शिकतो आहे का हा प्रश्न आहे.

आज काय परिस्थिती होते आहे ते बघा. एक कोरोना व्हायरस येतो आणि सगळ्या पृथ्वीवर आपला कब्जा करतो, शिवाय आपल्यांत सारखा बदल करून माणसाचे काबू करण्याचे प्रयत्न हाणून पाडतो आहे. नुसता पाऊस पडला तरी माणसांची शहरे उध्वस्त करतो आहे. पण माणसाची हाव कमी झाल्याचे काही दिसत नाही.

अवकाशांत इतर ठिकाणी जीव असतील की नाही ते अजून नक्की माहीत नाही, त्याचा शोध चालू आहे. जरी जीव पृथ्वी सोडून इतर ठिकाणी असतील तरी ते कसे असतील, या कोरोना व्हायरस सारखेच असतील का? धूमकेतू आपल्याबरोबर असे जीव घेऊन फिरतात आणि ते जीव इतर ग्रहांवर उतरतात

असे एक मानणे आहे. असे जीव जरी असतील आणि आपण त्यांचा शोध लावला तरी ते आपल्या अधीन थोडेच असणार आहेत? आणि आपण त्यांच्याशी कसे जुळवून घेणार?

निसर्ग फक्त पृथ्वीवरच नाही तर सर्वत्र अवकाशातही आहेच. जिथे पृथ्वीवर त्याच्यावर कब्जा करणे जमत नाही तर इतर ठिकाणी तो कसा करणार? विज्ञान आणि संशोधन त्याची माहिती देऊ शकेल, त्याच्यावर ताबा मिळविण्याचे सूत्र कसे देणार?

आज पृथ्वीचे तपमान दोन डिग्रीने कमी करण्यासाठी माणूस धडपडतो आहे, कोट्यवधींची दौलत खर्च करतो आहे. पण एक ज्वालामुखी हेच एका वर्षांत करू शकतो. आज शुक्रावर असे गरम वातावरण का झाले आहे आणि ते पृथ्वीवरही होऊ शकेल का याचा शोध सुरू आहे. सूर्य वयस्कर झाला की जो परिणाम होईल त्याच्यापासून बचाव कसा करायचा याचा विचार माणूस आजच करतो आहे, पण ज्या पृथ्वीवर तो आज रहातो आहे तिचे वातावरण बिघडवायला मात्र तो अजिबात कुचराई करत नाही.

निसर्गाशी अशी कुस्ती करणे कधी माणसाला जमणार आहे का? त्यापेक्षा त्याच्याशी जुळवून घेणे सोपे नाही का? या जुळवून घ्यायला लागणारा खर्च कमी असेल का?

महत्वाकांक्षा असणे ठीक आहे, पण जिथे रहातो तिचाच विध्वंस करणे कसे योग्य आहे?

अवकाशांत आज पृथ्वी हा एकुलता एक ग्रह आहे ज्यावर अशी "प्रगत" जीवसृष्टी आहे. जे लोक अंतराळात जाऊन आलेले आहेत त्यांच्यांत एक गंभीर जाणीव आलेली आहे की पृथ्वी आपले घर आहे आणि ते अतिशय नाजूक आहे.

ज्यावेळी इथे जमिनीवर रहाणाऱ्या माणसांचा हे उमजेल तो सुदिन. निसर्गाशी स्पर्धा करण्याऐवजी आणि त्याच्यावर ताबा मिळवायचा प्रयत्न करण्याऐवजी त्याच्याशी जुळवून घेणेच शहाणपणाचे होईल असे जेंव्हा वाटेल तेंव्हा आपले जीवन सुकर होईल.

शात्रज्ञ सांगतात की वातावरण बिघडते आहे पण राज्यकर्ते या सांगणाऱ्यांचाच आवाज दडपून टाकतात. हे कसे चालणार? अशी निसर्गाशी कुस्ती कधी माणूस जिंकू शकणार आहे का?

आता यावर विचार नाही, ॲक्शन घ्यायची वेळ आली आहे.

सत्य आणि आभास

चक दे इंडिया हा चित्रपट मी आठ ते दहा वेळातरी पहिला आहे आतापर्यंत. तसे मला आवडलेले सिनेमे मी खूप वेळा पहातो. अगदी पारायण होई पर्यंत. आता ऑलिम्पिकची जी पर्वणी चालू आहे तिच्यांत आणि चक दे इंडिया सिनेमांत जे कमालीचे साम्य दिसते आहे त्याने मी अगदी भारावून गेलो आहे.

चक दे इंडिया मध्ये त्या महिलांच्या टीम मध्ये ज्या व्यक्तिरेखा दाखविल्या आहेत अगदी तश्याच आत्ताच्या टीम मध्येही दिसताहेत. तो अर्थात सिनेमा होता आणि हे सत्य आहे. पण सिनेमावाले सुद्धा किती सखोल अभ्यास करून मग तो सिनेमा बनवतात हे वाखाणण्यासारखे आहे.

काल रानी रामपाल ची जीवन कथा वाचली, तिच्यांत आणि या चक दे इंडिया चित्रपटातील काही व्यक्तिरेखांत किती साम्य आहे! गरीब कुटुंबातून येऊन जिगरबाज स्वभावाने आपले लक्ष्य साधणाऱ्या या व्यक्ती खऱ्याच गुरुपदी मानल्या पाहिजेत.

a

तसाच दुसरा चित्रपट म्हणजे आमिर खानचा कुस्ती वरचा दंगल हा. त्यांतही एक एक व्यक्तिरेखा कशी ठळक आणि तपशीलवार लिहिली आणि मग चित्रित केली आहे ते बघण्यासारखे.

चित्रपटांच्या आभासी दुनियेत सत्याची तंतोतंत प्रतिमा उतरविणे किती कष्टाचे असेल! या चित्रपटाचे डायरेक्टर प्रत्येक व्यक्तीला बरोबर बसेल असे नट नट्या कसे निवडत असतील ते विचार करण्यायोग्य आहे.

चक दे इंडिया मध्ये एक शाहरुख खान आणि एक दोन प्रसिद्ध नट नट्या सोडल्यातर इतर व्यक्तिरेखा अपरिचित किंवा अगदी क्वचित दिसणाऱ्या कलाकारांनी अभिनय केले आहेत. अभिनय कसले, ते त्या भूमिका जगलेच आहेत.

प्रत्यक्ष मैदानातले खेळणे आणि चित्रण तर असे आहे की कुठल्यातरी खऱ्या मॅचचे चित्रण असावे. दंगल आणि चक दे इंडिया मधले ते ड्रामॅटिक सीन जर वगळले तर खरीच मॅच चालली आहे असे वाटते.

अर्थात हे दोनच केवळ स्पोर्ट्स वरचे सिनेमे नाहीत. भाग मिल्खा भाग आणि पानसिंग तोमर असेच चित्रपट होते. स्पोर्ट्स च्या सिनेमांत ड्रामेबाजी

म्हणजे लाल पाण्यांत हिरवी शाई ओतल्यासारखे वाटते. धड हे नाही की ते नाही.

तुम्हाला आठवते का? आपण FE ला असतांना टोकियो ऑलिम्पिक १९६४ असा एक सिनेमा आला होता. आपल्या कॉलेजच्या बऱ्याच जणांनी तो पाहिला होता. प्युअर स्पोर्ट्स सिनेमा होता तो. टोकियो ऑलिम्पिकची चित्रणे. त्या प्रकारचा पहिलाच पूर्ण लांबीचा सिनेमा असेल तो. त्यांतही एक व्हॉलीबॉलची मॅच दाखवली होती, मला वाटते जपान आणि कोरिया च्या महिलांची. त्या अटीतटीच्या मॅचचे चित्रण पाहून आपण भारावून गेलो होतो. आणि मग इंडिया पाकिस्तानची हॉकी मॅच दाखवली होती, तिच्यातल्या मारामारी सकट! ती थोडी कडू चव सोडून गेली.

आता टोकियो ऑलिम्पिक २०२० चे चित्रण बघतो आहोत. व्हॉलीबॉल च्या काही मॅचेस अगदी काट्यावर जिंकल्या आणि हरल्या जाताहेत. भारताच्या मॅचेस बघतांना अगदी खुर्चीच्या काठावर बसायला होते आहे. आयर्लंड बरोबरची आपली मॅच तर आर की पार अशी झाली.

चित्रपट करतांना अनेक गोष्टींचे भान ठेवायला लागते पण तिथे रिटेक आणि पोस्ट प्रोसेसिंग करता येते पण या लाईव्ह प्रक्षेपणात तितकीच सफाई

आणि स्टाईल दिसली आहे. अगदी पेनल्टी स्ट्रोकचा फटका आणि त्या बॉलचा सरसर आवाजही ऐकू आला आहे. चक दे इंडिया मध्ये आहे तस्साच.

चित्रपटाचा शेवट बहुधा ओळखण्यासारखा असतो पण इथे पुढे काय होणार याची उत्कंठा लागून रहाते आहे. आपले प्रतिनिधी तिथे खेळ दाखवित‌ाहेत. काही पदके मिळालीही आहेत. पुढच्या कामगिरीची प्रतीक्षा आहे. शेवटी हे सत्य आहे, आभास नाही.

भाषा शिक्षण हवे का?

जन्मल्या पासून आपण दुसऱ्याची संवाद साधत असतो. भूक लागली, तहान लागली, दुखते खुपते आहे, थंडी वाजते आहे, उकडले आहे, लगेच दुसऱ्यांना सांगतो. रडून. रडणे हीच भाषा आपली. अगदी युनिव्हर्सल. कुठेही जागा, बरोबर इतरांना समजणार. दोन तीन महिन्यांनी अजून त्यांत भर पडते, हसून दाखवायची. खूष झालो, छान वाटतेय, दुसरा आवडता चेहेरा दिसला, हसून दाखविले. बघणारे तसेच हसून उत्तर देतात. अजून एक युनिव्हर्सल भाषा मिळाली.

हळू हळू आपल्याला कळते की दुसरे काय काय आवाज करतायत ते. काही आवाज आवडायला लागतात आपल्याला काही नाही. आवडले आवाज, हसून दाखवतो, नाही आवडले, रडून. आपणही तसेच आवाज काढायचा यत्न करतो. कधी त्यांना कळते कधी नाही. आपण आपले "म्हणणे" दुसऱ्यांना कळवायचा प्रयत्न तर करतो आपण. शिवाय न बोलता आपल्या हावभावाने जमेल तितके आपले म्हणणे इतरांपर्यंत पोचवितो. आपले आवाज, आपले हावभाव कळायला लागतात हळू हळू त्यांना. भाषेची सुरवात होते.

जगांत असंख्य भाषा बोलल्या जातात, काही दूरवर काही अगदी थोड्या ठिकाणी. काही लिहिता येतात, काही नाही, पण भाषांमुळेच लोक आपले आचार विचार प्रकट करू शकतात यांत काही संशय नसावा.

आपली आई आपल्याला शिकविते काय सांगायचे आणि कसे सांगायचे ते. दोन वर्षांपर्यंत नुसती प्रॅक्टिस चाललेली असते आपली. दोन अक्षरी आई, बाबा, काका, मामा पासून संपूर्ण वाक्य म्हणता यायला तीन वर्षे तरी निघून जातात.

मग येते तो शाळा आणि ते नवे जग. आपले मित्र मैत्रिणी आपल्याच सारख्या बोबडे बोलणाऱ्या असल्या तरी काही बिघडत नाही. आपले म्हणणे कळते आहे ना त्यांना, मग झाले. अजून पर्यंत तरी आपली भाषा बोलीच आहे, लिहिता वाचता कुठे येतेय?

बालवाडी संपता संपता अक्षरओळख व्हायला लागते आणि ते वाचणे सुरू होते, पण अजूनही भर बोलण्यावरच आहे. ते मात्र अगदी जमायला लागले आहे. अगदी आवडी निवडी सुद्धा स्पष्टपणे सांगता येतात आता.

प्राथमिक शाळा सुरू झाली. आता एक दोन दुसऱ्या भाषा आपल्याला आता शिकायला मिळतात किंवा लागतात. खरेतर हे एक नवीन साधन आपल्या हातात आले आहे. आपला तो बंटी मित्र हिंदीत बोलतो, आणि तो मिची इंग्लिश मध्ये. आता आपल्याला त्यांच्याशी लिहूनसुद्धा आपले म्हणणे सांगता येणार आहे. सहावी ते अकरावी पर्यंत पाच तरी भाषा वाचून लिहून येत आहेत. गद्य आणि काव्य समजायला लागले आहे. भाषा हे संपर्काचे साधन म्हणून चांगलेच प्रस्थापित झाले आहे.

a

सायन्स कडे कल असलेली बहुतेक मुलेमुली भाषांकडे थोडे दुर्लक्ष करतात. त्यांना चांगले मार्क मिळवायला त्या भाषांची अडचण होते. पण असे व्हायला नको. जेवढे भाषेवर प्रभुत्व असेल तेवढे आपण दुसऱ्यांना आपले विचार ज्यास्त चांगले समजावू शकतो.

भाषा शिक्षण असावेच असे आम्हाला तरी आग्रहाने सांगावेसे वाटते. कारण एकदा आपले व्यावसायिक शिक्षण पूर्ण झाले की मग इतरांशी संवाद साधणे अति महत्वाचे बनते. जो स्वतःला नीट एक्सप्रेस करू शकत नाही तो आपले विचार दुसऱ्यांपर्यंत कसे पोचविणार?

दोन तीन भाषांवर आपली पकड असली पाहिजे. त्या भाषांत तरी आपल्याला भाषांतर रूपांतर करता आले पाहिजे. आपली उडी जर परदेशांत जाऊन काम करण्याची असेल तर तिथली भाषा शिकलीच पाहिजे.

काही परदेशी भाषा शिकायला सोप्या असतात आणि काही फार क्लिष्ट. बहुधा लोक आपल्या मातृभाषेत लिहिणे वाचणे बोलणे पसंत करतात. आपल्याला जर त्यांच्यांत मिसळायचे असेल आणि त्यांनी आपल्याला स्वीकारायचे असेल तर त्यांचाच भाषेत व्यवहार केलेला चांगला.

शाळा कॉलेजे हे भाषा शिक्षणाचे काम उत्तम करतात. समजा आपण आपल्या काही विचारांनी दुर्लक्षित केले असले तरी नंतरच्या आपल्या

आयुष्यांत ज्यास्त किंमत देऊन ते शिकायला लागते. मग आपणच आपल्या पुढच्या लोकांना भाषा शिकण्यासाठी उत्तेजन देणे योग्य नव्हे काय?

एक अतिशय हुशार, कामसू आणि चौकस बुद्धिमत्तेचा माणूस असतो. नुसते बघून आणि ऐकून शिकायची त्याची हातोटी असते. अतिशय उद्योगी आणि कामाला वाहून घेतलेल्या असतो तो. पण त्याला भाषांचे ज्ञान फारसे नाही तर त्याची कुचंबणा होईलच. ज्यास्त करून तो आपले काम आपले ज्ञान आपली भाषा नसलेल्या लोकांना सांगू इच्छित असेल तर नक्कीच.

मग आता त्याला आपला बहुमोल वेळ खर्च करून त्यांची भाषा शिकावी लागेल. त्यांत पुन्हा लिखित भाषेला लिपीची अडचण असू शकते. इथल्या इथे आपल्या भारतातच बघा. एक देवनागरी सोडली तर कुठलीही लिपी लगेच समजत नाही. भारतीय भाषा मुख्यतः इंडो युरोपियन आणि द्राविडी. त्यांतल्या त्यांत इंडो युरोपियन भाषांमधून संस्कृत आली आणि तिच्यामधून उत्तर भारतीय भाषा आल्या. पण द्रविडी भाषांची रचना वेगळी लिपी वेगळ्या त्यामुळे अगदी ओळखीच्या गोष्टीही "काला अक्षर भैंस बराबर" या उक्ती प्रमाणे चंद्रावर असल्यासारख्या होतात.

त्यांतल्या त्यांत एक बरे आहे की ती परदेशी इंग्लिश धावून येते मदतीला. त्यामुळं कसेतरी भागते आहे महाराष्ट्राच्या दक्षिणेला. पण इतर लोकांच्याकडे

पाहून कौतुक वाटते त्यांचे. यूपी, बिहार, राजस्थान, बंगाल मधून लोक येतात, इकडे मराठी काहीतरी शिकतात आणि आमच्यांशी संवाद साधतात. तसेच दक्षिणेकडून लोक इकडे येतात, आमची भाषा शिकतात आणि अगदी उत्तम संवाद साधतात. आमचा भाजीवाला भय्या मराठीतून आम्हाला भाज्यांचे प्रकार समजावतो. आमची तामिळ शेजारीण उत्तम मराठींत आमच्याशी बोलते, लिहिते सुद्धा. आमचा पंजाबी सहकारी आमच्यापेक्षा उत्तम मराठीत आमच्याशी बोलतो काम करताना ही. कौतुकास्पद आहे हे.

अशी जर भाषांची सरमिसळ होईल तर भाषा शिकायला कष्ट पडणारच नाहीत. अंगवळणी पडेल. पण आम्ही जर इतरांची भाषा न शिकता आपलीच भाषा रेटत राहू तर तंजावरी मराठी सारखी आमची भाषा आयसोलेट होऊन राहील.

लहान मूल भाषा पटापट शिकते, नव्हे आत्मसात करते. त्याचे उदाहरण आपण डोळ्यासमोर ठेवले पाहिजे.

एक दुसरा उपाय आहे, दुसऱ्या भाषेच्या मुलीशी लग्न करणे. मग बरोबर येतात एकमेकांच्या भाषा. पण आम्हाला हे करता येणे जरा कठीण आहे!

अगदी प्रोफेशनल व्हायचे तर आपण दुसरी भाषा शिकून प्रवीण व्हायला पाहिजे. दुसऱ्या देशांतले लोक इथे येतात, आमची संस्कृत, मराठी, हिंदी,

a
तामिळ शिकतात आणि आमच्याच पुरातन ग्रंथांचे वाचन करून, विवरण करून आम्हालाच सांगतात की तुमच्या ग्रंथांत असे असे लिहिले आहे म्हणून आणि आमचे पुराण कालीन आणि ऐतिहासिक ज्ञान घेऊन जातात आणि आम्हालाच ते पुन्हा शिकवितात. हे काही बरोबर वाटते का? असे भाषातज्ज्ञ आपल्याकडेच असावेत आणि आपले ग्रंथ त्यांनी परदेशी लोकांना शिकवावेत हेच योग्य नव्हे काय.

जे आजवर झाले ते झाले. आता आपण आपल्या भाषांचा सत्कार होईल असे काही करू. आपल्या स्वतःच्या शब्दांत जे काही सांगायचे ते सांगू. पहिल्यांदा अडचण येईल, मग जमायला लागेल. चुकत माकत तर सगळेच शिकतात मग त्यांत कमीपणा कसला?

आपल्यातील कानडी लोकांनी आपल्याला कानडी शिकवावे, तेलगू लोकांनी तेलगू. एक नवीन शिकण्याची आवड निर्माण होईल आपल्याला. गुजराती, हिंदी, तेलगू, तामिळ, कन्नड, बांगला, अगदी कोणत्याही भाषेत लिहावे पण आपल्याला शिकवावे.

इंजिनियरिंगची भाषा तर येतेच आपल्याला, आता इतर भाषाही शिकूया.

बरोबर कोण?

सामान्यतः मनुष्य कधी खोटे बोलत नाही.

आपले विचार आपली माहिती इतरांपर्यंत पोचावी म्हणून तो इतरांना सांगतो. ती माहिती कधी स्वतः बद्दल असते तर कधी इतरांबद्दल. स्वतःबद्दलची माहिती तो इतरांना सांगतो कारण आपल्या बरोबर इतर यावेत आणि आपल्या सुखदुःखांत इतरांनी सामील व्हावे म्हणून.

आणि इतरांची माहिती सांगतो कारण आपल्याला जेवढे माहीत आहे किंवा आपल्याला कसे समजले आहे ते इतरांना समजावे म्हणून. क्वचित आपली माहिती बरोबर की चूक ते जाणून घेण्यासाठी.

कधीबाही अतिउत्साहामुळे तो आपली माहीत थोडा स्वतःचा मीठमसाला लावून आणि चटपटीत करून इतरांना सांगतो. कधी आपल्याकडली माहिती किती खरी आहे या उत्साहात ती जरा ताणून इतरांपर्यंत पोचवितो. कधी कधी तद्दन खोटी माहिती इतरांना देतो ते त्यांना फसविण्यासाठी किंवा आपले इम्प्रेशन मारण्यासाठी.

a

पण तो माणूस म्हणजे तसल्याच समूहाचा एक सदस्य असतो आणि त्याच्या सारखे इतरही खूप असतात. मग खरी गंमत सुरू होते. "मेरा घोडा ही तेरे घोडे से ज्यादा सफेद है" किंवा "में ही सही हूँ, तू ही क्या, बाकी सब झूट हैं" पर्यंत मजल पोचते. बातमीत काय होते आणि वाद कुठे आणि कसला चालला आहे इथे लक्षच देत नाही कोणी.

विषय जर हलका फुलका असेल तर प्रत्येकजण आपले मत टाकतो आणि विसरून जातो. विषय थोडासा किंवा बराच टची असेल तर प्रकरण चिरडीला जाते आणि "तू तू मैं मैं" वर पोचते. लोक बाजू घेतात किंवा तटस्थ रहातात. तटस्थ रहाण्यांत एक फायदा आहे, लांबून मारामारी किंवा कुस्ती बघता येते, लागलेच तर आपल्या गड्याला लांबून डिवचून थोडा रंग, मग तो काळा का असेना आणता येतो. रोम मध्यल्या ग्लॅडीएटरची जीवघेणी मारामारी बघणाऱ्या प्रेक्षकांसारखी मजा लुटता येते.

आता शेअर करण्याच्या या स्टेजला मूळ माहिती काय होती आणि ती खरी तरी होती का इथे कोण लक्ष देतो? मजा बघू सारेजण, असे म्हणून आनंद घेत असतात. रोमन लोकांसारखे.

आपल्या स्वतःबद्दलची माहिती बहुधा खरीच असते कारण त्यांत फक्त शेअर करणे हाच हेतू असतो. कधीतरी तो शेअर करणारा विचार करतो की

अगदीच पाणचट माहिती कुणाला आवडणार, तर तिला जरा चटपटीत करू. मग मीठ मसाला लावून वरील प्रमाणे जाहीर करतो. पण कधीतरी कुणीतरी असते ती बातमी व्हेरीफाय करणारे. मग त्या माणसाचे चांगले हसेच होते.

मग एकतर तो गप्प तरी बसतो किंवा उसळून दुसऱ्याची माहिती कशी खोटी आहे ते सिद्ध करायला उतरतो मैदानात. आता "तू तू मैं मैं" वर थांबत नाही. "मेरा घोडाही ज्यादा सफेद है। बाकी सब बेकारके हैं। मैं ही सत्य हूँ। आप सब झुटे हैं।" करत करत उणी दुणी काढणे सुरू होते. अश्या वेळी हा खेळ बंदच करून टाकलेला चांगला.

बाहेरून आणलेल्या बातम्यांना तर कोण आई बाबा असतात हेच स्पष्ट नसते. बस उचला आणि पोस्ट करा. त्यांची खरी खोटी काय कोणी पहात नाही. तद्दन खोट्या ऐकीव बातम्या, कधी कधी चुरडलेल्या मुरडलेल्या बातम्या ज्या सरळ सरळ खोट्या दिसताहेत त्याही बिनधास्त पोस्ट केल्या जातात. त्यांत कुणाला नसलेली मुले चिकटवून देतात किंवा नसलेले गुणदोष अर्पण करतात. कधी न लागलेले शोध प्रसिद्ध करण्यात कधी त्या राजकारण्यांना मैदानात उतरवतात. व्हर्चुअल मैदानात. खऱ्या मैदानात कोण उतरतो?

आता या अश्या बातम्या वरून कसली वादावादी करायची. आणि वैयक्तिक अनुभवांना प्रूफ जोडायचे का की अटेस्ट करून मग पोस्ट करायच्या?

मग अश्या अविश्वासाच्या जगांत मुळात पोस्टच का करा? उगाच आपला उद्धार करून घ्यायला?

वैयक्तिक अनुभव नक्कीच काहीतरी चांगले करून जातात. चांगले अनुभव रस्ता दाखवतात आणि वाईट अनुभव खड्डे दाखवतात. दोघांचाही लोकांना फायदा होतो. विचार शेअर होतात. आपली माहिती शेअर होते, प्रसंगी आपले कौतुकही होते. ती जरूर शेअर करावी. वैयक्तिक माहितीबद्दल शंका काढणाराच टीकेचे कारण व्हावा.

जरा वळून बघा. या आपल्या ग्रुप मध्ये सर्वांत प्रथम आणि सर्वांत छान काय बातम्या शेअर झाल्या? वालचंद कॉलेजच्या आठवणी. सगळ्या वैयक्तिक आणि सगळ्या एकमेकांनी अनुभवलेल्या. आवडल्या सगळ्यांना, कमीत कमी कुणी ऑबजेक्शन तरी नाही घेतली.

सगळ्यांत टीका मिळविणाऱ्या पोस्ट म्हणजे दुसरीकडून आणलेल्या, सत्य न पाहिलेल्या, फक्त मी किती वाचतो आणि माझी चौकस बुद्धी किती मोठ्ठी आहे हे दाखवणाऱ्या. काय झाले त्याने? बंदीच आणावी त्यांवर असेच झाले की नाही? मग पुन्हा पुन्हा त्याच दगडावर ठेच का लागते आहे आपल्याला आणि विनाकारण आपसांत वादावादी, ती सुद्धा इतकी चिरडीला येऊन का होते आहे?

मी कसा बरोबर आहे ते इतरांनी सांगण्यात जे समाधान आहे ते स्वतः सांगण्यांत आहे का? ते सुद्धा माझेच खरे, पाहिजे तर हे घ्या प्रूफ असे सांगण्यात काय दाखवायचे आहे?

शेवटी बरोबर काय आणि खोटे काय हे ज्यास्त वेळ लपून रहात नाहीच. खोटे दहावेळा सांगितले म्हणून खरे होत नाही किंवा खरे दहादा खोटे आहे म्हणून सांगितले तरी खोटे होत नाही. अगदी इतिहासांत डोकावून तो ज्यास्त पॉवरफुल करण्यासाठी शून्ये वाढवून ज्यास्त इम्प्रेसिव्ह केला तरी जे तुम्हाला आणि आम्हाला माहीत असण्याची शक्यताच नाही तो इतिहास बरोबर कसा समजावा? सरळ विश्वास ठेवावा आपल्या सोर्स वर. नाहीतर सगळेच खोटे असेच म्हणावे. ज्याची त्याची मर्जी!

एकच उपाय. सगळ्या बातम्या एक तर पूर्ण खऱ्या आहेत किंवा पूर्ण खोट्या आहेत, यापैकी एक धरुनच चालायचे आणि वाचायच्या. किंवा त्या आल्याबरोबर सरळ डिलीट करून टाकायच्या.

गुगल आणि विकिपीडिया च्या माहितीला मर्यादा आहेत हे सर्व जाणतात, पण म्हणून तिथली सगळी माहिती तद्दन खोटी आहे असे म्हणणे किती बरोबर आहे? आणि समजा तिथली माहिती अगदी नक्की खोटीच असणार आहे धरून

चालले तर मग खरी, इतरांना मान्य अशी माहिती कुठे मिळणार आहे याचे कोणी उत्तर द्यावे. तेही नाही. फक्त तुम्ही सांगितलेले चूक, बस.

इतिहास नेहमी खोटाच असतो कारण तो लिहिणाऱ्याच्या मनाने कलुषित असतो असे धरून चालले तर आपण इंजिनीयर झालो आहोत यावर तरी विश्वास आहे का इतरांचा? आणि आपले वालचंद कॉलेजचे अनुभव खरे आहेत हे तरी सर्वमान्य होईल का?

या जगांत कोणती गोष्ट संपूर्ण सत्य आहे किंवा संपूर्ण खोटी आहे हे कुणीही इथे समजवावे. मान्य करू आपण, शंकाकुशंका न घेता. जो कोणी सर्वज्ञानी असेल आणि संपूर्ण सत्यवेत्ता असेल त्याने पुढे यावे आणि आम्हाला बरोबर आणि चूक चे ज्ञान द्यावे.

जर हे जमणार नसेल तर उगाच खऱ्या खोट्याची चिकित्सा करत आपले आणि इतरांचे डोके शिणवू नये हेच उत्तम.

मुंबईचे पठाण

आम्ही मुंबईत पुन्हा रहायला आलो १९५५ मध्ये. तेंव्हा मी सात वर्षांचा झालो होतो. मुंबईमध्ये जे जे हॉस्पिटल जवळ आमची बिल्डिंग होती. डोंगरी जेलकडे जाणाऱ्या रस्त्यावर. रस्त्याचे नावच जेल रोड नॉर्थ असे होते. आमच्या बिल्डिंग समोर बंदुकवाला बिल्डिंग होती. तिच्या तळमजल्यावर बॉम्बे ट्रंक फॅक्टरी होती. एक छोटे युनिट आमच्या घरासमोरच होते आणि त्याला लागून एक अजून खोली होती. साधी खोली, सरळ रस्त्यावर तिचा मोठा फोल्डिंग दरवाजा होता. ती खोली पठाणांची संध्याकाळी भेटायची खोली होती.

त्या दिवसांत म्हणजे १९५५ मध्ये मुंबईत बरेच पठाण काबुलीवाले असायचे त्यांचा मुख्य उद्योग म्हणजे सुकामेवा आणून विकायचा आणि जोडधंदा म्हणजे मिल मधल्या कामगारांना व्याजी पैसे द्यायचे. मुंबईचे तेंव्हाच मिल कामगार म्हणजे मिल एरिया मध्ये एक खोलीत बारा पंधरा लोक रहायचे. शिफ्ट मध्ये झोपायला त्यांना खोलीत जागा मिळायची आणि मिल काम सोडून बाकीचा वेळ रस्त्यावर गप्पा मारीत काढायचा.

बऱ्याच कामगारांना व्यसने असायची, पण पैसे कुठून येणार? मग या पठाणांच्या कडून कर्ज घ्यायचे. पठाण त्यांना कर्ज बिनबोभाट द्यायचे. मिलच्या गेटवर एकतरी पठाण दिसायचाच. पण पगाराच्या दिवशी मात्र मिलच्या गेटवर

सक्त पहारा ठेवून त्यांना धरून त्यांच्याकडून काढून घ्यायचे. असे बरेच पठाण मिल एरियांत काम करायचे. दररोज संध्याकाळी आमच्या घरासमोरच्या त्या खोलीसमोर खाटा टाकून बसायचे आणि आपापली विचारपूस करायचे. नाश्ता खाणे झाल्यावर ते खोली बंद करून परत जायचे.

या पठाणांना घरे कुठे मिळत होती ते तर माहीत नाही पण हा दररोजचा अड्डा मात्र दिसत होता. दररोज संध्याकाळी त्यांच्या खाटा बाहेर पडायच्या, त्या जमिनीवर आपटून त्यातले ढेकूण काढणे ऐकू यायचे. त्यांच्याकडे एक ग्रामोफोन होता, किल्लीचा. त्याच्यावर त्यांच्या भाषेतल्या दोन तीन रेकॉर्ड होत्या, त्या लावून ऐकत बसायचे. एक "वल्ला कुर्बान" नावाचे गाणे सतत ऐकू यायचे त्यांच्या फोनोवर.

ते ही एकलकोंडे आणि ते मिल कामगारही एकलकोंडेच. दोघांचेही आप्त नातलग गावाकडे, त्यामुळे असेल कदाचित, की पठाणांनी कर्ज बुडविल्याबद्दल कोणाला इजा पोचविल्याचे कधीच ऐकू आले नाही.

ईदच्या आणि दुसऱ्या सणासुदीला चांगले कपडे वगैरे घालून ते त्या खोलीसमोर सण साजरा करायचे. अधून मधून त्यांच्यापैकी कोणीतरी गावाला जायचा असायचा, त्याला निरोप देणे घेणे होत असे. कधी गावाहून आल्याचे

स्वागत व्हायचे. आमच्या घरातून ते जवळून कधी पहाणे झाले नाही पण अश्या दिवशी ते एकमेकांना अश्रूंनी भिजवीत असावेत.

नंतर इंजिनीयर झाल्यावर मीही मिल मध्येच ट्रेनी म्हणून जायला लागलो. गेट वरचा तो पठाण पाहून मला थोडेसे खिन्नच वाटायचे कारण त्याचे ते घरापासून दूर रहाण्याचे दुःख काही मिल कामगार आम्हाला सांगायचे. जरी ते कर्जदार आणि तो पठाण सावकार होता तरी त्यांच्यांत चालणारा संवाद कधीच विकल्पाला गेलेला ऐकला नाही. मैत्री सारखे संबंध असायचे त्यांचे असे ऐकले होते. काहीवेळातर सुपेरवायझर, इंजिनीयर लोकही कर्ज घ्यायचे म्हणे या पठाणांकडून.

बिनबोभाट चालायचा त्यांचा तो धंदा.

काबुलीवाला, छलिया, जंजीर इत्यादि चित्रपटांतील त्यांचे चित्रण आठवते का? बाहेरून कठीण आणि आतून मृदू, शब्दाचा पक्का, स्वाभिमानी, दुर्बळाचे रक्षण करणारा हो त्यांची प्रतिमा आज कुठे गेली आहे? सर्वसाधारणतः जनता चांगलीच असते, बिघडवतात ते राज्यकर्तेच असेच दिसून येते.

a

आज त्यांच्या देशाबद्दल ऐकताना आणि त्यांच्या देशांत चाललेले थैमान पाहतांना त्या पठाणांचे साठ पासष्ट वर्षांपूर्वीचे वागणे आणि मुंबईसारख्या परदेशांत मिळून मिसळून रहाणे नवलाचे वाटते.

आता पासष्ट वर्षे झाली आमच्या त्या घरातून दिसणारी पठाणांची ती खोली पाहून. त्या बाजूला गेली नाही आजकाल. काळाबरोबर सगळेच बदललेले असेल, ती खोली आता नसेलही. आणि ते दररोज संध्याकाळी रस्त्यावर खाटा टाकून बसणारे ते पठाणही आता तिथे येत नसतील, पण त्यांचे त्यावेळचे ते वागणे मात्र मनांत घट्ट जागा करून बसले आहे.

एक नूर आदमी

माणूस हा आपले शरीर झाकणारा प्राणी आहे. पृथ्वीवर एकुलता एक तसा प्राणी आहे. देवाने जेंव्हा निरनिराळे प्राणी निर्माण केले तेंव्हा प्रत्येकाला काही ना काही आवरण दिले. त्यांची त्वचा झाकली आणि सुरक्षित केली. माणसाला मात्र असे दान नाही दिले. उलटे जे काही केस अंगावर होते तेही कमी कमी करून टाकले.

माणसाकडे अस्वलासारखे दाट केस नाहीत की पक्ष्यांसारखी पिसे नाहीत. त्याच्याकडे हरिणासारखी सुरेख दिसणारी त्वचा नाही की वाघ आणि चित्त्यासारखी जंगलात लपून राहणारी पट्टेदार किंवा रंगीत नक्षीची कातडी नाही. माश्यासारखे खवले नाहीत की मगरीसारखे कठीण कवच नाही. कासवासारखी टणक ढाल नाही की नागोबासारखी सदा नवीन रहाणारे आवरण नाही.

मग थंडीवारे, उन्हातान्हापासून बचाव कसा करायचा? आपले अंग दुसऱ्या गोष्टी वापरून झाकणे हाच उपाय राहिला. आणि वस्त्रांचा जन्म झाला. देवाने शक्ती दिली ती बुद्धीला, शरीराला नाही. मग माणसाने बुद्धीचा उपयोग करत अंग झाकायला सोयीस्कर अश्या गोष्टींचा शोध घेतला.

a

अश्या गोष्टी शोधत सर्वप्रथम नंबर लागला तो इतर प्राण्यांच्या कातड्यांचा. इथेच भरपूर चॉईस होता. अस्वलाची केसाळ उबदार कातडी निवडू की हरिणाची सुंदर ठिपकेदार निवडू? की वाघाची पट्टेदार दुसऱ्यांना भिववणारी निवडू की चित्त्याची सौन्दर्य वाढवणारी निवडू? शिकार करणे आणि जंगलातल्या गोष्टी गोळा करणे या उद्योग होताच. प्राण्यांची कातडी हे आयते मिळणारे बाय प्रॉडक्ट होते. नाहीतरी वायाच जाणार ती मग आपणच का वापरू नये अंग झाकायला?

कातडी फक्त ओढून घेता येते अंगावर किंवा बांधून ठेवता येते. अंगाला फिट नाही बसत. मग काय करावे? इथे तो देवाने दिलेला बुद्धीचा साठा कामाला आला. पाहिजे तसे तुकडे कापून पुन्हा ते जोडले तर सर्व अंग व्यवस्थित झाकून घेता येते हा शोध लागला. पण जोडायचे कसे? तर कशाने तरी बांधून.

इथे नैसर्गिक धागे, वेली प्राण्यांच्या अंगातली वाया जाणारे धाग्यासमान अवयव वापरले जाऊ शकतात हे ज्ञान आले. भोके पाडून त्यातून धागा, वेली, गट (म्हणजे ताणलेली आतडी) अश्या गोष्टी ओवून घट्ट बांधल्या तर उत्तम अंग झाकणीचे साधन करता येते हेही ज्ञान आले. वाया जाणाऱ्या हाडांचा सुया भोके पाडायला म्हणून उपयोग करता येतो ते दिसले. शिवणकलेचा जन्म झाला.

कातड्यांची व्हरायटी भरपूर असल्याने छान दिसणारे आणि तलम कातडे कुठले आणि कोणत्या प्राण्यांचे कोणत्या मोसमात उत्तम ते सापडले. निसर्गातील धागे शोधून त्यांचे रफ का असेना कापड करता येईल याचेही ज्ञान आले. फॅशन चा जन्म झाला.

काय झाकावे आणि काय दाखवावे याची जाण माणसाला बहुतेक फार अगोदर आली असावी. गुहांमध्ये सापडलेल्या भित्तिचित्रावरून त्याकाळात काय फॅशन होती किंवा चाल होती ते दिसते. कंबर झाकणारे काहीतरी वस्त्र लौकर डेव्हलप झाले असे ही भित्तिचित्रेही दाखवतात. स्त्रियांनी वरचे अंग झाकावे असे माणसाला का आणि कधी वाटले असेल हे तर समजत नाही. पण पूर्ण विवस्त्र माणूस या चित्रात फारसा कुठेच दिसत नाही. म्हणजे ही पद्धत शिकार करण्याच्या कलेच्या अगोदरची असावी.

नैसर्गिक धाग्यांचे प्रकार माणसाच्या गोळा करण्याच्या उद्योगमधून सापडले असणार. कापूस, शेवरी, घायपात आणि असेच धागे सापडतात आणि ते एकत्र विणले की छानपैकी कापड तयार करता येते हाही खूपच जुना शोध आहे. असे कापड पाहिजे तर तलम, पाहिजे तर जाड आणि आपल्याला पाहिजे त्या आकाराचे करता येते आणि प्राण्यांच्या आकारावर अवलंबून रहायची गरज नाही हे लक्षांत आल्यामुळे वस्त्रोद्योग सुरू झाला.

a

सदा वेगळी वस्त्रे नेसण्याची आवड आणि मिळालेले तंत्रज्ञान त्यामुळे माणूस इतर प्राण्यांपेक्षा आणखीच रंगीबेरंगी झाला. बिचारे ते प्राणी, देवाने जे दिले तेच एकच एक रूप घेऊन फिरतात आणि माणूस बघा, नित्य नवा.

एक माणूस आणि त्यांच्या दहा आवडी, त्यामुळेच ही एक नूर आदमी, दस नूर कपडा, ही म्हण आली.

कपडे रंगवण्याची कला बहुतेक अपघातानेच आली असेल. आपले वस्त्र चुकून चिखलात पडले आणि त्याचा रंग लाल झाला, पानांमुळे हिरवा झाला, काही ठिकाणी क्षारयुक्त पाण्याने निळा, पिवळा, काळा झाला असेही झाले असेल. मग मुद्दाम तसे करून रंगीत "कपडे" तयार करण्याचे मनांत आले.

हजारो वर्षांच्या प्रॅक्टिस मुळे पाहिजे तसे कापड आणि कपडे करण्याचे एक तंत्र झाले आणि तशी स्पेशालिटीही झाली.

भारतात दहा वीस हजार वर्षांपासून हा वस्त्रोद्योग उत्तम चालत होता असे मानायला हरकत नाही. कारण नग्न भित्तिचित्रे भारतात फारशी सापडली नाहीत.

भारतीय वस्त्र कलाकारांना अंगठीतून पार होण्याइतकी तलम वस्त्रे करण्याचे स्किल हजारो वर्षापासून होते. काहीवेळा राजा किंवा देवांसाठी

a
बनविण्याची खास वस्त्रे इतकी काळजीपूर्वक आणि वेळ घेऊन बनविली जायची की त्यांची व्हॅल्यू कल्पनातीत असायची, एक दोनच वस्त्रे अशी बनायची.

अशी मौल्यवान वस्त्रे भेटीदाखल देण्याची प्रथा फार पूर्वी पासून होती.

तलम वस्त्रे खास एक्स्पोर्ट करता बनायची आणि ग्रीक आणि रोमन साम्राज्यांमध्ये एवढी मागणी होती आणि किंमत मिळायची की हा उद्योग मोठ्या उर्जितावस्थेला आलेला होता.

इतकी तलम वस्त्रे असायची की ती अंग झाकायला आहेत की अंग दाखवायला असा प्रश्न एका रोमन सम्राटाने केला होता आणि अश्या वस्त्रावर बंदी घातली होती. म्हणजे तेंव्हाही असे फॅशन प्रधान लोक होतेच. आता सारखेच. फॅशन शो मध्ये दिसणारे. अंग झाकताहेत की दाखविताहेत अशी शंका येणारे.

कापड उद्योग नंतर यांत्रिक झाला तरी हाताने बनविलेल्या कापडाची आणि विणण्याची कला आणि त्याची व्हॅल्यू अजूनही आहे. हाताने बनवलेल्या बनारसी, कांजीवरम, पैठण, आणि इतर साड्यांची भुरळ पडत नाही अशी स्त्री

a

विरळाच. सगळ्या गोष्टी या मौल्यवान कापडात हाताने करतात आणि म्हणून त्यांचे मोल वाढते. कस्टम मेड असतात अशी वस्त्रे.

एकंदरीतच यांत्रिक रित्या बनवलेल्या गोष्टीचे मोल हाताने बनवलेल्या गोष्टी पेक्षा कमीच असते.

यांत्रिक कापड निर्मितीत माझा श्रीगणेशा झाला इंजिनीयर झाल्यावर. मिल मध्ये कापसाच्या गाठी पासून ते रंगीत कपडा बाहेर विक्रीला जाई पर्यंतच्या सगळ्या पायऱ्या अभ्यासता आल्या.

कापडनिर्मितीत जपान खूप पुढारलेला होता तेंव्हा, म्हणजे 1971च्या सुमारास. जपानी कापड तलम, नव्या डिझाईनचे, अनेक प्रकारचे धागे वापरलेले, रंगांची विविधता अश्या गुणांमुळे खूपच प्रसिद्ध होते. त्यामानाने इंग्लिश कापड अगदीच डल, बिन रंगाचे असे. इटालियन कापड क्लासिक म्हणावे असे आणि अमेरिकन म्हणजे मागणी तसा पुरवठा या स्वरूपाचे. चिनी कापड अजून एवढे पुढे नव्हते आले त्यावेळेला.

कापड निर्मितीतली मशीन इटालियन, इंग्लिश, जपानी मेकची अशी प्रामुख्याने होती मिल मध्ये. तिथे व्यापारी सँपल घेऊन यायच, असे कापड

पाहिजे म्हणून, मग मिलच्या स्पिनिंग मास्टर आणि विव्हिंग मास्टरने ठरवायचे कसे बनवायचे ते.

बाजारांत मात्र जपानी तलम कापडाला जोराची मागणी होती. मुंबईतले मनीष मार्केट प्रसिद्ध होते तेंव्हा. आपण सर्वांनी कधी ना कधी अश्या जपानी कापडाचे शर्ट पॅन्ट शिवून घेतले आहेत.

आता तर कापड घेऊन कपडे शिवून घेणारे इतके कमी झालेले दिसतात की त्यांना डिनासौरचीच उपमा द्यावी. तयार कपड्यांचे आता एवढे मार्केट झाले आहे की ज्यांचे अंग कुठल्याही स्टॅंडर्ड मध्ये बसत नाही त्यांनीच कपडे शिवून घ्यावेत.

दसनूर कपडा मध्ये दसनूर फॅशन घुसल्या की जी व्हरायटी बघायला मिळते की घेणाराच दसनूर होऊन जातो आणि दसनूर खरेदी करतो आहे.

अजूनही कस्टम मेड म्हणजे खास लोकांचे, त्यांचे ब्रँड वेगळे आणि त्यांची किंमत वेगळी. म्हणजे कपडे आता स्टेटस सिम्बॉल झाले आहेत. माणूस कसा आहे त्यापेक्षा त्याच्या अंगावर कुठले कपडे आहेत आणि ती कितीवेळा ते बदलतो आहे इथेही लक्ष जायला लागले आहे.

a

कपडे अंग झाकायला की दाखवायला हा मुद्दाही मागे पडत जाऊन ते दसनूर आहेत की नाही हा मुद्दा पुढे येतो आहे.

असो. अंग झाकले जाते आहे ना थोडेतरी.

मग झाले तर.

आदरातिथ्य

पूर्वीच्या काळी शिकलेल्या तपश्चर्या केलेल्या ऋषींचे आश्रम होते. स्वतःचे शिक्षण, मनन आणि विद्यार्थ्यांना ज्ञानदान हे त्यांचे निर्वाह साधन होते. त्यांचे आश्रम म्हणजे आजच्या युनिव्हर्सिटी सारखे होते. तेही रेसिडेंशियल.

विद्यार्थ्यांनी तिथे यायचे, रहायचे, सगळी व्यवस्था आश्रम करणार. आठव्या वर्षांपासून सोळाव्या वर्षापर्यंत शिक्षण घ्यायचे आणि मग नंतर आपले आयुष्य आणि निर्वाह करायचा.

ऋषी, ऋषीपत्नी, ऋषीपुत्र आणि ऋषिकन्या हेच त्या आश्रमांचे मालक आणि चालक. कधी क्वचित एखादा विद्यार्थी शिक्षण पूर्ण झाल्यावर तिथेच राहून गुरुची, गुरुपत्नीची आणि गुरुपुत्राची सेवा करत विद्यादान करी, आणि नंतर आपला आश्रम स्थापन करण्याची मनीषा बाळगी. त्यांच्या सुदैवाने गुरूला एखादी छानशी एकुलती मुलगी असेल तर फारच छान, तिलाच आपली पत्नी केली की याच आश्रमावर आपला अधिकार होऊ शकतो.

व्यावहारिक शिक्षण गुरुजींनी द्यायचे, गृहशिक्षण गुरुपत्नीने, समाजशिक्षण गुरुपुत्राने आणि आदरातिथ्य वगैरे गृहस्थाश्रमाचे गुरुकन्येने.

गृहस्थाश्रमाच्या शिक्षणात आदरातिथ्य हेही शिक्षण होते. सर्व शिक्षण पूर्ण झाल्यावर आणि आश्रम सोडून जातांना गुरुदक्षिणा द्यायची.

आलेल्या पाहुण्यांचा सन्मान कसा करायचा, त्यांना प्रसन्न वाटेल असे कसे रहायचे आणि करायचे, त्यांना आवडीच्या गोष्टी शोधून त्या कश्या करायच्या, प्रसंगी स्वतःला त्याचा चाकर म्हणून त्याची कामे कशी करायची हे शिक्षण म्हणजे आदरातिथ्य.

राजपुत्र आणि राजकन्या मात्र स्वतःची प्रायव्हेट ट्युशन लावायचे. त्यांचे गुरुजी त्यांच्या घरी किंवा त्यांच्या आधाराने त्याच गावात राहून फक्त राजपुत्र आणि राजकन्यांना विद्यादान करायचे. तिथे राजपुत्रांनी आणि राजकन्यांनी गुरूला जमेल तेवढा मान द्यायचा. कारण गुरू त्यांच्या बाबांकडून वेतन घेतात ना. मग काय कितीही विद्वान असले तरी आपले नोकरच ते.

पण गुरुजींचे काय, त्यांना कोण शिकवणार आणि अपग्रेड करणार? त्याच्या साठी निरनिराळे यज्ञ करायचे, कॉन्फरन्सेस. तिथे समकालीन ऋषी एकत्र येऊन आपापले रिसर्च किंवा केलेले काम इतरांबरोबर सादर करायचे. यज्ञ म्हणजे प्रोसिजर, कशाचीही. मग त्याचे नियम असणार.

a

आलेल्या पाहुण्या ऋषींचे स्वागत करणे, त्यांना त्यांच्या मानाप्रमाणे बसायला जागा, त्याची वास्तपुस्त आणि त्याचा सन्मान करायचा आणि त्याचे ज्ञान वाटून घ्यायचे. त्याला आपले ज्ञान प्रकट करू द्यायचे, ते केल्यावर त्याची वाहवा करायची, सगळयांची एकमेकांशी ओळख करून द्यायची, मधल्या जेवणाच्या आणि आरामाच्या वेळी मनोरंजनाचे कार्यक्रम ठेवायचे ही सर्व कर्तव्ये यजमानांनी, त्याच्या चेल्यानी आणि सेवकांनी करायची ही पद्धत म्हणजेही आदरातिथ्यच.

मग एवढा कार्यक्रम केल्यावर मानसिक शीण येणारच. मग सोमरसपानविधी ठेवायचा. पाहुणे ऋषी आपले खास चेले घेऊन आलेले असायचे. ते आपापल्या गुरुची "काळजी" घ्यायचे. पेले भरून देणे इत्यादी. मग सामिष किंवा निरामिष भोजन, चर्चाचर्वण करत. बरोबर विद्वान पाहुणे आणि तेवढेच विद्वान यजमान.

यज्ञांचे बहुतेक पार्टीसिपंट ऋषी विद्वान आणि कार्यप्रचुरच असायचे आणि त्यांनी केलेले कामही तेवढेच मोठे आणि महत्वाचे असायचे. आता पहा ना, विश्वामित्र ऋषीने प्रतिसृष्टी निर्माण केली, म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्स वापरून सर्व गोष्टी पुन्हा निर्माण केल्या.

अश्या ऋषींचा इगो तेवढाच मोठा असणार यात काय संशय? दुसरेही ऋषी तेवढेच विद्वान आणि कार्यप्रचुर असतीलही. सो व्हॉट? इथे इगो क्लॅश झाला नाही तरच नवल. मग त्या यज्ञाच्या यजमानाची पंचाईत होत असेल तर नवल काय?

नुसती बसायची जागा, निरनिराळ्या सेवा, भोजन, सोमरसपान आदीमध्ये प्राधान्य अश्या प्रत्येक गोष्टींत त्याची कुचंबणा होत असेल. याचा सन्मान करावा तर तो चिडतो आणि यज्ञ सोडून जाण्याची भाषा करतो. करावे काय?

यज्ञांचे एक सोडा, ती एक ऑर्गनाईझ्ड इव्हेंट आहे. तिथे कमीतकमी ग्रुप सायकॉलॉजी तरी आहे. पण असला विद्वान आणि इगोबाज ऋषी आपल्या घरी आला पाहुणा तर काय करायचे. मग इथे ती कन्या किंवा पुत्र उपयोगी पडायचे. एक तर ती कन्या, ऋषीपेक्षा वयाने खूपच लहान म्हणजे काहीतरी सॉफ्ट कॉर्नर असेल त्या ऋषीच्या मनांत. ही मात्रा मात्र बहुधा लागू पडायची. कधीतरी आपला लहान पुत्रही या कारणे सेवेला लावायचा. बहुधा असले ऋषी लहान मुलांवर रागवत नाहीत.

अगदी राजपुत्र आणि राजकन्यांनी अश्या ऋषींची सेवा करून त्यांना प्रसन्न केले आणि ठेवले आहे. इथे आदरातिथ्यांत जराही उणीव न ठेवता आणि सर्व न कंटाळता आणि हसतमुख राहून करायचे म्हणजे तारेवरची कसरत. पण एकदा

तो ऋषी प्रसन्न झाला तर त्या कन्येला आणि तिच्या आईबाबांना चांगला वर देऊन जायचा. नंतर जन्मभर त्या कन्येचे किंवा कधीतरी त्या पुत्राचे भाग्य उजळायचे.

कधीतरी आपली सर्व संपत्ती वगैरे पाहुण्याच्या चरणी अर्पण करायची आधीही पद्धत होती. अर्थात हे दान घेऊन झाले की ते पुन्हा ठेव म्हणून यजमानालाच अर्पण करायची एटिकेट पण होती. पण अशी एटिकेट न पाळणारे ऋषीही होते आणि त्यांनी दान मिळालेले आपल्यापाशी ठेऊन दात्याचाच अपमान केला आहे आणि त्याला त्रास दिलेला आहे.

आदरातिथ्याची परमावधी म्हणजे आपली कन्याच त्या पाहुण्याला अर्पण करणे. आता याहून ज्यास्त काय होऊ शकते? असेही झाले आहे. अगदी आता आता पर्यंत. आपल्या घरातली कन्या त्या बळवान कानपिळ्याला अर्पण करून शांती समृद्धी मिळविल्याची उदाहरणे झाली आहेत.

तर आदरातिथ्य करायला काही मर्यादा नाहीत. जेवढे करावे तेवढे कमीच. पण आदरातिथ्य केल्याने फायदाच झाल्याची उदाहरणेच ज्यास्त आहेत. राक्षस मारले गेले आहेत, आश्रय मिळाले आहेत आणि वाईट काळ कंठता आला आहे.

a

आज काय वेगळे आहे? ऋषी आहेत, आश्रम आहेत, यज्ञ आहेत कॉन्फरन्सेस आहेत, तो इगो क्लॅश आहे, ते स्वागततीर्थ आणि सोमरसपानही तसेच आहे आणि मी कसा आणि तो कसा ची जुगलबंदी तशीच चालते आजही.

कन्या आणि पुत्र सेवेत ठेवल्याची उदाहरणे आहेत, पण कन्या अर्पण केल्याची उदाहरणे जरा कमी दिसतात आजकाल. तसेच आदरातिथ्याचे नियम पाळले जातात अजूनही.

अंगावरची वस्त्रे बदलली, बाहेरचे रुपडे बदलले पण आतून अगदी तसेच आहे, हजारो वर्षांपूर्वी होते तसे.

शेवटी माणूस कसा बदलणार?

युद्धस्य कथा रम्याः

लढाया कितीही विनाशक असोत, त्यांच्या गोष्टी मात्र मनोरंजक असतात. लढायांत भले हजारो माणसे मृत्युमुखी पडली असोत किंवा कायमची अपंग झालेली असोत, त्या लढायांच्या कथा मात्र चघळून चघळून सांगितल्या जातात आणि ऐकल्या जातात.

आम्ही एनसीसीच्या कॅम्पला साताऱ्याला गेलो असताना आम्हाला इन्स्ट्रक्टर म्हणून आर्मीतले जवान, सुभेदार होते. त्यांतले काहीजण गोव्याच्या मुक्तीलढ्याच्या वेळी तिथे पोस्ट केलेले होते. ते आम्हाला त्यांच्या कथा सांगायचे. कसे जंगलातून रात्रीच्या वेळी मार्च करायचे, "तहान" लागली तरी त्यांचा कॅप्टन त्यांना एक घोटही घेऊ द्यायचा नाही आणि मग त्यांच्या मुक्कामावर पोचल्यावर कसे ते आपली "तहान" भागवायचे वगैरेंच्या गोष्टी रंगवून सांगायचे.

त्यांच्यापैकी एकजण ऐन धुमश्चक्री मध्ये गोळीबारात जखमी झालेला होता, त्याच्या छातीतून तीन गोळ्या काढल्या होत्या आणि आम्हाला तो अभिमानाने आपली छाती दाखवून आमच्या शहरी तारुण्याची चेष्टा करायचा. आम्हीही ती चेष्टा ऐकून घ्यायचो कारण प्रूफ समोर होते.

a

१९६६च्या फेब्रुवारीच्या एनसीसीच्या कॅम्पमध्ये १९६५च्या युध्दातले जवान आम्हाला इन्स्ट्रक्टर म्हणून आले होते. त्यांना या पोस्ट म्हणजे सुट्टी सारख्याच होत्या आणि त्यांचे अनुभव अगदी ताजे होते. इछोगिल कालवा फोडून पॅटन रणगाडे उसाच्या शेतात रुतवून कसे गारद केले याच्या कहाण्या ते सांगत असत. त्यांच्या या कहाण्या ऐकतांना अतिशयोक्त वाटायच्या पण ते लगेच उसळून सांगायचे की त्या अतिशयोक्त नाहीत. पॅटन रणगाडे अजूनही तिथेच पडले आहेत म्हणून.

पण एकंदरीत युद्ध होऊन गेल्यावर ज्या कथा सांगितल्या जातात त्यामध्ये हळू हळू भर पडत त्या अधिकाधिक रंजक आणि आश्चर्यकारक होत जातात यात काही शंका नाही.

जेवढे युद्ध जुने तेवढ्या त्या कथा ज्यास्त अतिरंजित आणि मनोरंजक. मग भारतातले ते सर्वांत प्राचीन महायुद्ध आश्चर्यकारक नसेल तरच नवल. ते युद्ध होऊन चार पाच हजार वर्षे होऊन गेली असे म्हणतात. हे ज्योतिर्विज्ञानाने शोधून काढले असे असे ऐकले आहे. मग त्या युद्धाच्या कथा रम्य नसतील तर काय?

आता फक्त सैन्यांचा आकारच बघा. कौरवांच्या अकरा आणि पांडवांच्या सात म्हणजे एकूण अठरा अक्षौहिणी लढवैय्या सेना होत्या. निरनिराळ्या पुस्तकांत दिल्या प्रमाणे एक अक्षौहिणी म्हणजे खालील सूत्र होते.

एक अक्षौहिणी

रथ - २१८७०

गज - २१८७०

अश्व - ६५६१०

पदसैनिक - १०९३५०

अफाट वाटते की नाही ही संख्या. प्रत्येक सांगणाऱ्याने एक शून्य अधिक लावले असे नाही वाटत?

एक रथ समजा दोन मीटर लांब आणि एक मीटर रुंद असेल, कमीतकमी, तर त्याला लागणारी जागा दोन वर्गमिटर असेल. पुढे घोड्यांना चार मीटर लांब आणि तीन मीटर रुंद एवढी जागा नक्कीच लागत असेल. मग एका रथाला चौदा वर्ग मीटर जागा लागेलच.

एका हत्तीला कमीतकमी पाच मीटर लांब आणि दोन मीटर रुंद एवढी जागा नुसते उभे राहायला लागते, म्हणजे दहा वर्ग मीटर.

घोड्याला थोडी कमी, तरी पाच वर्ग मीटर जागा लागेलच.

एका माणसाला उभे राहायला एक वर्ग मीटर तरी लागेलच, हत्यार वगैरे घेऊन.

मग बघा बरं -

एक अक्षौहिणीला लागणारी जागा -

रथ - २१८७० × १४ = ३०६१८०
गज - २१८७० × १० = २१८७००
अश्व - ६५६१० × ५ = ३२८०५०
पद सैनिक - १०९३५० × १= १०९३५०

एकूण जागा ९६२२८० वर्ग मीटर म्हणजे अंदाजे १ वर्ग किलोमीटर.

अठरा अक्षौहिणीला लागणारी जागा १८ वर्ग किलोमीटर. ही फक्त लढणाऱ्या सैन्याला लागणारी जागा, ती सुद्धा लागून लागून आहे. प्रत्यक्ष सैन्य विखुरलेले असणार, म्हणजे फक्त सैन्याला चाळीस पन्नास चौरस किलोमीटर जागा लागेल. बाकीचे सेवा देणारे लोक आणि त्यांना लागणारी जागा यांचा फक्त विचारच करावा. ही फक्त जमिनीच्या जागेची मोजमापे आहेत. सामानसुमान, तंबू इत्यादींना लागणारी जागा तर अजून विचारातच घेतली नाही. कदाचित सगळी धरून २५०० वर्ग किलोमीटर च्या घरांत असेल. म्हणजे ५० किलोमीटर × ५० किलोमीटर जागा. युद्धभूमी असेल ना एवढी मोठी? ती सुद्धा दिल्ली जवळ. अशक्य नाही पण असंभव वाटते.

हत्यारे आणि शस्त्रास्त्रे, इतर आयुधे, फुटकळ सामान तर किती लागेल त्याचा फक्त विचारच करावा.

या सैन्याला लागणारा अन्न पुरवठा उडुपीच्या राजाने केल्याचा व्हिडीओ आजकालच पाहिला. आता अन्न पुरवठा तर केलाच असेल ना. सैन्य पोटावर चालते. तसाच अस्त्र, शस्त्र, आयुध, दिवाबत्ती, तेलपाणी, पिण्याचे पाणी, काहीतरी ब्रेकफास्ट अशाही सेवा पुरवल्या जात असतीलच, युद्ध झाल्यावर रथ वगैरेंची देखभाल, धनुष्ये, तलवारी, बाण, भाले इत्यादीची देखभाल आणि पुरवठा असल्याखेरीज युद्ध कसे चालणार अठरा अठरा दिवस. आणि युद्धभूमीची स्वच्छता, गेलेल्यांचे क्रियाकर्म वगैरे विधी करणारे असे सेवादायी लोक असतीलच. एका योद्ध्यामागे वीस एक तरी सेवा देणारे असतील.

मग एकूण सैन्य किती असेल, लढणारे आणि न लढणारे, १०९३५० ×२१ = २२९६३५० इतके. उत्तर भारताची लोकसंख्या किती असेल तेंव्हा?

जरी की आकडेवारी अशक्य नसली तरी असंभव असू शकेल.

आम्ही सगळे व्हिडीओ, विकिपीडिया, पुराणे, जुनेनवे ग्रंथ यावर विश्वास ठेवतो. नाहीतर असली माहिती कशी मिळणार?

आहे की नाही युद्धाची ही कथा रम्य?

शस्त्रांच्या कथा काही कमी रम्य नाहीत. अर्जुनाचा बाण कित्येक "योजने" पर्यंत जाऊ शकत होता म्हणतात.

आता योजन हे अंतर दोन मैल ते पंधरा किलोमीटर इतके वर्णले जाते, आजही, निरनिराळ्या "शास्त्रीय" अभ्यासांत. फार न ताणता एक मैल जरी धरले किंवा टीकाकारांना उत्तर न देता येत असल्याने अगदी एक किलोमीटर जरी धरले तरी अर्जुनाचा बाण एक किलोमीटर अंतरावर जाऊ शकत होता असे मानू या.

चांगला धष्ट पुष्ट शक्तीवान माणूस आपल्या खांद्याने वीस किलोग्राम जोर किंवा दोनशे न्यूटन जोर सतत लावू शकतो असे धरूया. कारण आज धनुष्य बाणाच्या स्पर्धा होतात, आणि तिथे दोनशे ग्रॅम वजनाच्या बाणासाठी पंचवीस मीटरवर टार्गेट असते.

आता लढाईत वापरलेल्या बाणाचे वजन, किंवा वस्तुमान अर्धा किलोग्राम असते असे धरले तर त्याला मिळणारे अक्सलरेशन ४०० मीटर / वर्ग सेकंद असेल. नॉर्मल बाण धनुष्यातून सुटला की तो त्याच्या लांबी इतका म्हणजे एखादा मीटर जाई पर्यंत ढकलला जातो नंतर आपला आपण जातो. त्याला

मिळणारा वेग २० मीटर प्रति सेकंद असेल आणि ज्यास्तीत ज्यास्त चाळीस मीटर वर जाऊन पडेल तो. मग अर्जुनाचे काय? का ती ही एक रम्य कथाच?

तसेच गदा आणि भाल्यांचे असणार. भीमाची आणि दुर्योधनाची गदा वीसेक किलोची नक्कीच असेल. असल्या गदेचा मन लावून मारलेला ठोका भल्या भल्यांना एका दमांत लोळवील तर नवल काय. आणि असे हे महायोद्धे तासनतास लढत होते एकमेकांशी, हे ही रम्यच आहे नाही? कितीही शक्ती असली आणि कितीही चिरडीला येऊन लढत असले तरी तासनतास लढाई करत असतील का?

तर तात्पर्य काय? युद्धाच्या कथा मनोरंजनाकरता वाचाव्यात आणि ऐकाव्यात पण फारश्या मनावर घेऊ नयेत. कविराज काव्ये करतांना शब्दांचे कान मुरगळतात तसेच शून्येही घालत असतील आपली स्वतःची, चटकमटक गोष्ट करण्यासाठी.

करोत बिचारे, दुसरे काय करणार? नाही तर त्यांची काव्ये आणि कथा कश्या चित्तवेधक होणार.

तर वाल्मिकी आणि व्यासांना साष्टांग नमस्कार घालावा आणि त्यांच्या कथा वाचून आपले मनोरंजन करावे, दुसरे काय?

सीमोल्लंघन

माणसाने स्वतःला किती मर्यादा घालून घ्याव्यात याला काही मर्यादा नाही. प्रत्येक मर्यादा म्हणजे स्वतः भोवतीचा एक बुडबुडा. गोगळगायींचा शंख जसा काही.

एकाच वेळी अनेक बुडबुड्यांत राहणे फक्त माणसालाच जमत असेल. नवरा म्हणतो बायको माझ्या मुठीत आहे आणि बायको म्हणते नवरा माझ्या मुठीत आहे, दोन्ही एकाच वेळी! जरा कल्पना करून बघा, कसे काय आहे ते! मुठीत बायको, तिच्या मुठीत नवरा, त्याच्या मुठीत बायको.....टेंडस टू इंफिनिटी! हे झाले लग्नानंतर, त्याआधी "हम आपके दिल मे रहते हैं", असेच टेंडस टू इन्फिनिटी!

म्हणजे नुसती स्वतःलाच मर्यादा घालून घेत नाही तर इतरांनाही तशीच मर्यादा घालतो. आता यापुढे मर्यादा म्हणजे बुडबुडा समजणे. आता यापुढे मी फक्त माझ्याबद्दल बोलणार आहे, ते जर इतरांना (म्हणजे तुम्हाला) लागू झाले तर तो निव्वळ योगायोग समजावा. कळले का? कळावे.

बुडबुडा नंबर १

मी स्वतः. मी कसा आहे, काय करतो, काय करू शकतो, काय करू शकत नाही, इत्यादी. सुरुवात एसएससी पासून करू. गणित आपला शत्रू आहे, तो आपल्याला हरवणार आहे. घातली होती सीमा. एका वेळी शस्त्र टाकू की काय असे वाटले होते. पण नाही टाकले. कसे जमणार नाही? फक्त गणित आणि मी अशी लढाई सुरू झाली. दररोज प्रमेये पुन्हा पुन्हा लिहून काढणे, बीजगणितातील उदाहरणे पुन्हा पुन्हा तीच तीच सोडविणे. सरळ सरळ तू किंवा मी. निकाल व्हायचा तोच झाला, गणित हरले. "फंदा खुल गया, खुल गया फंदा". शत्रूवर मात करता येते. मी एक बुडबुडा फोडला. नंतरच्या जीवनांत हाच आणि असेच शत्रू आले पुढे. पण मात करता येते हा कॉन्फिडन्स मिळविला.

बुडबुडा नंबर २

माझे काही चुकले तर काय होईल? चूक झालीच तर इतर लोक कसे वागतील माझ्या बरोबर. चूक होण्याच्या भीतीने पावलेच जर उचलली नाहीत तर काय होणार? "जेम्स बॉण्ड नेव्हर मेक्स या मिस्टेक", पण जेम्स बॉण्ड काही करतच नसेल तर मिस्टेक होणारच कशी? हा बुडबुडा मात्र फक्त आतून नाही तर आतून आणि बाहेरून फोडला पाहिजे. जो काहीतरी काम करील तो काहीतरी चुका करील. आणि त्याला अशी चूक करू देणारा त्याला सांभाळून घेईल. जोपर्यंत सुधारता येतात तोपर्यंत त्या चुकाच नव्हेत. कॉम्प्युटरवर थ्रीडी मॉडेलिंग करायचा प्लॅन केला, १९९५ मध्ये, ते सुद्धा ऑटोकॅडवर. तेंव्हा

ऑटोकॅड फक्त ड्राफ्टिंग पॅकेज धरले जायचे, फक्त ड्रॉइंग बनवायला. पण मी थ्रीडी मॉडेलिंग करून डिझाइन करायचा ध्यासच घेतला, पहिल्यांदा स्वतः शिकलो. मग मॉडेलिंग सुरू केले. याचे फायदे अनेक, चुका लौकर सापडतात, डेमो द्यायला आदर्श, काम कमी श्रमांत होते. पण कुणी केले नव्हते. आमचे साथीदार तर थोडे नर्व्हस झाले की मला काही झाले तर प्रोजेक्टचे काय होणार. पण काही नाही झाले मला, उलट या पद्धतीची गोडी लागून दहा पंधरा शिष्य मिळाले. आमच्या टीसीईत पायोनियर झालो मशीन डिझाइन थ्रीडी मॉडेलिंगने करण्यांत.

बुडबुडा नंबर ३

दुसऱ्यावर काम सोपवू का नको? दुसरे करू शकतील ना? आपण स्वतः जर कशांत एक्सपर्ट झालो तर हा बुडबुडा फोडणे महाकठीण. मग ते घर असो की व्यवसाय असो की आपले ऑफिस कारखाना असो. पण हे करायचेच होते. हा बुडबुडा फोडायला आपल्यासारखेच इतर एक्स्पर्ट तयार करायचे होते. सरळ क्लासेस आणि सेमिनार घेतले आणि आमच्या तरुण साथीदारांना आपल्या इतके तरी कॉम्पिटंट बनवले. त्यामुळे एक झाले, थ्रीडी मॉडेलिंग स्थिर झाले ते सुद्धा सन २००० च्या सुमारास. त्यामुळे आता आमच्या कस्टमरच्या अपेक्षा वाढल्या आणि तसेच कौतुकही वाढले. तेवढ्याच फी मध्ये ज्यास्त काम करायची पद्धत स्थिर झाली. आणि माझा तो बुडबुडा? तो कधीच फुटला, गुरुजी झालो.

बुडबुडा नंबर ४

आपल्याला लोक काय म्हणतील? काय म्हणतील? आधी काय म्हणत होते? चुकले तर येतील अंगावर, टीका करायला, नाही चुकले तर काही डोक्यावर घेणार आहेत का? म्हणतील, "त्यांत काय विशेष? हे तर व्हायलाच पाहिजे होते". लोक काय म्हणतील हा बुडबुडा थोडा दुबळाच होता आमच्या बाबतीत. मान वर काढायची संवयच होती. कुठल्याही ग्रुपमध्ये शिरून कशावरही चर्चा करायची आवडच होती. त्यामुळे लोकांची भीडभाड आणि टीका याची कधीच फिकीर फारशी केली नाही. सगळेच जर गरुड असते किंवा सगळ्याच जर कोकिळा असत्या किंवा सगळेच जर हंस असते किंवा सगळेच जर सिंह असते तर मग गरुड, कोकिळा, हंस, सिंह यांना कोणी विचारले असते का? देवाने आम्हाला असेच केले आहे आणि आम्ही असेच राहणार, या वृत्तीने जर आपण स्वतःला प्रकट करू शकलो तर अजून एक सिंह, अजून एक कोकिळा नाही ना निर्माण होणार? "कुछ तो लोग कहेंगे लोगोंका काम है कहना....."

\बुडबुडा नंबर ५

स्वत्व. अभिमान, इगो. "मी कुणासमोर वाकणार नाही की मागायला जाणार नाही. स्वाभिमानाने जगलो, स्वाभिमानानेच जगेन." अच्छा? हो का? छान, छान. किती दिवस असे रहाल? मुलेबाळे मोठी झाली आता. त्यांना

तुम्हीच शिकविले आहे की स्वाभिमान असायला पाहिजे, आपल्या पायावर उभे राहिले पाहिजे. मग सगळ्या चांगल्या मुलाबाळांप्रमाणे ती ही शिकलीच असतील की हा धडा? मग काय आता त्यांच्या बरोबर कॉम्पिटिशन लावायची आहे का? त्यांनाही आमच्याच इतका स्वाभिमान, महत्वाकांक्षा असणारच की. मग? मुरड कोणी घालायची, आम्ही का त्यांनी? गिळायला थोडी कडू गोळी आहे ही पण हा बुडबुडा फोडलाच पाहिजे. थोडेफार सोडून देऊ, थोडे फार नवे काहीतरी करू. रोल बदलू.

आपण काही मर्यादा पुरुषोत्तम राम आहोत का? अनेक बुडबुड्यांत, अनेक सांखळ्यांत अडकलेली जिंदगी आहे आपली. त्या सांखळ्या आपणच घालून घेतल्या पायांत आणि आता धावता येत नाही म्हणून तक्रार का करतो आहोत?

तोडून टाकू या साखळ्या, जरा कठीण जाईल, पण तोडल्या नाहीत तर ज्यास्त कठीण जाईल.

a

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

श्रीरंग कौलगी यांचं हे ई साहित्यवरील तिसरं पुस्तक.

श्रीरंग कौलगी हे त्या काळातील इंजिनियर जेव्हा भारतात हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच इंजिनियरिंग कॉलेजेस होती. इंजिनियर हा त्या काळचा क्रीम. इंजिनियरिंग सोबतच त्यांचा इतर छंद जोपासण्याचा स्वभाव व वाचन आणि चिंतन यांमुळे आयुष्याकडे त्यांनी सजगपणे पाहिले. त्यांच्या लेखनातून त्यांचा मौलिक अनुभव आणि त्यांचे खुसखुशीत भाषेतील चिंतन अशी दुहेरी मेजवानी मिळते. त्यांच्या पुस्तकांची एक मालिकाच ई साहित्य प्रकाशित करत आहे.

श्रीरंग कौलगी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४९), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(५०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि.

देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१३), श्याम कुलकर्णी(१९), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी(३), यशवंत कदम(७), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखा़नीस(२), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३) श्रीराम काळे, शैलेश पुरोहित(४) राजा कदम असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

।आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ‘इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी॥